सोलापूर तरुण भारत
आसमंत



# सामरिक भागीदारीचे नवे क्षितिज

लक्ष्यवेध
प्रतिनिधी

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा पाच राष्ट्रांचा दौरा, हा बदलत्या जागतिक व्यवस्थेत भारताच्या वाढत्या महत्त्वाचे प्रकटीकरण आहे. आज जेव्हा संपूर्ण जग रशिया- युक्रेन युद्धाच्या धुरळ्यात अडकले आहे आणि पश्चिम आशिया इराण-अमेरिका संघर्षाच्या ज्वालामुखीवर उभा आहे, तेव्हा भारताचे पंतप्रधान एका बाजूला आखाती देशांशी आणि दुसर्या बाजूला युरोपीय महासत्तांशी संवाद साधताना दिसले. या दौऱ्याची सुरुवात संयुक्त अरब अमिरातीपासून होणे, हे भारताच्या विस्तारित शेजार धोरणाच्या परिपक्वतेचे लक्षण होते. हा दौरा केवळ करारांपुरता मर्यादित नसून, तो २१व्या शतकातील भारताच्या जागतिक नेतृत्वाचा आणि स्वावलंबी ऊर्जा धोरणाचा एक नवा अध्याय आहे, असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही.

गेल्या काही महिन्यांपासून पश्चिम आशियातील समीकरणे वेगाने बदलली आहेत. इराण, अमेरिका आणि इस्रायल यांच्यातील थेट संघर्षामुळे, जागतिक तेल बाजारपेठेत अस्थिरतेचे सावट आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी दुबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्याचा ज्या तीव्र शब्दांत निषेध केला, त्यातून भारताने आपली 'दहशतवादाविरुद्ध शून्य सहनशीलता' ही भूमिकाही पुन्हा एकदा जागतिक पटलावर ठामपणे मांडली आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर भारत आज एक मूक प्रेक्षक उरलेला नसून, तर आपल्या मित्रराष्ट्रांच्या सुरक्षेसाठी खंबीरपणे उभा राहणारा एक जबाबदार जागतिक भागीदार आहे, हेच पंतप्रधान मोदी यांनी या निषेधातून अधोरेखित केले. भारतासारख्या वेगाने विकसित होणाऱ्या अर्थव्यवस्थेसाठी, ऊर्जासुरक्षा हा राष्ट्रीय सुरक्षेचाच एक अविभाज्य भाग. इराण- अमेरिका संघर्षाची झळ भारताला बसू नये, यासाठी पंतप्रधानांनी या दौऱ्यात संयुक्त अरब अमिरातीशी केलेले द्रवीभूत पेट्रोलियम वायू आणि पेट्रोलियम साठ्यासंबंधीचे करार अत्यंत धोरणात्मक असेच. भारताने आपल्या धोरणात्मक तेलसाठ्यांमध्ये संयुक्त अरब अमिरातीला सहभागी करून घेणे, हा एक दूरदृष्टीपूर्ण निर्णय आहे. उद्या होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारा तेलपुरवठा युद्धाच्या कारणास्तव विस्कळीत झाला, तरी भारताकडे पुरेसा साठा उपलब्ध असावा, याची ही पूर्वतयारी. हा करार म्हणजे केवळ व्यापार नसून, भविष्यातील संकटांपासून भारतीय अर्थव्यवस्थेला वाचवणारे सुरक्षाकवच आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युएई, नेदरलँड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या पाच देशांचा अत्यंत महत्त्वपूर्ण दौरा केला. देशांतर्गत पातळीवर जनता महागाईचा सामना करत असताना, पंतप्रधानांचा हा दौरा भारताच्या भवितव्याला नवी दिशा देणारा ठरणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हा दौरा भारताच्या सामरिक आणि ऊर्जासुरक्षेसाठी मैलाचा दगड ठरणारा आहे. इराण संघर्षाच्या पार्श्वभूमीवर यूएईशी झालेले पेट्रोलियम करार आणि 'ओपेक' बाहेरील नव्या समीकरणांमुळे भारताची आखाती देशांतील पकड मजबूत झाली असून, युरोप दौऱ्यातून जागतिक राजकारणात भारताचे वाढलेले मुत्सद्दी वजन अधोरेखित होत आहे.**

या दौऱ्याच्या यशाचा एक महत्त्वाचा पैलू म्हणजे, संयुक्त अरब अमिरातीचे 'ओपेक' गटातून बाहेर पडणे. आखाती देशांमधील तेल उत्पादक देशांची ही संघटना अनेकदा तेलाचे दर कृत्रिम रीत्या नियंत्रित करते, ज्याचा फटका भारतासारख्या मोठ्या आयातदार देशाला बसतो. मात्र, आता संयुक्त अरब अमिराती या बंधनातून मुक्त झाल्यामुळे, ते भारताला सवलतीच्या दरात आणि मोठ्या प्रमाणात कच्च्या तेलाचा पुरवठा करू शकतात. संयुक्त अरब अमिरातीवर आता तेलविक्रीची पूर्वीसारखी बंधने राहिलेली नाहीत, याचा सर्वाधिक फायदा भारत करून घेऊ शकतो. उभय देशांमधील हे नवे आर्थिक समीकरण, आशियातील ऊर्जा-राजकारणाची दिशा बदलणारे ठरणार आहे.

जागतिक राजकारणात सध्या पाकिस्तान, तुर्कीये, कतार आणि सौदी अरब यांसारखे देश एकत्र येऊन, 'इस्लामिक नाटो' उभारण्याच्या हालचाली करत आहेत. अशा परिस्थितीत भारताने संयुक्त अरब अमिरातीसारख्या प्रभावशाली आणि उदारमतवादी इस्लामिक राष्ट्राशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित करणे, हे भारताच्या परराष्ट्र धोरणाचे मोठचे यश आहे. भारत आणि संयुक्त अरब अमिराती आता केवळ शस्त्रास्त्रांच्या खरेदी-विक्रीपुरते मर्यादित राहिलेले नाहीत, तर तंत्रज्ञान हस्तांतरण आणि संयुक्त संरक्षण उत्पादनांवरही भर दिला जात आहे.

(पान ४ वर)

## भारताला काय होणार फायदा?

पंतप्रधान नरेंद्र मोदी पाच देशांचे दौरे करून भारतात परतले आहेत. या पाच देशांच्या दौऱ्यात भारत आणि त्या देशांमध्ये अनेक करार करण्यात आले आहेत. भारताची जागतिक भागीदारी अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने केलेला हा दौरा महत्त्वपूर्ण मानला गेला. पंतप्रधान मोदींच्या दौऱ्याचा मुख्य उद्देश दीर्घकालीन ऊर्जा पुरवठा सुनिश्चित करणे, तंत्रज्ञान सहकार्य वाढवणे, युरोप व पश्चिम आशियातील देशांसोबत भारताचे आर्थिक व सामरिक संबंध अधिक दृढ करणे हा होता. संयुक्त अरब अमिरातीमध्ये, भारताने एलपीजीचा दीर्घकालीन पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी आणि आपले सामरिक पेट्रोलियम साठे मजबूत करण्यासाठी महत्त्वाच्या करारांवर स्वाक्षरी केली.

## संयुक्त अरब अमिरातीसोबत महत्त्वाचे करार

अबूधाबी नॅशनल ऑइल कंपनीला भारतातील आपली कच्च्या तेलाची साठवण क्षमता ३० दशलक्ष बॅरलपर्यंत वाढवता येणार आहे. याव्यतिरिक्त, संयुक्त अरब अमिरातीने भारतात ५ अब्ज अमेरिकी डॉलरच्या गुंतवणुकीचे वचन दिले आहे.

# द्रष्टे समाजसुधारक स्वातंत्र्यवीर सावरकर

निमित्त
प्रा. विजय जोशी (निवृत्त)



**स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपले संपूर्ण जीवन भारतमातेच्या समृद्धतेसाठी व सुरक्षिततेसाठी समर्पित केले. आपण सर्व भारतीयांनी परस्परांतील सर्व प्रकारचे मतभेद, जातिभेद, पंथभेद, धर्मभेद विसरून हा देश माझा व मी या देशासाठी आहे, असा या राष्ट्राच्या हितासाठीच माझे जीवन कसे कृतिशील होईल, याबाबत संकल्प करणे, हीच स्वातंत्र्यवीर सावरकरांना त्यांच्या २८ मे रोजी असलेल्या जयंतीनिमित्त खरी आदरांजली ठरेल.**

भारतभूमी नवरत्नांची खाणच. भारताच्या इतिहासाची पाने पाहिली असता प्रत्येक पानावर थोर विभूतींचेच दर्शन होते. राष्ट्राचा गौरवशाली इतिहास डोळ्यांसमोर उभा राहतो. भारताच्या गतकाळातील राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, भौगोलिक, वैज्ञानिक आदी जीवनामध्ये कालपरत्वे विविध स्थित्यंतरे घडून आली आहेत. या देशातील नागरिक या सर्व घटनांचे साक्षीदार आहेत. राष्ट्रीय जीवनातील काही स्मृती व घटना या प्रेरक, अभिमानास्पद तसेच गौरवास्पद आहेत. अशा स्मृतींचे वारंवार स्मरण केल्याने नागरिकांचा राष्ट्राप्रती असणारा अभिमान जागा होतो. राष्ट्रपुरुषांच्या जयंती किंवा पुण्यतिथींच्या निमित्ताने आपण अशा स्मृतींचे स्मरण करीत त्यांच्या कार्याचा आढावा घेत असतो. २८ मे २०२१ सावरकरांची जयंती.

**'ने मजशी ने परत मातृभूमीला, सागरा प्राण तळमळला'** या सावरकरांच्या कवितेचे शब्द कानावर पडताच प्रत्येक भारतीय देशभक्तीच्या भावनेने भारावून जातो. कारण सावरकर जन्मजात देशभक्त होते. ते सशस्त्र क्रांतिकारकांचे मार्गदर्शक होते. सावरकर म्हणे एक प्रतिभावान कवी, नाटककार, इतिहासाचे गाढे अभ्यासक, उत्कृष्ट वक्ता, बुद्धिजीवी समाजसुधारक, विज्ञाननिष्ठ तत्त्वचिंतक, मुत्सद्दी राजकारणी, भाषाविदचिंतक आणि सामाजिक विषमतेविरुद्ध जातिभेदाविरुद्ध लढणारे निधडे व द्रष्टे समाजसुधारक होते. माजी पंतप्रधान इंदिरा गांधी म्हणत, देशभक्ती, स्वार्थत्याग आणि साहस यांचे पर्यायी नाव म्हणजे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर होय. सावरकरांना उच्च शिक्षणासाठी लंडनमध्ये जावे लागले. लंडनमधील इंडिया हाऊसमध्ये त्यांनी प्रवेश केला. तेथेच त्यांनी सशस्त्र क्रांतिकारकांच्या समवेत ब्रिटिश शासनाविरुद्ध आंदोलने केलीत. त्यांना जन्मठेपेची शिक्षा घोषित झाली. १९११ ते १९२१ अंदमानच्या कारागृहात त्यांनी जन्मठेपेची शिक्षा भोगली. १९२१ ला त्यांची येरवडा कारागृहात रवानगी करण्यात आली. ६ जानेवारी १९२४ ला येरवडा कारागृहातून राजकारणापासून अलिप्त राहणे व रत्नागिरीस वास्तव्य या दोन अटींवर त्यांची सशर्त सुटका करण्यात आली. येरवडा कारागृहातून बाहेर पडल्यानंतर स्वातंत्र्यवीरांनी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा अभ्यास केला. त्यांना असे वाटत होते की, स्वातंत्र्य चळवळीचा परिणाम म्हणून भारताला स्वातंत्र्य मिळेल. परंतु भारताचे स्वातंत्र्य नेहमी टिकून राहावे. भारत साम संपन्न व्हावा यासाठी या देशातील सामाजिक विषमता, जातिभेद, धर्मभेद, भाषाभेद, पंथभेद, धमारतरण, परकीय जीवन पद्धतीचा वाढता प्रवाह आदी समस्या कायम स्वरूपात नष्ट झाल्या पाहिजेत, तरच हा देश जगात सामर्थ्यशाली ठरू शकतो. स्वातंत्र्यवीर सावरकर केवळ चिंतन करीत नसत. त्यांनी हिंदू महासभेच्या स्वरूपात कार्यकत्यारना सोबत घेऊन सामाजिक विषमता निर्मूलनासाठी काही सार्वजनिक उपक्रम सुरू केलेत. अशा उपक्रमांचा आज आपण आढावा घेऊया...

### अंदमान कारागृहातील सेवाकार्य

स्वातंत्र्यवीरांनी जन्मठेपेची शिक्षा भोगत असताना अंदमान कारागृहाचे रूपांतर ग्रंथालयात केले. कारागृहातील अल्पशिक्षित कैद्यांना शिक्षण कसे मिळेल, याची प्रथम व्यवस्था केली आणि त्यानंतर सावरकर व शिक्षित कैदी विविध विषयांवरील वाचन करू लागले. सावरकरांनी याच ठिकाणी भारताचा आणि युरोपचा इतिहास कैद्यांना शिकविला.

### अखिल हिंदू गणेशोत्सव

लोकमान्य टिळकांनी प्रारंभ केलेल्या सार्वजनिक गणेश उत्सवास तत्कालीन सामाजिक परिस्थिती लक्षात घेता अखिल हिंदू गणेश उत्सव असे नवे स्वरूप दिले. या उत्सवाच्या निमित्ताने अस्पृश्य समाज बांधवांना मंदिरात प्रवेश मिळाला. रत्नागिरीच्या स्त्रियांनी सर्व हिंदू जातीच्या स्त्रियांना बोलावून सामाजिक हळदी-कुंकू समारंभ केला. गणेश उत्सवात एका भंगी हिंदूने गायत्री मंत्र व वेदमंत्र म्हटले. एका भंगी कुटुंबाच्या विवाह समारंभासाठी उपाध्याय म्हणून हिंदू महासभेने एक ब्राह्मण कार्यकर्ता उपलब्ध करून दिला. ही चळवळ हळूहळू लोकप्रिय होऊ लागली होती.

### पतित पावन मंदिर

अस्पृश्यांना मंदिराचे दरवाजे खुले करण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतत्वाखाली सुरू होते. त्याला गती देण्यासाठी सावरकरांनी भागोजी बाळोजी कौर यांच्या मदतीने १९३१ च्या फेब्रुवारीत रत्नागिरीला एक उत्कृष्ट देऊळ बांधले. पतित पावनाची प्रतिष्ठापना दानशूर भागोजी कौर यांच्याच हस्ते वेदोक्तरीत्या करण्यात आली. पतित पावन मंदिर या नावाने प्रसिद्ध झालेल्या या देवळात कोणत्याही जातीच्या हिंदूला मुक्त प्रवेश होता. सावरकरी आंदोलनाची ही युगप्रवर्तक कामगिरी होती.

### सार्वजनिक सहभोजन उपक्रम

तत्कालीन समाजव्यवस्थेत रोटी बंदी होती. रोटी बंदी जातिभेद व्यवस्थेचा प्रमुख आधारस्तंभ होता. हा आधार समूळ नष्ट करण्याच्या हेतूने सावरकरांनी सार्वजनिक सहभोजन ही संकल्पना मूर्त स्वरूपात आणली. या संदर्भात सावरकर जनतेला सांगत, कोणाच्याही पंगतीला बसून खाणेपिणे करा. वैद्यकीय दृष्टीने हितकर नि स्वच्छ असलेले कोणतेही अन्न खा. त्याने तुमचा धर्म बुडणार नाही. धर्म किंवा पोट हे धर्माचे स्थान नसून मनुष्याचे अंत...करण व आत्मा यामध्ये धर्माचा खरा निवास असतो. सार्वजनिक सहभोजन उपक्रमात समाजातील वकील, पुढारी वर्ग, दिवाण, डॉक्टर आणि सर्व जातीचे लहानथोर लोकसहभागी होत होते. सावरकरांच्या या उपक्रम ासंदर्भात थोर समाजसुधारक कर्मवीर विठ्ठलराव शिंदे म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपल्या अज्ञातवासाच्या अवघ्या सात वर्षात ही अपूर्व सामाजिक क्रांती घडून आणली. देवाने माझे उरलेले आयुष्य त्यांनाच द्यावे.


### शुद्धीकरण चळवळ

तत्कालीन सामाजिक परिस्थितीचा परिणाम म्हणून हजारो हिंदू धर्मांतर करीत. सावरकरांनी त्या सर्व बंधूंना पुन्हा हिंदू धर्मात आणण्यासाठी १९२६ मध्ये समागिरी येथे शुद्धीकरण चळवळ सुरू केली. या चळवळीतून नवहिंदूच्या विवाहाची समस्या निर्माण झाली. तीही समस्या सावरकरांनी सोडविली. काही लग्नाप्रसंगी तर उपाध्येपण स्वत: सावरकरांनी केले.

(पान ४ वर)

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर जवळजवळ २८ वर्षांनी सिक्कीमची राजेशाही संपली. तिथल्या ९७ टक्के जनतेने भारतासोबत जाण्याचा निर्णय दिला. दि. १६ मे १९७५ रोजी सिक्कीम भारतात विलीन झाले. सिक्कीम भारतात विलीन होण्यामागची कारणे एखाद्या रहस्यमय, थरारक, रंजक चित्रपटालाही लाजवतील अशी आहेत. जागतिक शह-काटशह आणि भारत, तसेच भारतीय धुरंधर एक ना अनेक! सदर लेखात त्यातील काही घटनांचा घेतलेला संक्षिप्त आढावा...





# कथा सिक्कीमच्या विलयाची, भारतीय अभिमानाची!

मागोवा **योगिता साळवी**

भारत स्वतंत्र झाला. मात्र, सिक्कीमचे राजा ताशी नामग्याल यांनी भारताशी १९५० मध्ये करार केला की, सिक्कीम भारतात विलीन होणार नाही. मात्र, संरक्षण, दळणवळण आणि परराष्ट्र धोरण याबाबत भारताचे अधिपत्य सिक्कीमवर राहील. राजाने भारताशी करार केला कारण, राजा जरी बौद्धधर्मीय होता, तरी ६० टक्के जनता हिंदू होती. हिंदू जनतेचे भारताशी धार्मिक, सांस्कृतिक, आत्मिक नाते होते.

दुसरीकडे चीन तिबेटवर अत्याचार करत होता. भारताने साथ दिली नाही, तर चीन आक्रमण करून राजेशाही संपवेल आणि सिक्कीम गिळंकृत करेल, ही भीतीही राजाला होतीच. त्यामुळे राजाने भारताशी 'संरक्षित करार' केला. मात्र, पुढे जाऊन राजाचा मुलगा राजकुमार पालदेन थोंडुप नामग्याल यांनी वेगळी भूमिका घ्यायला सुरुवात केली. संयुक्त राष्ट्राकडे मागणी करून, सिक्कीमला स्वतंत्र देश घोषित करण्याचे विचार ते बोलू लागले. सिक्कीमची जनता भारतासोबत असताना, जनतेच्या विरोधात जाऊन राजकुमार पालदेन अचानक असे का बोलू लागले असतील? सिक्कीम भारतात कसे विलीन झाले? तर त्यावेळी जगाच्या पटलावर खूप काही घडत होते. आशिया खंडावर वर्चस्व कुणाचे, यावरून अमेरिका आणि रशिया एकमेकांना शह-काटशह देत होते. त्याचवेळी भारत स्वतंत्र झाला. मात्र, सिक्कीम भारतात विलीन झाले नव्हते. तिथे नामग्याल या बौद्ध राजांची राजेशाहीच होती.

सिक्कीम भारतात विलीन होण्याऐवजी स्वतंत्र देश म्हणून राहिले, तर त्यावर प्रभाव टाकून आशिया खंडात प्रभाव टाकता येईल, रशियावर मात करता येईल, असा विचार अमेरिका करत होती. सिक्कीमच्या राजाने स्वतंत्र देश म्हणून राहायचा निर्णय घेतल्यास, सिक्कीम भारतात विलीन होऊ शकत नव्हते. याच पार्श्वभूमीवर पुढे सिक्कीममध्ये वेगवान घटना घडल्या. ६०च्या दशकात राजे पालदेन थोंडुप नामग्याल यांना तीन अपत्ये होती. अचानक त्यांच्या पत्नीचे निधन झाले. एकाकी दुखी असलेले पालदेन, शहरातील सगळ्यात महागड्या आणि विलासी बारमध्ये बसले होते. तिथेच अमेरिकेहून एक अतिआधुनिक १९ वर्षांची युवती, होप कुक फिरण्यासाठी आली. तिने पालदेन यांच्याशी ओळख करून घेतली.

काहीच दिवसांत त्यांचे प्रेमही झाले. त्या १९ वर्षांच्या युवतीने, तिच्यापेक्षा वयाने दुप्पट असलेल्या ३९ वर्षांच्या राजकुमाराशी लग्न करण्याचा निर्णय घेतला. परदेशी अमेरिकन आणि तेही ख्रिश्चन असलेली युवती राजघराण्यात जर सून म्हणून आली आणि पवित्र राजवाड्यात तिचे पाऊल पडले, तर शेकडो वर्षांच्या राजघराण्याचा नाश होईल, खानदान उद्ध्वस्त होईल, असे त्या राजघराण्याच्या धर्मगुरूंनी आणि राजज्योतिषांनी सांगितले. पण, राजकुमार पालदेन त्या युवतीच्या प्रेमात आकंठ बुडाले होते, त्यांनी ऐकले नाही. १९६३ साली त्यांचा बौद्ध पद्धतीने विवाह झाला. पुढे पाच वर्षांनी इटलीची एडविगे अँटोनिया आल्बिना मैनो यांची ओळख, भारताच्या पंतप्रधान इंदिरा गांधी यांचे पुत्र राजीव गांधी यांच्याशी झाली.

दोघांचा प्रेमविवाह झाला आणि एडविगे अँटोनिया भारताच्या सत्ताधारी घराण्यात 'सोनिया गांधी' म्हणून स्थिरावल्या. असो, विषयांतर झाले. पुन्हा विषयाकडे वळू. त्यानंतर काही काळातच, भारतासोबत जाण्याचा निर्णय घेणार्या ताशी नामग्याल यांचे निधन झाले. पालदेन हे सिक्कीमचे राजे झाले आणि त्यांची भूमिका बदलली. सिक्कीम राज्याने भारताशी कोणताही संबंध न ठेवता स्वतंत्र देश म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाकडे मागणी करावी, असा विचार पालदेन करू लागले. हे सगळे अतिशय वेगाने घडले. पालदेन यांच्या भूमिकेमागे आणि इतरही घटनांमागे होप कुकच होती, असा संशय व्यक्त होऊ लागला. होप कुकचे आईबाबा लहानपणीच वारले होते आणि तिचे आजोबा हे अमेरिकेचे राजदूत होते. त्यामुळे होप कुक ही अमेरिकेची हस्तक आहे, अशी चर्चा सुरू झाली.

सिक्कीमची जनता भारतात सामील होण्यासाठी उठाव करण्याची शक्यता होती. तसे होऊ नये म्हणून, पालदेनच्या सैन्याने जनतेवर निरंकुश सत्ता राबवण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यामुळे लोक अधिकच भडकले. 'राजेशाही समाप्त करा, लोकशाही राज्य हवे' म्हणत जनता रस्त्यावर उतरली. पालदेन यांनी जनक्षोभ चिरडण्याचा प्रयत्न केले. शांती प्रस्थापित व्हावी या कारणाच्या आड, संयुक्त राष्ट्रसंघ आणि त्यापाठोपाठ अमेरिका किंवा इतरही परकीय देश सिक्कीममध्ये येतील अशी चिन्हे दिसू लागली.

राजा पालदेन परकीय शक्तींच्या मदतीने भाराताविरोधात षड्यंत्र रचत आहे, असे दिसू लागताच भारतीय सैन्याने राजाच्या राजवाड्याला चारही बाजूंनी वेढा घातला. अवघ्या ३० मिनिटांत, भारतीय सैन्याने राजासकट सशस्त्र सैन्याला शरण येण्यास भाग पाडले आणि त्यांना निशस्त्र केले. पालदेन राजांना त्यांच्या राजवाड्यातच सुरक्षितपणे नजरकैदेत ठेवण्यात आले.

लष्कराच्या या कारवाईनंतर अवघ्या पाच दिवसांनी, दि. १४ एप्रिल १९७५ रोजी सिक्कीममध्ये एक ऐतिहासिक जनमत चाचणी घेण्यात आली. यामध्ये भारतीय लष्कराच्या दबावाशिवाय, सिक्कीमच्या ९७.५५ टक्के जनतेने राजेशाही पूर्णपणे संपवण्याच्या आणि स्वेच्छेने भारतात विलीन होण्याच्या बाजूने मतदान केले. शेवटी, दि. १६ मे १९७५ रोजी सिक्कीम भारतात विलीन झाले. मात्र, चीनने २००२ पर्यंत सिक्कीम हे भारताचे राज्य नसून, स्वतंत्र देश असल्याचे त्यांच्या नकाशात दाखवले. मात्र, स्व. अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना त्यांनी आक्रमक परराष्ट्रनीतीचा अवलंब करत, चीनशी वाटाघाटी केल्या. चीनने सिक्कीमला त्यांच्या नकाशात भारताचे राज्य म्हणून स्वीकारले.

अर्थातच, चीन स्वीकारतो का नाही, याच्याशी आजच्या भारताला काहीच देणे-घेणे नाही. सिक्कीमच्या विलीनीकरणाची कथा सांगण्याचा हेतू हाच की, या देशाला तोडण्यासाठी अनेक दुष्टशक्ती पूर्वीही कार्यान्वित होत्या, आजही आहेत. पण, 'भारत झिंदाबाद था, झिंदाबाद है और झिंदाबाद रहेगा!' सिक्कीमच्या विलीनीकरणाची कथासुद्धा हेच सांगते.

**सिक्कीमच्या विलीनीकरणाचा धुरंधर!**

सिक्कीम भारतात विलीन झाला आणि राणी होप कुक अमेरिकेला निघून गेली. तिने तिच्या आत्मचरित्रात लिहिले की, भारताचे गुप्तहेर राजवाड्यात सर्वत्र होते. स्वयंपाकी, माळी आणि स्वच्छता कर्मीसुद्धा. मी आणि पालदेन शयनगृहात काय बोललो, काय चर्चा केली, याची बित्तंबातमी भारताला मिळत होती. त्यामुळेच पालदेनने संयुक्त राष्ट्रसंघाला भारतात आमंत्रित करण्याचे नुसते म्हटल्याबरोबर, काहीच तासांत भारतीय सैन्याने राजवाड्याला घेराव घालून आम्हाला बंदी केले. तसेच जनतेनेही भारतीय सैन्याला साथ दिली. होप कुकचे म्हणणे अगदी खरे होते.

पाकिस्तानमध्ये सध्या 'अज्ञात' व्यक्तींचे जे तांडव सुरू आहे, तेच आणि तसेच तांडव त्यावेळी सिक्कीममध्ये सुरू होते. कारण, सिक्कीममध्येही एक 'धुरंधर' त्यावेळी होता.

सिक्कीमचे शेवटचे राजे (पालदेन) आणि त्यांची अमेरिकन पत्नी होप कुक यांच्या माध्यमातून, अमेरिकेची गुप्तहेर संघटना 'सीआयए' हिमालयातील या धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाच्या भागात आपला प्रभाव वाढवत होती. उत्तरेकडे चीनचा धोका आणि राजवाड्यातील भारतविरोधी कारवाया लक्षात घेऊन, दिल्ली सरकारने 'इंटेलिजन्स ब्युरो'च्या एका तरुण अधिकार्याला सिक्कीममध्ये पाठवले. हा तरुण तिथे 'सबसिडियरी इंटेलिजन्स ब्युरो' (एसआयबीचा) प्रमुख म्हणून कार्यरत होता. या तरुणाने सिक्कीममध्ये भूमिगत राहून, स्थानिक लोकांमध्ये प्रवेश केला.

सिक्कीममधील राजेशाहीविरोधी पक्षांना, विशेषतः काझी लेंडुप दोरजी यांच्या 'सिक्कीम नॅशनल काँग्रेस'ला एकत्र आणण्यात आणि बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. स्थानिक वृत्तपत्रे आणि विद्यार्थी संघटनांच्या माध्यमातून त्यांनी, राजवाड्यातील अंतर्गत कारवाया आणि अमेरिकन राणीच्या संशयास्पद भूमिकेबद्दल जनजागृती केली. त्यामुळे राजाविरोधी लाट अधिक तीव्र झाली. तरुणाने साम-दाम-दंड-भेद वापरून, सिक्कीमच्या जनतेमध्ये धर्मसंस्कृती प्रेम आणि भारतप्रेम प्रज्वलित केले. जनतेला भारतासोबत राहायचे आहे हा गुप्त अहवाल, त्या तरुणानेच भारत सरकारला दिला होता. त्यानुसार, भारतासोबत जायचे की नाही ही जनमत चाचणी जेव्हा घेतली गेली, तेव्हा सिक्कीमच्या ९७ टक्के जनतेने भारतासोबत जाण्यासाठी मतदान केले. सिक्कीमच्या भारतामधील विलीनीकरणामध्ये सिंहाचा वाटा असणारा हा धुरंधर कोण होता? तो तरुण, ते धुरंधर होते, अजित डोवाल!

# बालगृहात बालपण: संरक्षण की कारावास?

पोरकी पोरं **डॉ. तुषार सावरकर**

समाजातील प्रत्येक मुलाला सुरक्षित, प्रेमळ आणि सन्मानपूर्ण बालपण मिळावे ही आदर्श कल्पना आहे; वास्तवात अनेक मुलांचे बालपण कुटुंबाच्या सुरक्षित छत्राखाली घडत नाही. काही मुले अनाथ असतात, काहींचे पालक त्यांची काळजी घेण्याच्या स्थितीत नसतात, तर काही मुलांना अत्याचार, दुर्लक्ष किंवा गंभीर सामाजिक परिस्थितींमुळे घरापासून दूर जावे लागते. अशा वेळी राज्य आणि समाजाच्या संरक्षण व्यवस्थेत बाल संगोपन संस्था (Child Care Institutions - CCIs) महत्त्वाची भूमिका बजावतात. सामान्य भाषेत ज्यांना बालगृह, निरीक्षणगृह किंवा आश्रयगृह म्हटले जाते, त्या संस्था मुलांना निवारा, शिक्षण आणि पुनर्वसन देण्यासाठी उभारल्या आहेत.

भारतामध्ये अशा संस्थांची संख्या मोठी आहे. विविध सरकारी अहवालांनुसार देशभरात सुमारे ९५०० पेक्षा अधिक बाल संगोपन संस्था कार्यरत आहेत, ज्यामध्ये लाखो मुले राहतात. कागदोपत्री पाहता या संस्था मुलांच्या संरक्षणासाठी उभारल्या गेल्या आहेत. परंतु या संस्थां धील वास्तवाचा विचार केला तर एक अस्वस्थ करणारा प्रश्न उभा राहतो. बालगृहातले जीवन खरोखर संरक्षण देते की ते एका वेगळ्या प्रकारच्या संस्थात्मक बंदिस्त आयुष्यात रूपांतरित होते? बालगृहांची संकल्पना मूलतः संवेदनशील आहे. ज्या मुलांना कुटुंबाचा आधार नाही, त्यांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणे हा त्यामागचा उद्देश आहे. अनेक संस्थांमध्ये कर्मचारी प्रामाणिकपणे काम करीत असतात. मुलांना निवारा, शिक्षण आणि काही प्रमाणात आरोग्यसेवा दिली जाते. काही मुलांसाठी ही ठिकाणे जीवनाला नवी दिशा देणारीही ठरतात. मात्र, या सकारात्मक चित्रामागे काही गंभीर प्रश्नही आहेत. संस्थात्मक संगोपनाचा सर्वात मोठा परिणाम म्हणजे बालपणाचे नैसर्गिक वातावरण हरवणे. कुटुंबात वाढणाऱ्या मुलांना आई-वडिलांचे प्रेम , घरातील संवाद, भावंडांचे नाते आणि दैनंदिन आयुष्यातील अनौपचारिक अनुभव मिळतात.



बालगृहात मात्र जीवन नियम, वेळापत्रक आणि संस्थात्मक शिस्तीच्या चौकटीत घडत असते. उठण्याची वेळ, जेवणाची वेळ, अभ्यासाची वेळ, खेळाची वेळ सगळे काही निश्चित असते. अनेकदा मुलांच्या वैयक्तिक आवडी, भावनिक गरजा किंवा वैयक्तिक अभिव्यक्त यांना पुरेशी जागा मिळत नाही. बालपणाचे वैशिष्ट्य म्हणजे स्वातंत्र्य, उत्सुकता आणि अनुभवांची विविधता. परंतु संस्थात्मक वातावरणात वाढणाऱ्या मुलांना अनेकदा या नैसर्गिक अनुभवांपासून दूर राहावे लागते. त्यामुळे काही मुलांमध्ये एकाकीपणा, असुरक्षितता आणि आत्मविश्वासाचा अभाव निर्माण होऊ शकतो. अनेक अभ्यासांमध्ये असे दिसून आले आहे की, संस्थांमध्ये दीर्घकाळ राहणाऱ्या मुलांना समाजात परत समायोजन करण्यात अडचणी येतात. याशिवाय, काही बालगृहांमध्ये व्यवस्थेतील त्रुटीही गंभीर स्वरूपात समोर आल्या आहेत. उदाहरणार्थ, २०१८ मध्ये बिहारमधील मुजफ्फरपूर येथील आश्रयगृह प्रकरणाने संपूर्ण देश हादरला होता. एका सामाजिक लेखापरीक्षण अहवालातून तेथील मुलींवरील लैंगिक अत्याचार उघडकीस आले आणि नंतरच्या तपासात अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या. ही घटना केवळ एका संस्थेपुरती मर्यादित नव्हती; तिने संपूर्ण बालसंरक्षण व्यवस्थेतील देखरेखीच्या कमतरतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले. त्याचप्रमाणे, २०१९ मध्ये दिल्लीतील एका आश्रयगृहात मुलांवरील शारीरिक अत्याचार आणि दुर्लक्षाच्या तक्रारी समोर आल्या, ज्यामुळे देखरेख आणि उत्तरदायित्वाची गरज अधोरेखित झाली. महाराष्ट्र, उत्तर प्रदेश आणि इतर राज्यांमधील काही अहवालांतही पायाभूत सुविधांचा अभाव, कर्मचारी प्रशिक्षणाची कमतरता आणि मुलांच्या भावनिक गरजांकडे दुर्लक्ष यासारख्या समस्या नोंदविल्या गेल्या आहेत. या घटना सर्व संस्थांबाबत लागू नसल्या, तरी त्या व्यवस्थेतील संरचनात्मक त्रुटी अधोरेखित करतात. या पृष्ठभूमीवर तज्ज्ञांचे मत स्पष्ट आहे.

संस्थात्मक संगोपन हा बालसंरक्षणाचा शेवटचा पर्याय असायला हवा. शक्य असल्यास मुलांना कुटुंबासारख्या वातावरणात वाढण्याची संधी देणे अधिक योग्य मानले जाते. त्यामुळे दत्तक प्रक्रिया, फॉस्टर केअर (पालकत्व), नातेवाईकांकडे संगोपन आणि समुदाय आधारित काळजी या पर्यायांना प्रोत्साहन देण्याची गरज आहे. त्याच वेळी बालगृहांची गरज पूर्णपणे नाकारता येत नाही. अनेक मुलांसाठी ती तात्पुरती सुरक्षित जागा असते. परंतु या संस्थांचे स्वरूप अधिक मानवी, बालकेंद्रित आणि खुले असणे आवश्यक आहे. मुलांना केवळ निवारा देणे पुरेसे नाही; त्यांना भावनिक आधार, संवादाची संधी आणि स्वतःची ओळख घडवण्याची मोकळीक मिळणे तितकेच महत्त्वाचे आहे. शासन, स्वयंसेवी संस्था आणि समाज यांच्यातील समन्वय येथे अत्यंत महत्त्वाचा ठरतो. नियमित सामाजिक लेखापरीक्षण, स्वतंत्र निरीक्षण यंत्रणा, प्रशिक्षित कर्मचारी, समुपदेशन सेवा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण या गोष्टींची प्रभावी अंमलबजावणी करणे गरजेचे आहे तसेच मुलांना क्रीडा, सांस्कृतिक उपक्रम आणि समाजाशी संवादाची संधी आवश्यक आहे. परंतु शेवटी प्रश्न केवळ संस्थांचा नाही; तो समाजाच्या दृष्टिकोनाचाही आहे. बालगृहातील मुले ही समाजाचा समान भाग आहेत. त्यांच्या आयुष्यातील सुरुवातीची परिस्थिती कठीण असली, तरी त्यांचे भविष्य संधींनी भरलेले असू शकते. जर समाजाने त्यांच्याकडे संवेदनशीलतेने पाहिले तर. बालगृह हे मुलांसाठी सुरक्षित आश्रयस्थान असायला हवे, भिंतींनी बंदिस्त जग नव्हे. संरक्षण आणि स्वातंत्र्य यामधील समतोल राखणे हीच या व्यवस्थेची खरी कसोटी आहे. कारण प्रत्येक मुलाला केवळ सुरक्षित छप्पर नव्हे तर मुक्त, सन्माननीय आणि आनंदी बालपण मिळण्याचा मूलभूत अधिकार आहे.

# गन्ने का रस

कथा **आरती देशपांडे**



एप्रिल महिन्याच्या त्या रणरणत्या उन्हात रस्त्यावर चिटपाखरूही दिसत नव्हते. उन्हाच्या झळा अंगावर येत होत्या. मधूनच वावटळीचा धुराळा उठला की शरीर आणि कपडे पूर्ण धुळीने माखून जात होते. रामशरण आणि तिलकधारी मात्र नेटाने हातगाडीवर उसाचे भारे ओढत चालले होते. वन विभागाच्या कार्यालयापाशी त्यांना जायचे होते. ती जागा गावापासून जरा दूरच होती. कार्यालयाभोवती चिचबिलाई, भोकर, सिसम,सागवान, चिंच अशी उंच आणि डेरेदार सावली देणारी झाडे होती. त्यामुळे तो परिसर शांत आणि रमणीय वाटायचा.

चिंचेच्या मोठ्या झाडाच्या सावलीत त्यांनी हातगाडी थांबवली. रस्त्याच्या एका बाजूला वन विभाग आणि पलीकडे शासकीय कर्मचाऱ्यांची निवासस्थाने! जरा मोकळी, स्वच्छ जागा पाहून त्यांनी सगळा ऊस खाली उतरवला आणि एका बाजूला व्यवस्थित रचून ठेवला. रिकामी गाडी घेऊन तिलकधारी निघून गेला. रामशरण घामाने निथळला होता.

डोक्यावरचे पागोटे उशाला घेऊन तो जरा आडवा झाला आणि काही क्षणातच त्याला गाढ झोप लागली. रस्त्याच्या पलीकडून दहा भिरभरते, छोटे छोटे डोळे, ऊस आणि झोपलेला रामशरण यांच्याकडे पाहात होते. झाडाखाली हातगाडी थांबल्यापासून रामशरण झोपेपर्यंत सगळ्या हालचाली त्यांनी टिपल्या होत्या. आठ- दहा वर्षांची ती पाच मुलं होती. उन्हाळ्याच्या सुट्टीत कोणालाही घरात डांबलेलं आवडायचे नाही. मित्र जमले की पत्ते, कॅरम, लूडो, व्यापार असे बैठे खेळ घरात खेळायचे. आरडाओरडा, हसणं-खिदळणं, भांडणं नाही झाली तर ती मुलं कसली! त्या दिवशी सत्ती-लावणीचा खेळ सुरू होता, तीन डाव झाले होते आणि तिन्ही वेळा चंदू सुटला होता. चौथ्या डावात संजू चिडला आणि डाव उधळून बाहेर पडला. त्याच्या पाठोपाठ सुधीरही उठला. घराच्या आडोशाला गाडी ठेवायला एक झोपडी होती. त्या सावलीत दोघे उभे राहिले. म्होरक्या उठून गेल्यावर बाकी चिल्ली- पिल्ली काय करतील? सगळेच झोपडीत लपून बघू लागले. रामशरणची उसाची गाडी संजूच्या नजरेत भरली होती. हिरवाकंच रसरशीत उसाकडे सगळे लोभस नजरेने पाहू लागले.

''संज्या, ऊस आणायचा का?'' सुधीरने विचारले. ''आणू या, पण हे पोट्टे बोंबलतील ना.'' इतर मुलांकडे हात दाखवत संजू बोलला. ''नाही नाही, आम्ही नाही सांगणार.'' असं सगळी मुलं एका सुरात म्हणाली. ''चल सुध्या...'' असं म्हणत संजूने सुधीरचा हात धरला आणि हळूहळू चालत दोघे रस्त्याच्या पलीकडे उसापर्यंत पोहोचले. रामशरण अजूनही घोरत पडला होता. उसाचा मोठा ढीग बाजूलाच पडला होता. संजूने आजूबाजूला पाहिले आणि सुधीरला खूण करून एक ऊस झटकन उचलला आणि पळत झोपडीच्या मागे पोहोचला. पाठोपाठ सुधीरही आला. त्या अचाट साहसाने दोघांनाही घाम फुटला होता. थोडा दम घेत संजूने आपल्या एका पायावर उभं राहात गुडघ्यावर ऊस आपटून तोडण्याचा प्रयत्न केला सिनेमात दाखवतात तसं, पण तोल जाऊन तोच पडला, तशी इतर मुलं फिदीफिदी हसली. ''अबे, फाटऱ्यांनो, तोडून दाखवा पयले, दात दाखवून राह्यले...'' खाली बसल्याबसल्याच रागावून तो बोलला. लागूनच राजाचं घर होतं.

''मी विळी घेऊन येतो'' असं तो म्हणाला. ''नको, तू समोरून आत जा आणि मागचं दार उघड, अंगणात बसून आपण ऊस खाऊ, इथे सगळ्यांना दिसतं.'' ''पण एकदा घरात आल्यावर आई बाहेर जाऊ देणार नाही.'' राजा बोलला. ''अबे हळूच जा, काकू झोपल्या आहेत. मी मघाशी समोरच्या दाराला बाहेरून कडी लावली होती.'' असं विन्याने सांगितले. 'हो' अशी मान हलवत राजा हळूच घरात शिरला. बाकी सगळी मुलं मागच्या दारापाशी, हातात ऊस घेऊन बजरंगबलीच्या थाटात! दरवाजा उघडला तर समोर चंद्रभागा मोलकरीण! 'सॉरी, सॉरी' म्हणत संजू भागेच्या हाताखालून आत घुसला आणि पाठोपाठ सगळी गँग! भागाबाई डोळे मोठे करून पाहू लागली, तसं भागाबाईला विश्वासात घ्यावंच लागेल, हे संजूने ओळखले. तोंडावर तर्जनी ठेवून 'शऽ शऽऽ' बोलायचं नाही अशी खूण केली. ''भागाबाई, ऊस बघा किती छान आहे, तीन तीन तुकडे करा, एकेक आम्हाला द्या आणि एक तुम्ही घ्या.'' असं म्हणत दोन्ही ऊस तिच्या हातात दिले. भागाबाई खूश झाली. आता विळीने काप की सुरीने ते तिचे काम होते. मुलं दबक्या आवाजात बोलू लागली. ''अबे, त्या गाडीवाल्याच्या लक्षात आलं तर बे.'' विन्या बोलला. 'अबे एवढ्या मोठ्या ढिगाऱ्यातून दोन ऊस गेले तर काय फरक पडतो बे त्याला? भागाबाई, विन्याचा ऊस तुम्हीच घ्यावा.'' ''नाही बे, मी असंच म्हंटलं.''उसाचे पाच तुकडे, प्रत्येक मुलाला एक असे वाटले गेले आणि एक थोरला तुकडा भागाबाईने स्वतःसाठी ठेवला. विळी पाण्याने धुवून जागेवर ठेवून ती मुलांकडे पाहात बसली. सगळी चमू ऊस खाण्यात मग्न होती. पण असा पूर्ण ऊस खाणं आंबा-पेरू खाण्याएवढं सोपं नाही, हे दिसूनच आलं उसाचे साल दातात धरून सोलणं जमत नव्हते.

लहानग्या तोंडात उसाचे कांडे जात नव्हते. धारदार सालीने ओठ कापले, पण जसा जमेल तसा ऊस खाणं सुरू होतं. रसाचे ओघळ हातावर आणि गालावर नक्षीकाम करून गेले. चिकट हात पुसण्याचे पहिले साधन म्हणजे चड्डी आणि शर्ट! कपड्यांना रस चिकटला होता, त्यावरच धूळ आणि उसाचा चोथा! थोडक्यात, आइ बाबांच्या हातून मार खाण्याची पूर्ण तयारी झाली होती. अंगणात सगळीकडे उसाचे कांडे विखुरले होते. खाल्लेल्या उसाचा चोथा मध्येच थुंकल्यामुळे पायाला लागत होता. चिकट पायाने राजा दोन वेळा घरात मीठ आणायला गेला होता. बिनानिमंत्रणाच्या माशा जमल्या होत्या. एकंदरीत राजाचं काही खरं दिसत नव्हतं. ''काकू उठल्या का बे राजा'' असं संजूने विचारलं तोच, 'राजाऽऽ' अशी हाक मारत काकूच बाहेर आल्या. अंगणातील विविध मनोरंजक वस्तूंचे प्रदर्शन पाहून पहिला रट्टा राजाच्या पाठीवर बसला... तोपर्यंत बाकी मुले पसार झाली होती. संध्याकाळी ऊन्ह उतरल्यावर कपडे बदलून आणि आपापल्या आयांचे मार खाऊन सगळी वानरसेना रस्त्याच्या कडेला असलेल्या पुलावर एका रांगेत शिस्तीने बसली होती.

(पान ६ वर)



# भारताच्या शोधात फाहिआन

वळणावरच्या नोंदी
**स्वाती काळे**

हिंदुस्तान प्राचीन काळापासून सुजलाम् सुफलाम् देश होता. इ. स.पहिल्या शतकापासून हिंदुस्तानातला व्यापार बहराला आला. गुप्तघराण्याच्या राजवटीत इ. स. तिसऱ्या शतकापासून ते पाचव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत भारताने सुवर्णयुग अनुभवले. मलेशिया, कंबोडिया, थायलंड येथल्या बंदरांमध्ये भारतीय व्यापाऱ्यांच्या मोठमोठ्या पेढ्या होत्या. जावा सुमात्रामध्ये मसाल्याची बाजारपेठ होती. घोड्यांचा, शस्त्रांचा, कापडांचा व्यापारभारतीय व्यापाऱ्यांना फायदेशीर ठरत होता. शेतीचे उत्पन्न शिगेला पोचले होते. राज तिजोऱ्यांमध्ये नाण्यांचा खणखणाट होता. सामाजिकदृष्ट्या तो काळशांततेचा आणि भरभराटीचा होता. बौद्ध धर्मप्रसारक या काळातच व्यापारीवर्गासोबत धर्माचा प्रसार करू लागले. याच काळात वैदिक धर्मा तलवचीकता येऊ लागली. याच दरम्यान 'फाहिआन' नावाचा चिनी बौद्ध प्रवासीभारतात येण्यासाठी निघाला (इ. स. ३९९). त्याची ही गोष्ट. त्याचे आडनाव'कुंग' होते. पिंग-यांगमधील वुयांग प्रदेशात त्याच्या कुटुंबाचे वास्तव्य होते. त्याचे दुधाचे दातही पडले नव्हते तेव्हा त्याच्या तिन्ही भावांना त्याने शेवटचा निरोप दिला. फाहिआनच्या जन्मानंतर त्याच्या वडिलांनी ठरवलेच होते; आता याला मठालाच अर्पण करायचे. पण गोंडस फाहिआनला बघून त्यांना मोह आवरायचानाही आणि ते लहानग्या फाहिआनला घरीच ठेवायचे. एके दिवशी फाहिआनने अंथरूण धरले. मग मात्र त्याच्या वडिलांनी घाबरून त्याला मठात पाठवले. फाहिआन आता १० वर्षांचा बालक झाला होता. मठात तो चांगलाच रुळला होता. पण अचानक त्याच्या वडिलांना मृत्यू आला. त्याच्या काकांना वाटले, आता फाहिआनची आई एकटी पडणार. तिच्यासाठी त्याने फाहिआनला घरी बोलावले. फाहिआनने शांतपणे उत्तर दिले, ''मी फक्त माझ्या वडिलांच्या इच्छेखातर मठात गेलो नाही तर व्यावहारिक आयुष्याचे पाश नकोत म्हणून मठात गेलो. आता या निर्णयापासून मागे फिरणार नाही.''

वयाच्या १० व्या वर्षी त्याच्या आयुष्याचे ध्येय त्याला माहीत होते. त्यामुळे त्याच्या काकांनीदेखील त्याला घरी येण्याचा आग्रह केला नाही. काही वर्षांत त्याची आईदेखील वारली. तिला अखेरचा निरोप द्यायला तो लहानगा आला होता; पण लगेच तो मठात माघारी फिरला. एकदा शेतात भात कापणी करीत असताना अचानक तेथे चोर घुसले.फाहिआनबरोबरचे इतर श्रमण घाबरून सैरावैरा पळाले. फाहिआन मात्र तेथेच ठामपणे उभा राहिला. ''जर तुम्हाला धान्य चोरून न्यायचे असेल तर खुशाल न्या. तुम्ही तुमच्या पूर्वकर्मांमध्ये कधीच दानत दाखवली नाही. त्यामुळे तुमच्यावर ही परिस्थिती ओढवली आहे. त्यामुळे तुमच्या कुकर्माचे फळ म्हणून तुम्हाला भविष्यात त्यापेक्षाही वाईट दिवस येतील.'' असे बोलून फाहिआन मठाकडे जाऊ लागला.

फाहिआन बुद्धिवान, चारित्र्यशील आणि धिरोदात्त होता. आयुष्याचे ध्येयत्याला माहीत होते. त्याचे भारतात येण्याचे कारण 'विनय पिटक' या बौद्धधर्माच्या मूळ ग्रंथाचा शोध घेणे हेच होते. भारतात आणि श्रीलंकेत तो इ. स.३९९ ते इ. स. ४१४ दरम्यान होता. याच प्रवास वर्णनाचे पुस्तक 'रेकॉर्ड ऑफबुद्धिस्टिक किंगडम्स' तो चीनमध्ये परत आल्यावर प्रकाशित झाले. त्याचेभारतात येण्याचे कारण धार्मिक असले, तरी तत्कालीन सामाजिक परिस्थितीचेप्रतिबिंब त्याच्या लेखनात दिसते. चीनमध्ये बौद्ध धर्म इ. स. पहिल्या शतकातच माहिती असावा. हान वंशाचाचिनी सम्राट 'मिंग ती'ने कश्यप मातंग आणि धर्मरत्न या दोन भिक्षूंना इ. स.६७ मध्ये चीनला निमंत्रण दिले होते. त्यांनी बौद्ध धर्मसूत्रांचा चीनमध्ये प्रसारकेला आणि त्या देशात बौद्ध धर्माची मुहूर्तमेढ रोवली गेली असे म्हणतात. कश्यप मातंग आणि धर्मरत्न या भिक्षूंनी भाषांतरित केलेले दोनच ग्रंथ मठातउपलब्ध होते.

बुद्धिमान फाहिआनची जिज्ञासा केवळ या दोन भाषांतरितग्रंथांमुळे पूर्ण होत नव्हती. त्याने ठरवले की, भारतात जाऊन मूळ ग्रंथांच्या प्रती घेऊन यायचे. बौद्धदर्शन वाङ् याला 'त्रिपीटक' म्हणतात. सूत्रपिटक, विनयपिटक आणि अभिधर्मपिटक अशी या तीन पिटकांची नावे आहेत. प्रवासाला निघण्यापूर्वी गुरू आचार्य कुमारजीव यांचे आशीर्वाद घ्यायला फाहिआन विसरले नाही. आचार्य कुमारजीव म्हणाले, 'धार्मिक अध्ययनाबरोबरच तेथील लोकांच्या चालीरीती आणि त्यांच्या जगण्याचाही अभ्यास कर.' हा सल्ला तंतोतंत पाळल्यामुळे फाहिआनचे प्रवास वर्णन भारताच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण असा ऐतिहासिक दस्तऐवज आहे. छांग-आन या राजधानीतून त्यांचा प्रवास सुरू झाला. रस्त्यात त्यांना छांग- येहला अजून पाच भिक्षू भेटले. हे पाचही भिक्षुक एकाच ध्येयाने पछाडले होते. आता एकूण १० जण लुंग पर्वतरांग ओलांडून चीनच्या पश्चिमसीमेकडे चालले होते. यातील एक भिक्षुक पाओ-युन यांनी भारतातून परतल्यानंतर अनेक संस्कृत ग्रंथांचा अनुवाद केला. त्यातील एकच अनुवादितग्रंथ उपलब्ध आहे.

दरमजल करीत ते चीनच्या भिंतीजवळ डुंनहुआंग गावी पोहोचले. तेथून त्यांना गोबीचे वाळवंट पार करायचे होते. हे वाळवंट पार करणे फार कठीण गोष्ट होती. तेथे साधा पक्षीही उडताना दिसत नव्हता. गरम वाऱ्याचे झोतप्रवाशांना जाळून टाकत होते. पक्षी-प्राणी दूरवर दिसत नव्हते, पण आसपासराक्षसांचा वावर मात्र जाणवत होता. वाळूच्या टेकड्या वाऱ्याच्या गरमझोताबरोबर धावत होत्या. अगोदरच्या प्रवाशांची पांढरी हाडे सगळीकडेविखुरलेली होती.इच्छा तेथे मार्ग असतो असे म्हणतात. डुनहुआंग महत्त्वाचे लष्करी ठाणे असल्यामुळे तेथील श्रद्धाळू अंमलदाराची हे भीषण वाळवंट पार करण्यासाठी फार मोठी मदत मिळाली. पण वाळवंट पार करायला त्यांना तब्बल १७ दिवस लागले. दररोज कमीत कमी २५ किलो मीटर चालून हे वाळवंट केवळ दुर्दम्य इच्छाशक्तीमुळे त्यांना पार करता आले.

गोबीचे वाळवंट पार केले आणि नंतरते 'शेन-शेन' नावाच्या राज्यात पोहोचले. हे राज्य सध्या कुठे आहे याबद्दल निश्चितपणे माहीत नसले, तरी 'लोब' या कोरड्या पडलेल्या खाऱ्या पाण्याच्यासरोवराच्या दक्षिणेला 'सिल्क रूट'वरचे हे राज्य असावे, असा तर्क आहे. फाहिआन म्हणतो, ''येथील लोकांचे जाडेभरडे कपडे पाहून आपल्याच लोकांची आठवण येते.'' त्याच्या वर्णनानुसार इथे हीनयान पंथाचे चार हजारांवर अनुयायी भारतीय ग्रंथांच्या आधारे, भारतीय भाषेत अध्ययन करीत होते.

राजाही हीनयान पंथाचा होता. सोप्या शब्दात हीनयानपंथी म्हणजे बुद्धाला मानव गुरू मानणारे, वैयक्तिक मोक्षाची आस बाळगणारे बौद्धधर्मीय अनुयायी. पुढे 'वू-ए', 'ऊईघुर'(सध्याचे शिनजियांग राज्य) या तुर्की वंशाच्या लोकांच्या प्रदेशातून त्यांनीअत्यंत कठीण प्रवास केला आणि 'तकलामाकन' वाळवंटाच्या किनाऱ्यावर पोचले. येथील वाळूचे डोंगर सतत एका जागेवरून दुसरीकडे उडत असायचे.तेथील 'खोतान' शहरात (शिनजियांग-राज्यातील एक ओएॅसिस) हे सर्व प्रवासी पोहोचले. येथील लोक खूप आनंदी आणि शिस्तप्रिय होते. खोतान म्हणज वाळवंटातला स्वर्गच होता. सगळीकडे हिरवळ, पाणथळीच्या जागा होत्या. बहुतांशी लोक बौद्धधर्मीय असल्याने येथे १४ मोठे विहार होते. भारत देशाचा धर्म, तत्त्वज्ञान आशिया खंडात सर्वदूर पसरले होते. येथे त्यांनी रथ उत्सव देखील पाहिला. संपूर्ण शहर स्वच्छ केले होते, सजवले होते. प्रत्येक विहाराचा स्वतःचा रथ होता. मुख्य रथात गौतम बुद्धाची मूर्ती होती. वेशीजवळ राजाने मुकुट उतरवून, हातात फुले घेऊन अनवाणी पायांनी मिरवणुकीचे स्वागत केले. खोतान शहराच्या पश्चिमेला 'नवसंघाराम' मठ तयार होण्यासाठी ८० वर्षे लागली. त्यावर सोने चांदी, रत्नांचे बारीक काम होते. फाहिआन म्हणतो की, या इमारतीचे वर्णन शब्दात करणे अशक्य आहे. फाहिआनला आता पवित्र भारतभूमीचे वेध लागले होते. तरी अजून बराच खडतरप्रवास बाकी होता.

# विष्णूचे २४ विग्रह

आनंद स्पदंन
**डॉ. अविनाश मोहरील**

विसनामी सहस्रनामी। अनन्तनामी तो अनामी। तो कैसा आहे अन्तरयामी। विवेकें ओळखावा।।'विष्णू अथांग आहे. त्याची संपूर्ण व्याख्या सहस्त्रनामांतूनही सांगता येत नाही तर केशव नारायण माधव या अवघ्या २४ नामांतून काय सांगणार? तरीही वैदिक तत्त्वज्ञानात २४ या अंकाला विशेष महत्त्व आहे. सांख्य तत्त्वज्ञानातील पंच महाभूते, पंच ज्ञानेंद्रिये, त्यांना गोचर असेशब्द, स्पर्श, रूप, रस आणि गंध असे पंचविषय, पाच कर्मेंद्रिये आणि मन, बुद्धी, अहंकार आणि प्रकृती अशी एकूण २४ तत्त्वे आहेत. या व्यतिरिक्तदिवसाचे तास, वर्षातील एकादशा, तृचाकल्प सूर्यनमस्कारांची संख्या, गायत्रीमंत्राची अक्षरसंख्या या सर्वांमागे अशी कल्पना आहे की, विश्व हे २४ मूलभूत कार्य तत्त्वांनी चालते. विष्णू हाच या तत्त्वांचा समन्वयक आणि गायत्री ही त्यातत्त्वांची मंत्ररूप ऊर्जा.

गायत्रीची अक्षर संख्या आणि केशव नारायणादि नाम संख्या यातील साम्य हा गणिती योगायोग नाही. त्यामागे ध्वनी, तत्त्व आणि चैतन्य असा व्यापक विचार आहे. संगीतातील 'सा' हा फक्त आवाज नसून ठरावीक कंप तसे मंत्राक्षरात सुद्धा विशिष्ट शक्ति बिंदू असतो. गायत्रीची २४ अक्षरे ही विश्व निर्मितीच्या शक्ती आणि विष्णुनामे म्हणजे त्या शक्तींची देवतारूप अभिव्यक्ती. मंत्र सूक्ष्म तर देवता हे त्याचे स्थूल रूप. हेच ते विष्णूचे २४ विग्रह. म्हणून **तत्** म्हणजे केशव, **स** म्हणजे नारायण, **वि** म्हणजे माधव, **तू** म्हणजे गोविंद याप्रमाणे. असेच का तर याची उत्तरे अशी-

१) **तत् किंवा केशव :** तत् म्हणजे ते परम सत्य. केशव हा ब्रह्मा, विष्णूआणि महेश यांचा अधिष्ठाता, त्रिगुणांचा नियंता, परम पुरुष. म्हणूनगायत्रीतील तत् म्हणजे केशव.

२) स म्हणजे प्रवाह, विस्तार, चेतना, सह-अस्तित्व यांचे ध्वनिचिन्ह म्हणून स म्हणजे नारायण. कारण नारायणचीव्युत्पत्ती नाराणां आयनम्- सर्व जिवांचे अधिष्ठान किंवा नार म्हणजे पाणी. तेथे राहतो तो नारायण. सृष्टीची उत्पत्ती प्रथम पाण्यातच झाली. मत्स्यावतारकिंवा डार्विन हेच सुचवतात. याप्रमाणे गायत्रीतील एकेक करून २४ अक्षरेआणि विष्णूची २४ नामे यांच्यातील संबंध दाखविता येतो. अर्थात हा नियम पाणिनीय व्याकरणासारखा काटेकोर नसून तंत्र, उपासना, ध्यानयोग, न्यासपद्धत आणि विविध परंपरागत पद्धती या सर्वांचे एकत्रीकरण आहे. म्हणूनआचमन-संध्या करताना ही नामे घेणे म्हणजे केवळ नामस्मरण नसून उर्जेचेसूक्ष्म नियोजन आहे.चोविसनामी सहस्त्रनामी : २४ पैकी २१ नामे विष्णुनामसहस्त्रातशब्दशः येतात. विष्णूला चर्तुव्यूह असेही म्हणतात. त्यातील वासुदेव हे स्वतंत्रनाम सोडले तर संकर्षण, प्रद्युम्न आणि अनिरुद्ध ही तीन नामे व्याकरणदृष्ट्याविचार केला तर तत्त्व रूपाने येतात. कसे ते पाहू-१) संकर्षण : हे नाम विष्णुसहस्त्रनामात सुटे नाही तर'दृढःसंकर्षणोच्युतः' आहे. संकर्षण म्हणजे संहारसमयी आकर्षण करणारा,सर्व, संहर्ता. प्रलयकाळी कालाच्या विकराल मुखात सृष्टीने ओढले जावे तसे.



२) प्रद्युम्नः म्हणजे प्रकर्षाने तेजस्वी. स्तोत्रात हे नाम स्वतंत्र नसून जोड नामाप्रमाणे 'प्रद्युम्नोमितविक्रमः' असा उल्लेख आहे. विष्णू हा प्रकाशात्मा, द्युतिधर आणि भास्कर द्युती आहे; शिवाय तो मित विक्रमी म्हणजेसंयमित आहे. तो क्रोधरहित आहे. (अक्षोभ्यः सर्व प्रहरणायुधः।)

३) अनिरुद्धः अनिरुद्ध म्हणजे ज्याला अडवता येत नाही, तो. अनिरुद्धोप्रथिरथ, अप्रमेय. अनंत. याप्रमाणे सर्व नामे शब्दशः असली तरी वरील तीन नामे तत्त्वशः आहेत, हे लक्षात घ्यावे. संध्या वंदनातील ही २४ नामे विष्णूचे संक्षिप्त मूर्तिरूप आहेत तर नाम सहस्रातील हजारो नामे हे त्याचे वैश्विक रूप आहे. या विश्वरूपातही काही गमती आढळतात. तेथे वामन म्हणजे ठेंगू आणि प्रांशु म्हणजे अतिशय उंच अशी विरोधी नामे सापडतात. पण हे तर ईश्वराच्या अणोरणियान् महतो महियान्चेच उदाहरण आहे. (ईश्वर अणूपेक्षा लहान नि पृथ्वीपेक्षाही महान आहे.)

२४ विग्रह १३ व्या शतकात बोपदेव नावाचे एक थोर वैद्य, संस्कृत पंडित, व्याकरणकार, तत्त्वज्ञानी विद्वान होऊन गेले. त्यांनी पाणिनीय व्याकरण सोपेकरून त्यावर मुग्धबोध व्याकरण हा ग्रंथ रचला. वैद्यक, धर्मशास्त्र आणि भागवतावरही लेखन केले. त्यांनी विष्णूच्या २४ नामांवर भाष्य केले. विष्णू कसा तर चतुर्भुज. त्याच्या चार हातात शंख, चक्र, गदा आणि पद्म अशी चार आयुधे असतात. ही केवळ युद्धातील साधने नसून त्याच्या महान विश्वकार्यातील चार मूलतत्त्वांची प्रतीके आहेत.

**(पान ६ वर)**

# तणावामुळे वाढती आक्रमकता

विवेचन
**श्रीरंग श्री. हिर्लेकर**

गेल्या आठवड्यात मला वेगवेगळ्या दोन अनुभवांमधून रस्त्यांवर फार वेगात वाढत असलेली आक्रमकता बघायला मिळाली. दोन्ही प्रसंग माझ्या लक्षात राहणारे व माझी चिंता वाढविणारे होते. माझे महाविद्यालय पुणे शहराच्या अगदी मध्यम वस्तीत स्थित असल्याने कार्यालयीन वेळेला तेथे वाहतुकीची नेहमीच कोंडी होते. प्रत्येकच शहरात सध्या वाहनांची प्रचंड संख्या वाढल्यामुळे व त्या प्रमाणात वाहतुकीचे नियोजन होत नसल्याने वाहतुकीची कोंडी होतच असते. अशाच एका कोंडीच्या दिवशी मी माझी कार घेऊन महाविद्यालयापर्यंत पोहोचण्याचा प्रयत्न करीत होतो. अगदी जवळ पोहोचल्यावर उजवीकडे वळण्यासाठी मी योग्य पद्धतीने इंडिकेटर देऊन हळूहळू गाडी वळवायला लागलो, तेवढ्यात समोरून भरधाव वेगाने एका मोटरसायकलवरून तीन तरुण मुले मी वळत असलेल्या दिशेने आले. ते आपल्याच धुंदीत असल्याने त्यांना माझी गाडी वळते आहे व मी इंडिकेटर देऊन वळतो आहे, हे लक्षातच आले नाही. यासोबतच त्यांचा वेग इतका जास्त होता की त्यांना गाडी आवरणे कठीण होते. त्यांनी थांबावे यासाठी मी जोरात हॉर्न वाजवून त्यांना सतर्क केले. अगदी माझ्या गाडीजवळ येऊन त्यांची गाडी कशीबशी थांबली.

मी सुटकेचा निःश्वास टाकला अन्यथा ती मुले गाडीसकट माझ्या कारवर आदळली असती. एकंदरीत त्यांच्या वेगात गाडी चालविण्यामुळे व नीट लक्ष न दिल्यामुळे हा प्रकार घडला. काही क्षणासाठी मला त्यांचा फार राग आला. परंतु त्यांना काहीच न बोलण्याचे मी ठरविले. असे होते कधी कधी असे स्वतःला समजावून मी ते तिघे मला 'सॉरी' म्हणतील याची वाट बघत होतो; प्रत्यक्षात उलटच झाले. माझ्या गाडीला ओलांडून ते मागे गेले आणि अत्यंत अर्वाच्य आणि असभ्य भाषेत त्यांनी बोलणे सुरू केले. या सर्व प्रकारात त्यांची संपूर्ण चूक असतानादेखील तेच आक्रमकपणे माझ्या अंगावर आले.

मी गाडीतून उतरून त्यांना उत्तर देण्याआधीच सर्वात मागे बसलेल्या मुलाने माझ्या गाडीवर जोरात हात आपटला अन् त्याच वेगात ते निघूनही गेले. हा सर्व प्रकार साधारण एका मिनिटात झाला. माझी गाडी अशी मध्येच थांबल्यामुळे अचानक वाहतूक थांबून गेली. त्यामुळे मला त्या मुलांचा विचार न करता नाईलाजाने गाडी माझ्या महाविद्यालयाच्या परिसरात न्यावी लागली. या घटनेचा विचार करता त्या मुलांच्या ठायी असलेल्या आक्रमकतेचे फार आश्चर्य वाटले.

अशाच प्रकारची किंबहुना याहून जास्त तीव्र आक्रमकता मला पुण्याहून अमरावतीला जाताना बघायला मिळाली. खरे तर सध्या समृद्धी मार्ग हा रस्ता वाहतुकीसाठी अत्यंत सोयीस्कर झालेला आहे. योग्य पद्धतीने गाडी चालविल्यास या रस्त्यावर अपघात होऊच शकत नाहीत. परंतु एक विचारात टाकणारा प्रकार मी गेल्या आठवड्यात अनुभवला.छत्रपती संभाजीनगरजवळ जरासा डोंगरांनी वेढलेला रस्ता व एक छोटा बोगदा आहे. येथे गाड्यांचा वेग कमी असायला हवा असे अपेक्षित आहे. मी गाडी चालवित असताना माझ्यापुढे एक गाडी चालली होती. समोर दोन ट्रक एका रांगेत चालले असल्याने त्याला पुढे जाता येत नव्हते. त्यामुळे मी देखील हळूहळू त्या गाडीच्या मागोमागच गाडी चालवित होतो.

अचानक मागून सुसाट वेगाने एक गाडी आली. कर्कश हॉर्न वाजवून त्याने पुढे जाण्याचा प्रयत्न केला. मी त्याला पुढे जाऊ दिले. परंतु त्यापुढे त्याला बराच वेळ जाताच आले नाही. कारण बोगद्याजवळच्या त्या रस्त्यात त्याच्या समोरच्या गाडीला ट्रक्सना ओव्हरटेक करणे जमलेच नाही. साधारण पाच मिनिटे हा वेगात गाडी चालविणारा इसम हॉर्न वाजवित राहिला, तरी त्याला पुढे जाता आले नाही.



शेवटी जेव्हा त्याला थोडीशी जागा मिळाली तेव्हा वेगात त्याने गाडी पुढे काढली आणि समोरच्या कार समोरआडवी उभी केली. काय घडतंय हे लक्षात येईस्तोवर त्याने रागारागात गाडीतून उतरून या गाडीवाल्या ड्रायव्हरला त्याच्या गाडीतून बाहेर खेचले व अक्षरशः मारणे सुरू केले. आम्ही एक- दोनजण आपापल्या गाडीतून उतरून त्यांच्या पर्यंत पोहोचेस्तोवर त्याने त्या ड्रायव्हरला लाथाबुक्क्यांनी तुडविले होते. अर्वाच्य शिवीगाळ करीत तो त्याला मारीत होता.



आम्ही त्याला थांबविले. नंतर त्याड्रायव्हरच्या नावाने ओरडतच तो आपली गाडी वेगाने चालवित निघून गेला. काय घडतंय हे कळण्याअगोदरच त्याने या ड्रायव्हरला विनाकारणच मारहाण केली. पन्नाशीला आलेला तो माणूस असावा, परंतु अत्यंत आक्रमकपणे त्याने व्यवहार केला व तो निघून गेला. त्याच्या गाडीचा नंबर एका व्यक्तीने लिहिला होता; परंतु तो विनाकारण मार खाल्लेला ड्रायव्हर तक्रार करू नका म्हणाला आणि प्रकरण तेथेच थांबले.

अमरावतीला पोहोचेपर्यंत माझ्या मनात या वाढत्या आक्रमकतेबद्दल विचार सुरू होते. अशाच प्रकारचे अनुभव आपल्याला सध्या मोठ्या प्रमाणात येताना दिसत आहेत. या सर्व बाबींचा बारकाईने विचार करता आपल्या असे लक्षात येईल की, रस्त्यांवरील हे आक्रमक स्वरूप वाढत्या ताणाचे प्रतीक आहे. दिवसांगणीक कामाच्या ठिकाणी, घरांमध्ये किंवा समाजातही ताण वाढतो आहे. एकंदरीतच सर्व व्यवस्थांमध्ये ज्याप्रकारची पारदर्शिता असायला हवी ती वरकरणी ठरत असल्याने हा ताणनिर्माण होतो आहे. या ताणाचे नियोजन करण्याच्या शास्त्रीय पद्धती आपल्याकडे उपलब्ध नसल्याने हा ताण रागामध्ये परावर्तित होताना आपल्याला दिसतो.

हा राग विशेषतः तरुण मंडळींकडून फारच जास्त आक्रमकपणे व्यक्त होताना हल्ली दिसायला लागला आहे. एखादे आंदोलन असो, मोर्चा असो किंवा निदर्शन असो तरुणांची फौज मर्यादांच्या पलीकडे जाऊन वागताना दिसते. ही बाब पोषक समाजरचनेच्या संकल्पनांना छेद देणारी आहे. तरुणपिढीला समाजाच्या विकासात्मक वाटचालीमध्ये सकारात्मक उर्जेसह सामीलकरून घेणे हे समाजातील सर्वच घटकांचे प्राथमिक कर्तव्य असायला हवे असे वाटते.

यामध्ये शिक्षण प्रक्रिया फार मोठा हातभार लावू शकते.रस्त्यांवर उमटत असलेल्या या उग्र व आक्रमक प्रतिक्रिया याच गोष्टीचे द्योतक आहेत की, आपल्या व्यवस्था तरुणांना आवश्यक त्या प्रकारचे समाधान देऊ शकत नाहीत. त्यांना रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध नाहीत. याहून महत्त्वाचे म्हणजे सामाजिक भान निर्माण करणे आपल्याला जमलेले नाही. काही प्रमाणात हे कार्य काही सामाजिक संस्था करीत आहेत.

त्यांच्या कार्याला काही प्रमाणात तरुणाईचा प्रतिसाद मिळतो आहे. एकंदरीत समस्येचे स्वरूप बघता हे प्रयत्न फार थिटे पडताना दिसतात. व्यवस्था तांत्रिक बाबींमध्ये इतक्या गुंतल्या आहेत की, त्यांच्या उपयोगीते बाबत पुनरावलोकन करण्यासाठी वेळच मिळत नाही. ते न झाल्याने फार मोठ्या प्रमाणातील मनुष्यबळ 'ठेवीले अनंते तैसेची रहावे' या भूमिकेत पोहोचलेले आहे. या किचकट तांत्रिक अडचणींमुळे नव्या संकल्पनांना मांडण्याचे धारिष्ट्यदेखील कुणी दाखवायला तयार नाही व त्यामुळे एकंदरीत मोठ्या प्रमाणात सकारात्मक बदल घडताना दिसत नाही.

आता यामध्ये सुधारणा होण्याची गरज आहे. रस्त्यांवर दिसणारी आक्रमकता गुन्हेगारीमध्ये परावर्तित होण्याची चिन्हे दिसत आहेत. तसे झाल्यास आपल्याला ही समाजव्यवस्था सांभाळणे कठीण जाईल. आपापल्या कार्यक्षेत्रात आवश्यक ते बदल करून या सगळ्या व्यवस्था समाजोपयोगी व कृतिशील विचारांना नेमक्या दिशेने कशा नेतील, याचा विचार प्रत्येकाने करण्याची गरज आहे. तो करूयात आणि येणारा काळ शांततेचा व समृद्धीचा बनविण्याच्या दृष्टीने सकारात्मक पाऊल टाकू या!

पर्यावरण **मिलिंद बेंडाळे**



**जगासमोर हळूहळू एक असे संकट उभे राहत आहे, जिथे तीव्र उष्णता आणि दुष्काळ या दोन वेगळ्या आपत्ती राहिल्या नसून एकत्रितपणे मानवी जीवनावर घातक परिणाम करीत आहेत. एका नवीन वैज्ञानिक अभ्यासानुसार हवामान धोरणांमध्ये ठोस बदल न झाल्यास या शतकाच्या अखेरीस पृथ्वीवरील सुमारे २८ टक्के म्हणजेच सुमारे २६० कोटी लोक उष्णता आणि दुष्काळाच्या दुहेरी संकटाचा सामना करीत असतील.**

# दुहेरी संकटाच्या चक्रव्यूहात जग

जगात तीव्र उष्णता आणि दुष्काळाचा धोका आजच्या तुलनेत पाच पटींनी वाढणार आहे. हे केवळ हवामानाशी संबंधित संकट नाही तर जीवन, उपजीविका आणि भविष्यावर एकाच वेळी झालेला हा हल्ला आहे. गेल्या दोन दशकांमधील कल पाहिला तर या बदलाचे संकेत स्पष्ट दिसू लागले आहेत. २००१ ते २०२० दरम्यान जगाने दरवर्षी सरासरी चार वेळा अशी परिस्थिती अनुभवली आहे, जेव्हा भीषण उष्णता आणि दुष्काळाच्या संकटाशी एकाच वेळी सामना करावा लागला. ही आकडेवारी औद्योगिक कालखंडापूर्वीच्या (१८५० ते १९००) काळाच्या तुलनेत दुप्पट आहे. या पृष्ठभूमीवर शास्त्रज्ञांनी भीती व्यक्त केली आहे की, परिस्थिती अशीच राहिली, तर या शतकाच्या अखेरीस दरवर्षी अशा घटना १० वेळा घडू शकतात आणि प्रत्येक घटना दोन आठवड्यांपर्यंत होरपळून टाकू शकते. हा हवामानातील बदल नाही, तर जीवनाचा वेग थांबवून टाकणारे संकट आहे.

शास्त्रज्ञांच्या मते, उष्णता आणि दुष्काळ एकमेकांना वाढवतात आणि ते दोन्ही एकत्र येतात, तेव्हा त्यांचा फटका अनेक पटींनी वाढतो. शेतातील उभी पिके सुकतात, पाण्याचे स्रोत आटतात, जंगले पेटू लागतात आणि बाजारपेठेत अन्नधान्याच्या किमती झपाट्याने वाढतात. उष्णता आणि उष्माघात यमराजाप्रमाणे काम करू लागतात. याचा सर्वाधिक फटका उघड्या अवकाशाखाली काम करणाऱ्यांना बसतो. त्यांच्यासाठी ही केवळ गैरसोय नसून जीवन -मरणा-चा प्रश्न बनतो. या शतकाच्या अखे-रीस परिस्थिती कशी बदलू शकते, हे समजून घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी आठ हवामान मॉडेल्सवर आधारित १५२ सिम्युलेशनचे विश्लेषण केले आहे. त्याचा तपशील 'आयपीसीसी'च्या सहाव्या मूल्यांकन अहवालात नमूद केला आहे. या अभ्यासात 'उष्णता-दुष्काळ'च्या घटनांची व्याख्या अशा दिवसांच्या रूपात केली आहे, जेव्हा तापमान त्याच्यासामान्य पातळीच्या वरच्या १० टक्क्यांमध्ये असते आणि सोबतच किमान मध्यम स्तराचा दुष्काळही असतो. ही तुलना १९६१ ते १९९० च्या आध-ार भूतकालावधीच्या आकडेवारीशी केली गेली आहे. या अभ्यासाचे निष्कर्ष 'जिओफिजिकल रिसर्च लेटर्स' यानामांकित आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रसिद्ध झाले आहेत. या संकटाचे सर्वात कटू सत्य म्हणजे त्यातील विषमता. ज्या देशांनी हरितगृह वायूंचे सर्वात कमी उत्सर्जन केले, म्हणजेच जे हवामान संकटासाठी सर्वात कमी जबाबदार आहेत, त्यांनाच या दुहेरी हल्ल्याचा सर्वाधिक सामना करावा लागणार आहे. यात विशेषतः कमकुवत आणि उष्ण कटिबंधीय क्षेत्रात राहणाऱ्या लोकांचा समावेश आहे. एसी- कुलरसारखी साधने उपलब्ध नसलेल्या तसेच आरोग्य सेवाही मजबूत नसलेल्या लहानदेशांमधील आर्थिकदृष्ट्या दुर्बल समाजात हेसंकट दैनंदिन जीवन अधिक कठीण करेल. पाणी संपल्यानंतर दुसरा कोणताही पर्याय नसणे, हा या धोक्याचा सर्वात भयानक पैलू आहे.

शास्त्रज्ञांचा अंदाज आहे की, २०३० मध्ये ६.६ टक्के लोकसंख्या या धोक्याच्या छायेत असेल, तर २०९० पर्यंत हा आकडा २८ टक्क्यांवर पोहोचेल. म्हणजेच येणाऱ्या वर्षांमध्ये हे संकट वेगाने वाढणार असून कोट्यवधी लोकांना कचाट्यात घेणार आहे. ही आकडेवारी जागतिक विषमता अधिक स्पष्ट करते. जगातील देशांनी आपली हवामानविषयक आश्वासने गांभीर्याने पाळल्यास हा धोका कमी केला जाऊ शकतो. अशा स्थितीत शतकाच्या अखेरीस प्रभावित लोकसंख्या कमी होऊन सुमारे १८ टक्के राहू शकते. म्हणजेच १७० कोटी लोकांना या दुहेरी संकटाचा सामना करावा लागेल. हा फरक सांगतो की, आज घेतलेले निर्णय येणाऱ्या काळात अब्जावधी जीव सुरक्षित किंवा असुरक्षित करू शकतात. आकाशातून बरसणारी झळाळती उष्णता आणि जमिनीखाली लपून बसलेली पाण्याची टंचाई ही केवळ ऋतूंची चक्रे उधळल्याची चिन्हे नाहीत, तर मानवी सभ्यतेसमोर उभ्या ठाकलेल्या नव्या संकटाचीचाहूल आहे.

हवामान बदलाच्या वेगाने वाढणाऱ्या परिणामामुळे आज उष्णतेच्या लाटा आणि दुष्काळ यादोन स्वतंत्र आपत्ती राहिलेल्या नाहीत; त्या एकमेकांना पूरक ठरत अधिक तीव्र, व्यापक आणि घातक स्वरूपधारण करीत आहेत. या दुहेरी संकटव्यूहाचा वेध घेताना केवळ पर्यावरणाचा नव्हे तर अर्थव्यवस्था, अन्नसुरक्षा आणि सामाजिक न्याय यांचा विचार अपरिहार्य ठरतो.

जगभरात गेल्या काही दशकांमध्ये तापमानवाढीचा वेग लक्षणीयरीत्या वाढलेला दिसतो. उष्णतेच्या लाटा आता अपवाद राहिलेल्या नाहीत तर नियमित होत चालल्या आहेत. त्याचवेळी पर्जन्यमानातील अनियमितता आणि पाण्याच्या स्रोतांवरील ताण वाढल्याने दुष्काळाची तीव्रता वाढत आहे. या दोन्ही घटना एकाच वेळी घडतात, तेव्हा परिणाम अनेक पटींनी वाढतो. उष्णतेमुळे जमिनीतील आर्द्रता वेगाने कमी होते तर दुष्काळामुळे पाण्याची उपलब्धता घटते. परिणामी, तापमान आणखी वाढते आणि दुष्काळ अधिक तीव्र बनतो, असे एक दुष्ट चक्र निर्माण होते. या दुहेरी संकटाचा सर्वात पहिला आणि तीव्र फटका शेतीला बसतो. भारतासारख्या देशात मोठ्या प्रमाणावर लोकसंख्या शेतीवर अवलंबून असताना उष्णता आणि दुष्काळाचा संगनमताने होणारा परिणाम अत्यंत गंभीर ठरतो. अशा परिस्थितीत अन्नसुरक्षेचा प्रश्न अधिक तीव्र बनतो. पाण्याच्या उपलब्धतेवर होणारा परिणामही तितकाच चिंताजनक आहे. नद्या, तलाव आणि भूजलस्तर यांवर आधीच ताण आहे. उष्णतेमुळे बाष्पीभवनाचा दर वाढतो तर दुष्काळामुळे पाण्याची भर पडत नाही. परिणामी, पाण्याचा तुटवडा अधिक तीव्र होतो. शहरी भागांमध्ये पाणी पुरवठ्यावर परिणाम होतो, तर ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्यासाठी संघर्ष वाढतो. भविष्यात 'पाणी युद्धां'ची भीती व्यक्त केली जाते, ती या पृष्ठभूमीवर निराधार नाही.

दुष्काळामुळे रोजगाराच्या संधी कमी होतात, स्थलांतर वाढते आणि सामाजिक अस्थैर्य निर्माण होते. अशा वेळी याघटकांसाठी ही परिस्थिती जीवन-मृत्यूचा प्रश्न बनते. या दुहेरी संकटाची आणखी एक महत्त्वाची बाजू म्हणजे जागतिक असमानता. हवामान बदलासाठी सर्वाधिक जबाबदार असलेले विकसित देश आणि त्याचा सर्वाधिक फटका सहन करणारे विकसनशील देशयांच्यातील दरी अधिकच वाढत आहे. उष्ण कटिबंधीय प्रदेशातील गरीब देशांकडे ना पुरेशी साधने आहेत, ना तांत्रिक क्षमता. त्यामुळे ते या संकटाला सामोरे जाण्यात अधिक असुरक्षित ठरतात. ही परिस्थिती केवळ पर्यावरणीय नव्हे, तर नैतिक आणि राजकीय प्रश्नही निर्माण करते. तथापि, या गंभीर चित्रात काही सकारात्मक शक्यता देखील दडल्या आहेत. हवामान बदलावर नियंत्रण ठेवण्यासाठी जागतिकस्तरावर विविध करार आणि उपक्रम राबविले जात आहेत. कार्बन उत्सर्जन कमी करणे, नवीकरणीय ऊर्जेचा वापर वाढवणे आणि टिकाऊ विकासाच्या संकल्पनांचा स्वीकार करणे या उपाययोजनांमुळे यासंकटाची तीव्रता कमी करता येऊ शकते; मात्र उपाययोजनांची प्रभावी अमंलबजावणी गरजेची आहे.

स्थानिक पातळीवरही अनेक उपाय करता येऊ शकतात. जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पिकांच्या पद्धतींमध्ये बदल आणि हवामानस्नेही शेती उपाययोजनांमुळे दुष्काळाचा परिणाम कमी करता येतो. शहरी भागात हरित क्षेत्र वाढविणे, उष्णता कमी करणारी पायाभूत सुविधा उभारणे आणि पाण्याचा कार्यक्षम वापर करणे यावर भर देणे आवश्यक आहे. तसेच, आपत्ती व्यवस्थापनाची सक्षम यंत्रणा उभारणे ही तितकेच महत्त्वाचे आहे. शासनाच्या धोरणांध्ये दीर्घकालीन दृष्टिकोन असणे आवश्यक आहे.नियोजनबद्ध पद्धतीने पायाभूत सुविधा उभारणे, संशोधन आणि विकासावर भर देणे आणि लोकजागृतीकरणे या बाबींचा समन्वय साधणे गरजेचे आहे. तसेच, सर्वात असुरक्षित घटकांसाठी विशेष योजना राबविणे आवश्यक आहे. उष्णता आणि दुष्काळाचा हा दुहेरी संकटव्यूह आपल्याला एक स्पष्ट संदेश देतो, तो म्हणजे मानव आणि निसर्ग यांच्यातील संतुलन ढासळले आहे. या संतुलनाची पुनर्स्थापना करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा, येणाऱ्या पिढ्यांसाठी आपण अधिक कठीण आणि अस्थिर जग सोडून जाऊ.

(लेखक पर्यावरण अभ्यासक आहेत)

---

पान १ वरून

# सामरिक भागीदारीचे नवे क्षितिज

आखाती देशांमध्ये भारताचा असा खंबीर मित्र असणे, हे भारताच्या शत्रुराष्ट्रांना, विशेषतः पाकिस्तानला मिळणारा मोठाच धोरणात्मक शह आहे. भारत आणि संयुक्त अरब अमिराती यांच्यातील संबंधांचा मुख्य दुवा, तेथील ३५ लाखांहून अधिक भारतीय नागरिक आहेत. भारताच्या विदेशी चलनसाठ्यात, म्हणजेच 'विदेशी गंगाजळी'त या भारतीयांचा वाटा सिंहाचा. पंतप्रधान मोदींच्या काळात या मानवी दुव्याला विशेष महत्त्व देण्यात आले.

अबुधाबीमध्ये भव्य हिंदू मंदिराची उभारणी असो किंवा पंतप्रधानांना मिळालेला संयुक्त अरब अमिरातीचा सर्वोच्च नागरी सन्मान 'ऑर्डर ऑफ झायेद' असो, यातून दोन्ही देशांमधील वाढलेला सांस्कृतिक विश्वासच अधोरेखित होतो. आज भारत संयुक्त अरब अमिरातीला अन्नधान्य, कापड आणि अभियांत्रिकी वस्तूंची मोठ्या प्रमाणात निर्यात करत आहे, तर संयुक्त अरब अमिरातीकडून भारतात मोठ्या प्रमाणात थेट परकीय गुंतवणूक येत आहे. सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करारामुळे, या व्यापाराला आता आकाश मोकळे झाले आहे. संयुक्त अरब अमिरातीनंतर पंतप्रधानांचा मोर्चा नेदरलॅण्ड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटली या युरोपीय देशांकडे वळणार आहे. हे देश हरितऊर्जा आणि प्रगत तंत्रज्ञानामध्ये जागतिक स्तरावर अग्रेसर आहेत. रशिया-युक्रेन युद्धामुळे, युरोपला सध्या भारतासारख्या विश्वासार्ह लोकशाहीवादी भागीदाराची गरज आहे. या दौऱ्यातून भारताला हायड्रोजन इंधन, अर्धसंवाहक उत्पादन आणि सागरी अर्थव्यवस्थेसाठी प्रगत युरोपीय तंत्रज्ञान मिळण्याची शक्यता आहे.

थोडक्यात सांगायचे, तर पंतप्रधान मोदींचा हा दौरा भारताच्या स्वावलंबनाच्या प्रवासातील एक मैलाचा दगड आहे. एका बाजूला आखाती देशांशी असलेले घनिष्ठ संबंध आणि दुसऱ्या बाजूला युरोपशी असलेली तांत्रिक भागीदारी, या दोन्ही आघाड्यांवर भारत यशस्वी होत आहे. जेव्हा जग दोन ध्रुवांमध्ये विभागले जात आहे, तेव्हा भारत आपल्या राष्ट्रीय हिताला प्राधान्य देऊन स्वतःचे स्वतंत्र असे सामरिक स्थान निर्माण करत आहे. पंतप्रधान मोदी यांचा हा दौरा, १४० कोटी भारतीयांच्या आकांक्षांना जागतिक व्यासपीठावर दिलेली एक नवी ओळख आहे. विश्वबंधू आणि जागतिक शक्ती बनण्याच्या दिशेने पडलेले हे एक खंबीर पाऊल आहे, यात कोणतीही शंका नाही!

### भारत आणि नेदरलँड्स यांच्यात १७ करार

भारत आणि नेदरलँड्सने संरक्षण सहकार्य, महत्त्वपूर्ण खनिजे आणि हरित हायड्रोजन उपक्रमांशी संबंधित १७ करारांवर स्वाक्षरी केली. या दौऱ्या दरम्यान, पंतप्रधान मोदींनी पूर नियंत्रण आणि जल व्यवस्थापन प्रणालीमधील नेदरलँड्सचे कौशल्य समजून घेण्यासाठी अफस्लुइटडाइक भागाला भेट दिली.

### स्वीडनसोबत विविध मुद्द्यांवर चर्चा?

स्वीडन दौऱ्यावर असताना भारताने द्विपक्षीय संबंधांना सामरिक भागीदारीच्या पातळीवर नेले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयन यांच्यासोबत 'युरोपियन राउंडटेबल फॉर इंडस्ट्री'लाही संबोधित केले.

### इटलीसोबतचा व्यापार वाढवण्याचे उद्दिष्ट

इटली दौऱ्यादरम्यान दोन्ही देशांनी आपले संबंध अधिक दृढ केले, त्याला 'विशेष सामरिक भागीदारी'चा दर्जा दिला आणि २०२९ पर्यंत व्यापार २० अब्ज युरोपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट ठेवले. दोन्ही देशांमध्ये कृषी, आर्थिक गुन्हेगारी प्रतिबंध आणि भारतीय आरोग्य कर्मचार्यांच्या इटलीतील स्थलांतराबाबतही करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्यासोबत झालेल्या उच्चस्तरीय चर्चेत भारत– मध्य पूर्व– युरोप आर्थिक कॉरिडॉर सहकार्यालाही चालना मिळाली. ही भेट भारताच्या वाढत्या राजनैतिक सहभागाचे द्योतक असल्याचे म्हटले जात आहे.

### ४३ वर्षांनंतर भारतीय पंतप्रधान नॉर्वेत

पंतप्रधान मोदी हे ४३ वर्षांनंतर नॉर्वेला भेट देणारे पहिले भारतीय पंतप्रधान होते. ओस्लो येथे झालेल्या तिसऱ्या भारत– नॉर्डिक शिखर परिषदेत भाग घेतला, जिथे त्यांनी डेन्मार्क, नॉर्वे, फिनलँड, आइसलँड आणि स्वीडनच्या नेत्यांसोबत हरित तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता यांसारख्या क्षेत्रांतील सहकार्यावर चर्चा केली.


# द्रष्टे समाजसुधारक स्वातंत्र्यवीर सावरकर

या उपक्रमास तत्कालीन काही व्यक्तींनी विरोध केला तसेच जिल्हा दंडाधिकाऱ्यांकडे तक्रारही केली. त्या संदर्भात सावरकरांनी असे प्रतिपादन केले की, धर्मांतरण प्रथम होते नि शुद्धीकरण मागावून येते. मी काही अमेरिका व तुर्कस्थान यासारख्या देशातल्या कानाकोपऱ्यात जाऊन एखादी आक्रमक नि अन्याय चळवळ प्रारंभ केलेली नाही. मी स्वदेशात राहूनच पवित्र कार्य करीत आहे. सावरकरांच्या सामाजिक सुधारणांकडे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे लक्ष होते. सावरकरांच्या जीवनकार्याची त्यांना पूर्ण कल्पना होती. डॉ. आंबेडकरांनी आपल्या 'जनता' या मुखपत्रातून सावरकरांच्या सामाजिक सुधारणाविषयक कार्याचा गौरव केला होता. एका प्रसंगी डॉ. आंबेडकरांनी सावरकरांना लिहिलेल्या पत्रात असेही म्हटले की, सामाजिक सुधारणेच्या क्षेत्रामध्ये तुम्ही एक मोठे काम करीत आहात. जर अस्पृश्य वर्ग हिंदू समाजाचा अभिन्न भाग असेल तर नूसती अस्पृश्यता जाऊन भागणार नाही. चातुर्वर्ण्याचे उच्चाटन झाले पाहिजे. ज्या थोड्या लोकांना याची आवश्यकता पटली आहे, त्यापैकी आपण एक आहोत, हे सांगावयास मला आनंद वाटतो. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी आपले संपूर्ण जीवन भारतमातेच्या समृद्धतेसाठी व सुरक्षिततेसाठी समर्पित केले. आपण सर्व भारतीयांनी परस्परांतील सर्व प्रकारचे मतभेद, जातिभेद, पंथभेद, धर्मभेद विसरून हा देश माझा व मी या देशासाठी आहे, असा या राष्ट्राच्या हितासाठीच माझे जीवन कसे कृतिशील होईल, याबाबत संकल्प करणे, हीच स्वातंत्र्यवीर सावरकरांना त्यांच्या जयंतीनिमित्त खरी आदरांजली ठरेल.

---

**नुकताच अधिक ज्येष्ठ महिना प्रारंभ झाला आहे. अधिक महिना हाच 'पुरुषोत्तम मास' असतो. अधिक मास म्हणजे पुरुषोत्तमाच्या साधनेचा पर्व काळ. या साधनेच्या काळात उत्तमतेकडे जाण्याचा मार्ग कसा आचरावा त्याविषयी हे टिपण ..........................................**

मुक **प्रकाश एदलाबादकर**



# ...मग मज सर्वस्व दिधलें पुरुषोत्तमीं

झाली असतील तीन वर्षे या गोष्टीला. नुकताच हिवाळा सुरू झाला होता. सकाळी सकाळी अंगणात बसलो होतो जरा कोवळ्या उन्हात. उन्हाची तिरीप असह्य व्हायला लागली आणि घरात जायला वळलो. तेवढ्यात फाटक उघडल्याचा आवाज आला म्हणून वळून बघितले. तो नंदू समोर उभा. नंदूचा आवाज म्हणजे नारोशंकराची घंटा. खणखणीत आवाजात म्हणजे, अगदी स्वयंपाकघरात कामात असलेल्या हिच्या कानापर्यंत पोचेल अशा आवाजात नंदूचा प्रश्न टपकला.

''काय बाबू, काय वाण मिळालं अधिकाचं सासरकडून? तुझं काय बाबा, तू एकटाच जावई आणि तोही सर्वात मोठा. पाचो उंगलीया घी में, सर कढाई मे और पैर पिपे में. चांगलं डबोलं आणलं असशील.'' फाटकातून आत येता येता नानूचा प्रश्न! त्यात काही खोटे नाही. नानूच्या सर्व प्रश्नांची उत्तरे देत मी त्याचे समाधान करण्याचा प्रयत्न केला. त्या वर्षी बरेच दिवसांनी सासरी जाण्याचा योग आला होता. लग्नाला ४५ च्या वर वर्षे उलटून गेली होती. सासूसासरेही हयात नाहीत; आणि आता कसले कौतुक? परंतु मेव्हण्याच्या बायकोने सर्व साग्रसंगीत केले. मेव्हण्याची पत्नी ही लौकिक नात्याने आपली बहीण असते. आम्हा दोघांनाही औक्षवाण करून, अधिकाचे वाण देऊन तिने नमस्कार केला आणि एकाएकी स्फुंदून स्फुंदून रडायला लागली. मुळात क्षण आनंदाचा, तरीही का रडतेय ही? आम्ही कुणीही तिला कारण विचारले नाही. व्यक्ती जर, मोकळेपणाने रडत असेल तर, तिला रडू द्यावे. मनाचे आभाळ स्वच्छ-निरभ्र होते. अनेक आठवणींनी नक्कीच तिच्या मनात गर्दी केली असणार. अनेक आठवणींच्या गवाक्षां धून आपण आपले गतायुष्य बघायला सुरुवात करतो. एकेका घटनेच्या अनुभवाची उकल करतो, त्याचा अर्थ लावतो. अर्थ लावता लावता त्यात बुडून जातो. कुटुंबात होणारे हे असे कार्य प्रसंग म्हणजे आठवणींच्या दीपमाळा उजळण्याचे क्षण असतात. त्यातून आलेल्या अनुभवांचे संचित पुढील पिढीला देण्याचे हेच प्रसंग असतात. त्यासाठी आपल्याच गतायुष्याकडे डोळसपणाने बघण्याची सवय असायला हवी.

आयुष्याच्या उतरणीवर या अनुभवांची बेरीज वजाबाकी करीत आणि त्यांचा लसावि-मसावि काढत आपण, आपली ओंजळ किती भरलेली आणि किती रिकामी आहे, याचा हिशेब मांडत असतो. वय उतरणीकडे जात असते. हाताशी वेळ कमी असतो. यासाठीच तर देवाने हा अधिकाचा महिना आपल्या पदरात टाकला नसेल ना? 'घे आता आपल्या साफल्याचा आणि वैफल्याचा शोध. वेळ दिलाय तुला.' असे तर त्याचे सांगणे नसेल ना? कसा घ्यायचा जीवनाच्या साफल्याचा शोध? अधिकाच्या वाणात मिळालेल्या अनारशासारखे आयुष्य हे सच्छिद्र असते. ही छिद्रे म्हणजेच अनुभवाचे गवाक्ष असतात. त्या जाळीतून बघायचे असते जीवनाकडे. तेही अनारशांबरोबर मिळालेल्या निरांजनाच्या प्रकाशात. परंतु ३३ अनारसे कशाला? मी काही शास्त्रवेत्ता नाही की रुढीग्रस्तही नाही. पण मला कुठेतरी असे वाटते, या ३३ अनारश्यांचा संबंध ३३ कोटींच्या देवांशी आहे. हा माझा कयास.

शास्त्रात किंवा पंचांगात असे असेलच, असे नाही. आपले एकूण देव संख्येने ३३ कोटी (म्हणजे ३३ वर सात शून्ये) नाहीत. येथे 'कोटी' हा शब्द संख्यावाचक नाही, तो गुणवाचक आहे. कोटी म्हणजे प्रकार. आदित्य कोटीचे १२. रुद्रकोटीचे ११ आणि वसुकोटीतील ८ शिवाय २ अश्विनीकुमार असे आपले '३३ कोटींचे' देव आहेत, '३३ कोटी' नाहीत. पुरुषोत्तमाच्या या ३३ कोटींपैकी निदान एकातरी कोटीत आपण समाविष्ट व्हावे, या हेतूने तर पुरुषोत्तम मासात ३३ अनारसे मिळत नसतील? प्रत्येक रुढीची थट्टा करून ती कालबाह्य झाली आहे, असा निरर्थक विचार करण्यापेक्षा त्यातून होकारात्मक अर्थ आपण काढला, तर निदान विचार भरकटत नाहीत आणि योग्य दिशेने जातात. आपल्या विचारांना योग्य वळण देण्याचे कार्य करणारे अनेक ग्रंथ आपल्या पूर्वसुरींनी आपल्या पदरात टाकलेले आहेत. या सर्व ग्रंथां ध्ये अर्थातच गीता हा अर्थातच सर्वश्रेद्र ग्रंथ आहे. ते श्रेद्रत्व प्रत्ययाला यायला त्या ग्रंथावर आणि त्यातील विचारांवर श्रद्धा हवी, निद्रा हवी.


आपल्या अत्यंत निखळ अशा तत्त्व प्रतिपादनावर आणि वैचारिक भूमिकेच्या बळावर भारतीयाच्या जीवनात गीतेने एक अढळ स्थान निर्माण केले. आजपासून ज्येष्ठ अधिकचा महिना सुरू होतोय म्हणून ही वर सांगितलेली, नंदूची आठवण आली. आता या अधिक महिन्याला कुणी 'मलमास', कुणी 'पुरुषोत्तम मास' तर कुणी चक्क 'धोंड्याचा महिना' म्हणतात. अजूनही काही नावे असतीलच. आपल्या पंचांगात हा अधिकाचा महिना कसा येतो, त्याचे ज्योतिर्गणितीय कारण काय, त्याचे भौगोलिक कारण काय, ही सर्व माहिती दिलेली असतेच. ३३ या अंकाचे पंचांगीय महत्त्वही दिले असते. आपल्या पूर्वसुरींचे खरोखरच आपण उपकार मानायला हवे. त्यांच्या विचारशक्तीला आणि द्रष्टेपणाला साष्टांग दंडवतच घालायला हवा. निसर्गात घडणाऱ्या प्रत्येक घटनेचा माणसाच्या जगण्याशी संबंध जोडून त्याचे आणि निसर्गाचे केवळ एकरूपत्वच त्यांनी दाखविलेले नाही, तर त्याला आध्यात्मिकतेची जोड देऊन मानवी जगण्याचे उन्नयन केले. अधिकाचा महिना हे त्याचे उत्तम उदाहरण आहे.

संवत्सरात आलेला हा तेरावा महिना परमेश्वराच्या अनुसंधानासाठी सर्वोत्तम काळ आहे. भगवंताने सांगितलेल्या गीतेधील 'पुरुषोत्तम' योगाचे सहजच स्मरण होते. पुरुषोत्तम मासात पुरुषोत्तम योगाचे स्मरण होणारच. 'ऊर्ध्व मूलमधः शाखमेशत्थम प्राहुरव्यं। छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित।।' या भगवंताच्या वचनाने प्रारंभ होणारा भगवद्‌गीतेचा १५ वा अध्याय म्हणजेच पुरुषोत्तम योग. अनेक विद्वानांचे आणि अभ्यासकांचे मत आहे की, हा पुरुषोत्तम योग हाच खरा गीतेचा शेवट होय. कारण अर्जुनाला किंवा अर्जुनाच्या मिषाने आपल्या सर्वांना, भगवंताला जे सांगायचे होते, ते आतापर्यंत सांगून झालेले होते. याची एक खूण या अध्यायाच्या शेवटच्या श्लोकात सापडते.

**'इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मायानघ। एतदबुद्ध्वा बुद्धिम**

(पान ६ वर)

कीर्तिरूपांच्या आठवकथा
डॉ. रमा गोळवलकर



# अत्री

अनसूया आणि अपालाविषयी लिहिताना अत्री ऋषींचा उल्लेख ओझरता आलेलाच आहे. वैदिक कालापासूनच अत्री ऋषींची कीर्ती सर्वत्र दरवळते आहे. कारण ऋग्वेदातील पाचव्या मंडला (अध्याय) द्रष्टापद अत्री ऋषींना देण्यात आलेलं आहे. स्वत: अत्री ऋषी आणि त्यांच्या गोत्रातजन्मलेले विविध ऋषींनी रचलेल्या सूक्तांचा संग्रह या पाचव्या मंडलात येतो. यांच्या सौम्य, शांत आणि समाधानी स्वभावाची वर्णनं येतात. त्याच बरोबरत्यांच्या मेधा आणि प्रज्ञा या दोन गुणांचा अत्यंत आदरानं उल्लेख होतो तोरामायणात आणि इतर पौराणिक वाङ्मयात.

अशी मान्यता आहे की, ब्रह्मदेवानं ही सृष्टी निर्माण केली; त्याचवेळी आपल्या मन आणि शरीराच्या विविध अवयवांतून काही पुत्र निर्माण केले. त्यांना ब्रह्मदेवाचे मानसपुत्र म्हणतात. जसं ब्रह्मदेवाच्या मनातून सनक, सनंदन, सनातन, सनतकुमार या चौघांसह ऋषी मरीची, डोळ्यांतून अत्री, मुखातून अंगिरस, कानातून पुलत्स्य, नाभीतून पुलह, हातातून क्रतु, हृदयातून भृगु, प्राणातून वसिष्ठ, कंठातून नारद, अंगठ्यातून दक्ष, छायेपासून कर्द उत्पन्न केलेत. यांच ऋषिवृंदाची नंतर ऋषिकुळं आणि गोत्रं विकसित झालीत.'अ'+'त्रि' म्हणजे ज्यात सत्त्व-रज-तम हे तीनही गुण नाहीत असा निर्गुण.

अत्री ऋषींचा स्वभाव अतिशय मृदू, शुद्ध आणि नितळ होता. त्यामुळे त्यांचास्नेह सर्वांशीच होता. अत्री ऋषींचा विवाह कर्द ऋषी आणि देवाहुतीची कन्या अनसूयेशी झाला. त्यांनी मंदाकिनी नदीच्या काठी चित्रकूट या जागी आपलासंसार थाटला. हे दाम्पत्य अतिशय प्रेमळ आणि सत्प्रवृत्त म्हणून सर्वदूर प्रसिद्ध होते. म्हणूनच राम- सीता आणि लक्ष्मण वनवास काळात अत्रींच्या आश्रमातच वस्तीला होते. त्याविषयीची एक ओवी, ओवी वृत्त आणि श्लेष तसंच उत्प्रेक्षाया अलंकाराचं उदाहरण म्हणून पाठच केलं होतं-'**अत्रींच्या आश्रमी। नेले मज वाटे। माहेरचि वाटे। खरोखरी।।**' अनसूयेच्या सतित्वाची परीक्षा बघण्यासाठी साक्षात ब्रह्मा-विष्णू-महेशआले आणि अनसूयेची बाळं झालेत. हा प्रसंग प्रत्येक दत्त जयंतीला सांगितला जातोच.

अर्थात हा झाला पुराण ग्रंथांतून मिळणारा संदर्भ. वैदिकांना जे अत्रीऋषी माहीत आहेत ते त्यांच्या बौद्धिक व्यापाराकरिता. कसे होते अत्री ऋषी? त्यांना सो, दत्तात्रेय, दुर्वास असे तीन पुत्र आणि अपाला ही कन्या होती. हीचारही भावंडं अतिशय मेधावी आणि कुशाग्र बुद्धीची. हे सगळे आत्रेय म्हणजे ऋग्वेदातील काही सूक्तांचे द्रष्टे आहेत; किंबहुना ऋग्वेदाचं पाचवं मंडलच 'अत्रीऋषी'च्या कुळाचं म्हणून विख्यात आहे, ज्यात इंद्र, अग्नी, वरुण आणि इतर वैदिक देवतांची स्तुती करणारी सूक्त प्रसिद्ध आहेत. यात असलेलं कल्याणसूक्त अर्थात स्वस्ति-सूक्त आजही प्रत्येक मंगलप्रसंगी स्वस्ति-प्राप्ती,कल्याण-प्राप्ती, अभ्युदय-प्राप्ती, भगवत्कृपा-प्राप्ती आणि अमंगलाच्या विनाशासाठी अगदी आरंभीच सस्वर पठन करण्याची परंपरा आहे. सर्व प्राणिम त्रांचं सर्व मंगल व्हावं, सर्वांचं कल्याण व्हावं ही प्रांजल भावना हा यासगळ्या सूक्तांचा आत्मा आहे. यातून महर्षी अत्रींच्या मनोबुद्धीत नांदणाऱ्या उदात्तता आणि लोक कल्याणाच्या भावनांचा परिचय होतो.हे द्रष्टा ऋषी केवळ देवतांना आवाहन करून त्यांची स्तुती करणारे नाहीत, तर आपल्या शालका (बायकोचा भाऊ) च्या म्हणजे कपिल महामुनीप्रणीत सांख्य दर्शनाच्या वैचारिक जडणघडणीत सहभागी आहेत.

भगवद्गीतेच्या विभूतियोग नामक १० व्या अध्यायात भगवान श्रीकृष्ण म्हणतात- '**सिद्धानां कपिलो मुनिः।।**' (१०.२६). कारण त्यांनी सांख्य दर्शनासारखं वैश्विक चिंतन प्रस्तुत केलं. अशा सिद्ध मुनींच्या या बौद्धिक क्रिया कलापात अत्री ऋषींनी हिरीरीनं भाग घेतला म्हणून त्यांच्या नावाचा उल्लेख गौरवानं 'अत्रिः सांख्यः' असा करण्यात येतो.


भारतीय ज्योतिषशास्त्राच्या १८ प्रणेत्यांपैकी एक नाव अत्री ऋषींचंदेखील आहे. म्हणजेच अवकाशातल्या नक्षत्र तारकांचं निरीक्षण करून खगोलशास्त्राचा आरंभिक अभ्यास मांडणाऱ्यांत अत्री ऋषी होते. चंद्र आणि सूर्याला ग्रहण कालागतं याचा ऊहापोह त्यांच्या चिंतनात केलेला आहे. पृथ्वीवरून दिसणाऱ्या चंद्र आणि सूर्य ग्रहणांचा जगाच्या पाठीवरचा पहिला अभ्यासक म्हणून आपणयाच द्रष्ट्याचं नाव घ्यायला हवं.

सूर्य आणि चंद्र या दोन्हीचा वनस्पतींवर होणारा परिणाम असं शीर्षक दिलंतर ते आधुनिक काळात वनस्पती शास्त्र म्हणजे बॉटनीच्या एखाद्या खंद्या अभ्यासकाचा शोधनिबंध वाटेल. पण हा अभ्यास पहिल्यांदा केला तो अत्रीऋषींनी. पृथु राजानं पृथ्वीचं दोहन केलं म्हणजे तिच्यातून अन्न-धान्याचं उत्पन्न घेतलं. त्या प्रयोगात अत्री ऋषींचादेखील सहभाग होता. देवांचे वैद्य असलेल्या नासत्य आणि दस्र या अश्विनीकुमारांनी आपली विद्या अत्री ऋषींना दिली. त्याचा वापर करून त्यांनी वनस्पतींम धून औषधिसत्त्व विलग करण्याचे काही प्रयोग सांगून ठेवलेले आहेत. काही अभ्यासकांच्या मते ज्योतिषशास्त्राचा आधार घेऊन उपचार करण्याविषयी त्यांनी काही ठोकताळे मांडून ठेवले आहेत. त्यामुळे ज्योतिष्यशास्त्राच्या या चिकित्सा ज्योतिष उपशाखेची पायाभरणी त्यांनी केल्याचा तर्क मांडला जातो.


त्यांनी नऊ अध्यायांत विभागलेल्या ४०० श्लोकांचा एक ग्रंथ लिहून सिद्ध केलेला आहे. त्याचं नाव 'अत्रिसंहिता.' पांचरात्र या प्राचीनतम वैष्णव परंपरेतील मान्यतांवर आधारित मंदिराची निर्मिती कशी करायची, मूर्तिस्थापना, नगरनियोजन आणि शिल्पशास्त्र या विषयांवर सविस्तर लिहिण्यात आलेलं आहे. तरल 'अत्रिस्मृति' या नावानं प्रसिद्ध असलेल्या ग्रंथात चार वर्णांची कर्मवृत्ती, राजधर्म, शोधन आणि स्नानविधी, शौच्यादि लक्षण, इष्टापूर्तवर्णन, यमनियम, प्रायश्चित्त विधी, अशौच निर्णय यासारखे दैनंदिन मानवी जीवनाशी निगडित असलेले अनेक विषय हाताळलेले आहेत.

या सगळ्याचा विचारधनाचा मुकुटमणी म्हणजे मानवी संस्कृतीच्या इतिहासात लोकतंत्राचा पुरस्कार करणारे पहिले विद्वान म्हणून ऋषी अत्रींचा नामोल्लेख व्हायला हवा. ते 'बहुपाय्य' म्हणजे अनेक पाय असलेली समाजव्यवस्था सुचवतात.'व्यचिष्ठे बहुपाय्ये यते हि स्वराज्यें (ऋग्वेद ५-६६-६)' ज्यात अनेकांनी मिळून संरक्षित केलेली म्हणजेच= अनेकांच्या सहयोगातून उभारलेली सामायिक संपत्ती अर्थात लोकतांत्रिक स्वराज्याची संकल्पना प्रस्तुत केलेली आहे. अशा या शुभचिंतक अष्टपैलू मेधेच्या महर्षी अत्रींची ही आठव कथा.

बोली आणि संस्कृती
प्रा. अजय देशपांडे



# विदेशी फुलांवर 'बोली'ची माया...



'अंजन कांचन करवंदीच्या काटेरी देशा' या गोविंदाग्रजांच्या शब्दांतील तीनही वृक्षनामे बोलीतील आहेत. आणि त्यांचे लोकजीवनात सांस्कृतिक महत्त्वही आहे. बोलीचा शब्दसंग्रह प्रत्यक्ष जीवनव्यवहारातून तयार होत असतो. परभाषेतून आलेल्या शब्दांचे नामकरण बोलीत वैशिष्ट्ये लक्षात घेऊन उत्स्फूर्तपणे होत असते. महाराष्ट्रात अनेक गोष्टी परदेशातून आल्यात. लोकजीवनाने त्या स्वीकारल्या आणि वैशिष्ट्यांना अनुसरून त्यांचे नामकरण देखील केले. विदेशातून महाराष्ट्रासह भारतात अनेक फुलांची, फळांची झाडे आली, धान्यप्रकार आले, साबुदाण्यापासून तंबाखूजन्य पदार्थांपर्यंत अनेक गोष्टी विदेशातून आल्या, खाद्यसंस्कृती, वस्त्रसंस्कृती, नागरीकरण या आणि अशा कितीतरी गोष्टींवर विविध देशांतील संस्कृतीचा परिणाम झाला आहे. पण वैशिष्ट्य असे की सारे परिणाम पचवून आपल्या लोकजीवनानुसार शब्दनिर्मिती बोलीमध्ये घडत राहते. आपल्या लोकजीवनात अगदी समरस झालेली अनेक फुले मुळात भारतीय नाहीत. लोकजीवनाने स्वीकारले ते बोलीनेही आपलेसे केले. अंगभर फुलणारा गुलमोहर...

भारतात गुलमोहर इंग्रजांनी आणला. फ्रान्समध्ये स्वर्ग फूल म्हणून लोकप्रिय असलेल्या गुलमोहराची अनेक नावे आहेत. १८२० च्या दशकात मादागास्करमध्ये गुलमोहराचा शोध व्हेनक्लेस बोझेर या वनस्पति शास्त्रज्ञाने लावला.

गुलमोहराचे शास्त्रीय नाव डेलोनिक्स रेजिया असे असून डेलोनिक्स या ग्रीक शब्दाचा अर्थ फुलांच्या पाकळ्यांच्या आकारावरून व त्यावरील ठिपक्यांवरून 'नखे' असा केला असावा. रंग आणि अंगभर फुलून येण्याच्या वैशिष्ट्यामुळे इंग्रजांनी त्याला 'फ्ले ट्री' म्हटले आहे, संस्कृतमध्ये राज- आभरण म्हणजे राजेशाही दागिना असे संबोधले आहे, फारसी, उर्दू, हिंदी भाषांमध्ये 'गुलमोहर' म्हटले आहे, गुल म्हणजे फूल आणि मोहर म्हणजे अशरफी अर्थात सोन्याचे नाणे. गुल म्हणजे जळणाऱ्या ज्योतीचा वरचा लाल तेजस्वी भाग असा अर्थ आहे. मराठीत मोहोर म्हणजे बहर.

महाराष्ट्रातील बोलीने गुलमोहर हा शब्द स्वीकारला. आज गुलमोहर हे लोकप्रिय फूलझाड आहे. कवी, लेखक, चित्रकार अशा साऱ्या प्रतिभावंतांना गुलमोहर साद घालतो. धूप की तपिश में जो छांव बन कर महका मेरे आंगन का वो इकलौता गुलमोहर था। दरख्त पतझड़ में उदास खड़े थे बस एक गुलमोहर था जो सुर्ख लाल जोड़े में सजा था। या गुलजार यांच्या ओळी नितांत सुंदर आणि आशयघन आहेत. हिंदी, उर्दू, फारसी, मराठी या भाषा आणि त्यांच्या बोलींनी गुलमोहर हे अंगभर फुलणारे झाड आणि त्याचे साजेसे नाव आपलेसे केले आहे. गुलमोहरासारखेच 'सोनमोहर' ही लोकजीवनात रुजलेला आहे. सोनमोहर अंदमान, मलेशिया, श्रीलंका व ऑस्ट्रेलिया वगैरे देशांतून भारतात आला. तामिळनाडू, आंध्रप्रदेश आणि नंतर महाराष्ट्रात खंडाळा येथे आला. सोनमोहर, पिवळा गुलमोहर, ताम्रशिंबी या नावांनी ओळखला जातो. सोन्यासारखा मोहोर म्हणून सोनमोहोर हे नाव बोलीत रुजले आहे. गिरीपुष्प म्हणजे उंदीरमारी... शेतांच्या बांधांवर रस्त्यांच्या कडेला गिरीपुष्पाची झाडे दिसतात. पांढरी गुलाबी अशी सुंदर फुलांनी झाड लदबदलेले असते. खरेतर हे गिरीपुष्प म्हणजे ग्लिरीसीडिया सेपियमचे रोप श्रीलंकेतून मुंबईत आले असे सांगितले जाते. मराठी माती आणि माणसांनी हे सुंदर फुलांचे झाड आपलेसे केले. त्याचे नामकरण गिरीपुष्प असे करून घेतले. खरे तर ग्लिरीसीडिया हा शब्द लॅटिन भाषेतील ग्लिरिस म्हणजे उंदीर किंवा उंदरासारखा काहीही कुरतडून खाणारा निशाचर प्राणी आणि सिडा म्हणजे मारणारा. शब्दशः अर्थ उंदीर मारणारे झाड असा होतो. या नावाच्या आधारे बोलीत उंदीरमारी हा शब्द रूढ झाला असावा. गिरीपुष्पाच्या बिया खाल्ल्याने उंदीर मरतात असा लोकसमज आहे, या लोकसमजामुळे शेतकऱ्यांनी त्याला उंदीरमारी हे नाव दिले असावे. प्रत्यक्ष जीवनव्यवहारातून बोली प्रत्येक गोष्टीचे नामकरण करीत असते.

आज गिरीपुष्प अथवा उंदीरमारी विदेशी आहे म्हटले तर कुणी विश्वास ठेवणार नाही. एवढे ते भारतीय मातीसह मनातही रुजले आहे. 'गिरीपुष्प' हे अभिजनांनी तर 'उंदीरमारी' हे बोली बोलणाऱ्यांनी दिलेले नाव असावे. सम्राटाची मेणबत्ती अर्थात नागीण झुडूप! आपल्या महाराष्ट्रात अनेक ठिकाणी शहराबाहेर रिकाम्या जागेवर असणारी पिवळ्या फुलांच्या झाडांची सुंदर झुडपे दिसतात. त्यांना गावगाड्यात नागीण झुडूप म्हटले जाते. सेनाअलाटा नावाची ही फुले भारतासह जगभरात आहेत. औषधी म्हणूनही उपयोग असणाऱ्या या झाडाची विविध देशांतील लोकभाषांमध्ये वेगवेगळी नावे आहेत. या फुलांना एम्पायर्स कँडल स्टीक्स म्हणजे सम्राटाची मेणबत्ती म्हटले जाते. ही फुले पिवळ्या मेणबत्तीसारखी दिसतात. मराठी मातीत रुजलेल्या या बेपर्वा वाढणाऱ्या झाडाच्या (पान ६ वर)

# तंत्रराष्ट्राच्या उंबरठ्यावर....


तंत्र शिक्षण
मुकुल आव्हाड

**महात्मा गांधी, नेल्सन मंडेला आणि विन्स्टन चर्चिल हे तीन महापुरुष एकत्र आल्यावर, एखादा देश चालवू शकतील का? इतिहास अभ्यासकांसाठी ही एक कवी कल्पनाच. एका बाजूला वसाहतवादी राष्ट्राचे युद्धकालीन नेतृत्व सांभाळत विश्वयुद्धाची दिशा बदलणारा नेता, दुसऱ्या बाजूला स्वदेशातील माणसांना त्याच वसाहतवादाच्या कचाट्यातून मुक्त करणारी दोन शिखराएवढी माणसं. ही माणसं एकत्र आल्यावर अर्थातच यांच्यातील संवाद-विसंवाद, हा एक महत्त्वाचा दस्तऐवज ठरेल. कल्पनेच्या जगात झेप घेणाऱ्या लेखकांनी, आतापर्यंत या महानायकांच्या जीवनाचे आपआपल्या परीने अर्थ लावले. मात्र, आता याच कल्पनेचे रूपांतर वास्तवात होत आहे. आतापर्यंत एखाद्या भूभागाचे शासन, हे माणसाच्या माध्यमातून होत असे. आता मात्र 'एआय चॅटबॉट्स', मानवविरहित शासनव्यवस्था तयार करू शकतात का? याची चाचपणी सुरु आहे.**

साधारण एका वर्षापूर्वी डॅन थॉमसन यांनी एका बेटावर, 'एआय'शासित देश सुरू केल्याचा दावा केला होता. 'सेन्से' नावाच्या एका 'एआय चॅटबॉट कंपनी'च्या माध्यमातून फिलीपिन्सच्या किनारपट्टीजवळ एक बेट खरेदी करून, तिथे 'सेन्से आयलंड' नावाच्या एका देशाची निर्मिती केली. या देशाचं शासन 'एआय' यंत्रणांच्या माध्यमातून केले जाणार आहे. या बेटाचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे, येथील सरकार चालवण्यासाठी कोणत्याही जिवंत मानवाची निवड केलेली नाही. त्याऐवजी इतिहासातील महान विचारवंत, नेते आणि शास्त्रज्ञांच्या साहित्यावर, भाषणांवर आणि तत्त्वज्ञानावर 'एआय' मॉडेल्स प्रशिक्षित करून, एक 'एआय मंत्रिमंडळ' तयार करण्यात आले आहे.

प्रसिद्ध रोमन सम्राट आणि स्टॉईक तत्त्वज्ञ मार्कस ऑरेलियस, ब्रिटनचे माजी पंतप्रधान विन्स्टन चर्चिल, मानवी हक्कांच्या पुरस्कर्त्या एलिनॉर रूझवेल्ट, नेल्सन मंडेला, महात्मा गांधी अशा दिग्गजांच्या विचार-विनिमयातून या राष्ट्राचा कारभार संपन्न होणार आहे. जगभरातील लोक या बेटाचे डिजिटल नागरिक म्हणून नोंदणी करू शकतात. हे नागरिक एका ओपन-ॲसेस प्लॅटफॉर्मवर, आपली धोरणे किंवा प्रस्ताव मांडू शकतात. त्यावर हे 'एआय मंत्रिमंडळ' जाहीरपणे चर्चा करते आणि मतदान करून निर्णय घेते. याउपर आतापर्यंत १२ हजारजणांनी, या आगळ्या-वेगळ्या बेटाचे रहिवासी होण्याची तयार दाखवली आहे.

कृत्रिम बुद्धिमत्ता दिवसेंदिवस कितीही सर्वव्यापी होत असली, तरी तिच्या अचूकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होतच आहे. जर 'एआय'च्या माध्यमातून घेण्यात आलेला एखादा निर्णय मानवी मूल्यांच्या विरोधात असेल किंवा धोकादायक असेल, तर तो निर्णय रद्द करण्याचा अधिकार निवडून आलेल्या नऊ मानवी रहिवाशांच्या समितीला देण्यात आला आहे. हा प्रयोग आपल्याला कितीही 'जगात भारी' वाटत असला, तरीसुद्धा आंतरराष्ट्रीय प्रसारमाध्यमे आणि तज्ज्ञांनी यावर अनेक प्रश्नही उपस्थित केले आहेत. हा प्रयोग करू पाहणार्या खुद्द डॅन थॉम्प्सन यानेच स्वतः कबुली दिली आहे की, हा प्रयोग अत्यंत गुंतागुंतीचा असून याचा शेवट नक्की कसा होईल, याबद्दल शंका आहे!



जर भविष्यात ही संपूर्ण डिजिटल सिस्टम हॅक झाली किंवा सायबर हल्ल्याची बळी ठरली, तर हे संपूर्ण सरकार कोसळू शकते. तसेच, भूतकाळातील महापुरुषांच्या विचारांवर आधारित असलेले हे 'एआय' मॉडेल, आजच्या २१व्या शतकातील आधुनिक आर्थिक समस्या आणि सायबर गुन्हेगारीसारख्या लिष्ट आव्हानांना तोंड देण्यास सक्षम आहेत का? याबाबतही तज्ज्ञांमध्ये मतभेद आहेत.

उपरोधाने या प्रयोगाची तुलना 'जुरासिक पार्क' चित्रपटाशी केली जात आहे, जिथे सुरुवातीला सर्व काही नियंत्रणात असल्याचा दावा केला गेला होता; पण नंतर परिस्थिती हाताबाहेर गेली. दरम्यान, या प्रकल्पाने २०२५ ते २०२८ असा चार वर्षांचा आराखडा तयार केला असून, २०२६ मध्ये संशोधकांचा पहिला गट या बेटावर वास्तव्यास जाणार आहे आणि तिथे पूर्णपणे सौर व अक्षय ऊर्जेवर आधारित पायाभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. आधुनिक काळातून उत्तर आधुनिक काळामध्ये झेप घेत असताना, माणसाच्या वाटेला माणसाच्या प्रगतीतूनच निर्माण झालेल्या असंख्य समस्या आज उभ्या ठाकल्या आहेत.

अमेरिका आणि इराणमधील युद्धामुळे जागतिक स्तरावर वातावरण तापलं आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचे सर्वव्यापी अवकाश लोकांना अचंबित करणारे आहे. या वातावरणामध्ये हे 'तंत्रराष्ट्र' आपल्याला कुठे घेऊन जाईल, हे बघणे औत्सुयाचे ठरते.



# सत्तापालटाचा 'सायफर' डाव

परराष्ट्रकारण
कौस्तुभ वीरकर

अमेरिकेचे दिवस सध्या कठीण आले असून, त्यांच्या आजवरच्या कृत्यांची फळेच वास्तव म्हणून त्यांच्या पदरात पडत आहेत. एकीकडे देशावरचे वाढते राष्ट्रीय कर्ज, वाढती महागाई, इतर मित्रदेशांशी आयातशुल्काच्या माध्यमातून घेतलेले वैर आणि त्यातच लांबलेले इराणविरुद्धचे युद्ध; अशी सर्वच संकटे आ वासून उभी राहिली असतानाच, अजून एका संकटाने अमेरिकेच्या राजकारणाचे विदारक वास्तव जगाच्या समोर आणले आहे.

आजवर जगाने अमेरिकेचा 'रिजिम चेंज' या शब्दाशी असलेला संबंध अनेकवेळा ऐकला होता. कित्येक देशांच्या नेत्यांनी अमेरिकेच्या या दडपशाहीवर उघड टीकाही केली. मात्र, प्रत्येक वेळी अमेरिकेने लोकशाही व्यवस्थेच्या पुरस्कर्त्यांमध्ये आमच्यासारखे फक्त आम्हीच आहोत म्हणत, कानावर हात ठेवले. मात्र, पाकिस्तानमधील सध्याच्या एका घटनेने अमेरिकेच्या या प्रतिमानिर्मितीमधील हवा झटक्यात काढून घेतली असून, अमेरिकेचे खरे रंग जगासमोर आणले आहेत. पाकिस्तानमधील इमरान खान सरकार अमेरिकेने पाडल्याचा आरोप माजी पंतप्रधान इमरान खान यांनी अनेकदा केला. मात्र, त्याच्याकडे जगाने पूर्णपणे दुर्लक्ष केले. अर्थात, हे अमेरिकेच्या प्रतिमानिर्मिती शास्त्राचे यश मान्य करावेच लागेल. मात्र, 'कोंबडे कितीही झाकले, तरी तांबडे उगवायचे राहात नाही.' नुकत्याच एका वृत्तसंस्थेने अमेरिकेची गुप्तचर संस्था असलेल्या 'सीआयए'च्या एका गुप्त कागदपत्रांवर प्रकाश टाकला आहे. या कागदपत्रांत इमरान खान सत्तेतून दूर झाल्यास अमेरिकेचे पाकिस्तानबरोबर मधुर संबंध निर्माण होऊ शकतात, असे म्हटले आहे. या कागदपत्रांना 'सायफर' असे म्हटले गेले असून, इमरान खान यांनी अनेक मुलाखतींमध्ये या नावाचा उल्लेख केला होता. या कागदपत्रांमध्ये पाकिस्तानातील तत्कालीन अमेरिकेचे राजदूत आणि जो बायडन यांच्या सरकारमधील आशियाचे कारभार पाहणारे डोनाल्ड लू यांच्यातील एका बैठकीतील चर्चा समोर आली आहे. त्यानंतर अल्पावधीतच इमरान खान यांचे पाकिस्तानातील सरकार जाऊन, त्याजागी शाहबाज शरीफ यांचे सरकार आले आणि त्यानंतर अमेरिका आणि पाकिस्तान यांच्यातील संबंधही कमालीचे सुधारलेले दिसतात. अर्थात, पाकिस्तानबाबतच्या अमेरिकेच्या कारवायांचा हा पुरावा त्यांचे खरे रंग समोर आणणारा असला, तरी ते हिमनगाचे टोक आहे, हे निश्चित. अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाचा इतिहास पाहिला, तर तो केवळ कूटनीतीपुरता मर्यादित राहत नाही. अमेरिकेची गुप्तचर संस्था 'सीआयए' ही जगातील विविध देशांतील सत्ताबदल, गुप्त मोहिमा आणि राजकीय अस्थिरतेशी जोडली गेली आहे. इराणमध्ये १९५३ मध्ये पंतप्रधान मोहम्मद मोसादेघ यांचे सरकार उलथवणे, चिलीमध्ये साल्वाडोर अयेंदे यांच्या विरोधातील कारवाया; क्युबा, व्हिएतनाम, अफगाणिस्तान ते लॅटिन अमेरिकेतील अनेक राष्ट्रांमधील हस्तक्षेपाच्या घटनांमुळे 'सीआयए'ची प्रतिमा अमेरिकेचे गुप्त शस्त्र अशीच झाली आहे. जागतिक महासत्तांच्या संघर्षात स्वतःचा मार्ग निवडण्याचा प्रयत्न करणाऱ्या नेत्यांविरोधात अमेरिकेची यंत्रणा सक्रिय होते, असा आरोप त्यांच्यावर अनेकदा झाला आहे. (पान ६ वर)

# ग्रहसंकेत

## (रविवार, २४ मे ते शनिवार, ३० मे २०२६)

नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर, ज्येष्ठ पत्रकार
'शिवकृपा' फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो. कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र.९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २४ मे-** चांगला दिवस, ब्रदर्स डे ✻ **सोमवार, २५ मे-** गंगादशहरा समाप्ती, गंगापूजन, गंगावतार, रोहिणी रवि (१५: ३७), श्री हालसिध्दनाथ यात्रा अकोळ रोड निपाणी ✻ **मंगळवार, २६ मे-** वृध्दि तिथी ✻ **बुधवार, २७ मे-** पंडित नेहरू पुण्यदिन, कमला एकादशी ✻ **गुरुवार, २८ मे-** प्रदोष, स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती ✻ **शुक्रवार, २९ मे-** बुध मिथुनमध्ये ✻ **शनिवार, ३० मे-** पौर्णिमा श्राध्द, गोवा राज्य दिन

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २५, २८ मे ✻ **बारसे-** २५, २८ मे ✻ **जावळ-** २८, २९ मे (११ पर्यंत) ✻ **गृहप्रवेश-** २५, २८, २९ मे (१० पर्यंत)

### मेष :- कामे मार्गी लागतील

धनात रवि तर व्ययात शनि त्यामुळे या सप्ताहात आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे. खर्चाचे प्रसंग वाढणार आहेत. अडचणीत भावंडांचे सहकार्य मिळेल. कला- गुणांमधून प्रगती घडेल. चिंता नको. राशी स्वामी मंगळ राशीत आहे. त्यामुळे उत्साहवर्धक घटना घडतील. रेंगाळलेली कामे मार्गी लावता येतील. प्रगती घडेल. शुभ ता. २५, २८

### वृषभः- आत्मविश्वास वाढेल

धनात गुरू शुक्रादि शुभ ग्रह तर व्ययात मंगळ त्यामुळे थोडी अनुकूलता राहिल तर थोडी प्रतिकुलताही राहिल. अनुभवाचे आधारे निर्णय घ्यावेत. उष्णतेपासून त्रास होईल. आत्मविश्वास वाढेल. घाईने निर्णय घेऊ नयेत. विधी, गृह निर्माण अशा क्षेत्रात अनुकूलता वाढेल. फार चिंता करू नका. विचाराने रहावे. आर्थिक कामे होतील. शुभ ता. २४, २८

### मिथुनः- समस्या कमी होतील

राशी स्वामी बुध २९ मे रोजी राशीत गुरू, शुक्राच्या जोडीला येत आहे. त्यामुळे समस्यांतून मार्ग निघत जाईल. आर्थिक गुंतवणूक विचाराने करावी. अडचणीतून मार्ग निघत जाईल. वैद्यकिय, यांत्रिक क्षेत्रात मनासारख्या घटना घडतील. समस्या कमी होतील. नवीन योजना विचारपूर्वक राबवाव्यात. सुसंधी लाभतील. शुभ ता. २५, २८

### कर्कः- मनासारखी प्रगती

पंचमेश, दशमेश मंगळ दशमात आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात मनासारखी प्रगती घडेल. चांगल्या कामासाठी गुंतवणूक करू शकाल. गुढ शास्त्रात प्रगती होईल. संसर्गजन्य आजारापासून जपून असावे. प्रशासन सेवेत अनुकूलता राहिल. नव्या संधी लाभतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या विचारांना चालना मिळेल. शुभ ता. २४, २८

### सिंहः- नव्या विचारांना चालना

लाभस्थानातील शुभग्रहांमुळे आर्थिक बाबतीत अनुकूलता राहिल. नव्या कामांना गती मिळेल. नव्या विचारांना चालना मिळेल. नव्या संधीचे स्वागत करावे. शारिरीक तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. घाईने निर्णय घेऊ नयेत. उष्णतेपासून त्रास संभवतो. काळजी घ्यावी. छोटी साडेसाती चालू आहे. विचाराने रहावे. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. २८

### कन्याः- प्रकृतीस जपावे

अष्टमात मंगळ तर व्ययात केतू त्यामुळे शारीरिक तक्रारी राहणार आहेत. दुर्लक्ष करू नका. औषधपाण्यासाठी खर्च करावा लागेल. नव्या समस्या वाढणार नाहीत, याची काळजी घ्यावी. विवाह विषयक कार्य लांबणीवर पडेल. महत्त्वाची कामे लांबणीवर टाकावीत. बँक, विमा, खाद्यापदार्थ अशा क्षेत्रात मनासारखी प्रगती घडेल. शुभ ता. २५, २८

### तुलाः- वादाचे प्रसंग टाळावेत

राशी समोरच मंगळ आहे, त्यामुळे धडाडी वाढेल. कौटुंबिक जीवनात फार आग्रही राहू नका. उपजत कला गुणांचा विकास होईल. प्रशासन सेवेत वादाचे प्रसंग टाळावेत. आर्थिक प्रगती विलंबाने होईल. प्रकृतीच्या तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. धार्मिक, सामाजिक कार्यात प्रगती घडेल. महत्त्वाच्या घटना विलंबाने पण निश्चितच घडतील. शुभ ता. २५, २८

### वृश्चिकः- प्राप्तीचे प्रमाण वाढेल

राशी स्वामी मंगळ षष्ठात असल्याने कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. हाती घेतलेली कामे मनासारखी होतील. नव्या संधीचे स्वागत करावे. अचानक प्राप्तीचे प्रमाण वाढेल. गुढ विद्येत नव्या संधी लाभतील. अडचणीतून वेळीच मार्ग निघत जाईल. नव्या विचारांना गती मिळेल. नव्या पर्वास सुरूवात करू शकाल. शुभ ता. २८

### धनुः- सौख्याच्या घटना

राशीसमोर गुरू, शुक्रादि ग्रह आहेत. त्यामुळे चौथ्या शनिबाबत चिंता करू नका. षष्ठातील. रवि सर्व समस्यांतून वेळीच मार्ग काढत जाईल. नव्या संधी लाभतील. फार चिंता करू नका. नव्या कामांना गती मिळेल. वैवाहिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. अपेक्षित संधी लाभतील. अडचणीतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २५

### मकरः- अनिष्ठ पर्व संपले

चतुर्थेश, लाभेश मंगळ, चतुर्थात असल्याने स्थावरमध्ये नवीन गुंतवणूक करू शकाल. उपजत कला- गुणांचा विकास होत जाईल. दूरच्या प्रवासाचे योग आहेत. स्पर्धांमध्ये यश मिळेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. नव्या संधीचे स्वागत करावे. अपेक्षित घटना घडतील. अनिष्ठ पर्व संपले आहे. प्रगती करून घ्यावी. शुभ ता. २४, २८

### कुंभः- मनासारख्या घटना

साडेसातीचे शेवटचे पर्व चालू असले तरी सध्या कसल्याही चिंता करू नका. नोकरी, व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. फार दगदग करू नका. समस्या आल्या तरी मार्गही वेळीच निघत जाईल. नव्या संधीचे स्वागत करावे. संततीबाबत शुभ घटना घडतील. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. शुभ ता. २८

### मीनः- अंगिकृत कार्यात प्रगती

राशीत शनि तर धनात मंगळ त्यामुळे मनात नेहमी आर्थिक बाबतीत विचार राहतील. स्थावर, वाहन विषयक सौख्याच्या घटना घडतील. अंगीकृत कार्यात प्रगती होत जाईल. चिंता कमी होतील. आजपर्यंत चिकाटीने केलेली वाटचाल शुभ फलदायी ठरेल.अडचणीतून मार्ग निघत जाईल. विचाराने रहावे. शुभ ता. २५,२८

!! शुभ भवतु !!

---

तत्त्वदर्शन

डॉ. राजेंद्र डोळके

# ऋग्वेदातील तत्त्वज्ञान (२)

ना ना सदीयसूक्त व पुरुषसूक्त याप्रमाणेच ऋग्वेदातील दशम मंडलातील १२१ वे 'हिरण्यगर्भ' हे सूक्त फार महत्त्वाचे आहे. हे गहन अशा आध्यात्मिक तत्त्वांनी भरलेले असून यात हिरण्यगर्भ परमेश्वराचे वर्णन आले आहे. ते असे. 'जगाच्या उत्पत्तीचा धनी म्हणून हिरण्यगर्भ नावाचा परमेश्वर सृष्टीच्या पूर्वी होता. त्यानेच पृथ्वीपासून द्युलोकांपर्यंत सर्व निर्माण करून त्याचे संरक्षण केले. जो आत्म ज्ञान आणि बल देणारा आहे आणि ज्याची सर्व लोक आणि देवही आज्ञा पाळतात, ज्याच्या सावलीत अमरपणा आहे किंवा मृत्यू आहे, त्या सुखस्वरूप परमेश्वराची आम्ही सर्व प्रकारे उपासना करतो. तो सर्व सृष्टीचा एकच ईश्वर आहे आणि द्विपाद व चतुष्पाद पशू वगैरेंचा धनी आहे. त्याच्या सामर्थ्याने हिमालयासारखे पर्वत झाले आणि पृथ्वीसह समुद्र झाले असे म्हणतात. त्याच्या सामर्थ्याने दिशा व उपदिशा झाल्या, स्वर्ग सामर्थ्यवान झाला, पृथ्वी दृढ झाली आणि आदित्य अंतरिक्षात स्थिर झाला. तो देवातला एक मुख्य देव आहे. अशा त्या सुखस्वरूप परमेश्वराची आम्ही सर्व प्रकारे उपासना करतो.




या सूक्तांशिवाय वामनसूक्त (१.१६४) नावाचे सूक्त हे ऋग्वेदातील एक श्रेष्ठ तत्त्वज्ञानसूक्त मानले जाते. या सूक्तात आत्म साक्षात्काराला सृष्टिनिर्मात्या परमेश्वरापेक्षाही अधिक महत्त्व दिले आहे. परमेश्वरालाही अगम्य अशा सृष्टीच्या सत्य स्वरूपाचे ज्ञान आत्मसाक्षात्कारी व्यक्तीला होत असून अशा व्यक्तीला 'पित्याचाही पिता' अशा गौरवोपाधीने संबोधिले आहे. 'द्वा सुपर्णा सयुजा सखया' (१.२०) या सुविख्यात ऋचेमध्ये जीवात्म्याचे स्वरूप आणि त्याचा परमात्म्याशी परस्परसंबंध आदीसंबंधीचे पुनर्जन्मविषयक तत्त्वज्ञान ग्रथित केले आहे. एकमेकांचे जिवलग मित्र असणारे जीव आणि परमात्मारूपी दोन पक्षी एकाच वृक्षाचा आश्रय घेतात. त्यापैकी एक जण (जीव) वृक्षाची गोड फळे खातो तर दुसरा (परमात्मा) ती फळे भक्षण न करता त्याजकडे केवळ पाहात राहतो. फळ खातो म्हणजे कर्माच्या फळाचा स्वाद किंवा भोग घेतो.

या सूक्तातील ३०-३१ ऋचांमध्ये आत्म्याचा निर्देश प्राणयुक्त, वेगवान आणि सचेतन जीविततत्त्व म्हणून केला आहे. या निर्देशावरून पुनर्जन्माची कल्पना ऋग्वेदकाली रूढ झाली असून पुढील काळात ती अधिक सुसूत्र झाली. भारतीयांचे तत्त्वज्ञान ग्रंथ आणि भारतीय मन पाहता त्यांच्यावर अद्वैतवादाचा पगडा असलेला स्पष्ट दिसतो. या अद्वैतवादाचा उगम आपल्याला ऋग्वेदात आढळतो. हे सर्व विश्व एका 'ब्रह्मा'चेच रूप आहे. या अद्वैतवादी सिद्धांताचे बीज आपल्याला ऋग्वेदातच आढळते. नंतरच्या काळात निर्माण झालेल्या तत्त्वज्ञान ग्रंथांनी याच सिद्धांताचा आधार घेऊन आपले तत्त्वज्ञान सजविले आहे. ऋग्वेदात अनेक देवतांची वर्णने व स्तोत्रे असली, तरी सर्व देवता एकरूप आहेत. एका परब्रह्माची स्वरूपे आहेत, हा अद्वैतबोध जागोजाग स्पष्ट दृग्गोचर होतो. 'एकं संतं बहुधा कल्पयान्ति' ब्रह्म एक असून सत् म्हणजे शाश्वत आहे व त्याला विद्वान लोक अनेक प्रकारचा कल्पून अनेक सूक्तांनी स्तवतात, असे म्हटले आहे.


**'विश्वतश्चक्षुरुत विश्वतोमुखो विश्वतोबाहुरत विश्वतस्यात।। संबाहुभ्याधम ती संपतत्रैर्धावाभू ममी जनयन् देव एकः।।'** (ऋ.१०.८१.३) विश्वातले सारे डोळे, मुखे, बाहू, पाद अनंत आहेत; पण ते एकाचेच आहेत. आपल्या बाहूंनी स्वर्ग व पायांनी पृथ्वी उत्पन्न करणारा देव एकच आहे, हीच अद्वैताची कल्पना ऋग्वेदात स्पष्टपणे उमटली आहे. विषयांच्या बाबतीत ऋग्वेद हा सर्वसंग्राहक आणि सर्वसमावेशक आहे. धर्म, नीती, तत्त्वज्ञान, समाजशास्त्र, इतिहास, योगशास्त्र, भक्तिसंप्रदाय, देवताविज्ञान या विषयांबरोबरच शेती, जुगार, रोगनाशन, आरोग्यप्राप्ती, वैवाहिक आयुष्य, स्त्री- पुरुष समागम, जादूटोणा, मंत्रतंत्र, जारणमारण इत्यादी भौतिक आणि नित्य परिचयाच्या विषयांतही ऋग्वेद तेवढ्याच तज्ञतेने मार्गदर्शन करतो. म्हणून हा ग्रंथ समाजातील कोणत्याही एका वर्गाचा नसून समस्त मानवजातीचा झाला आहे आणि असंख्य विषयांवरचे ज्ञान असलेला सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणून जगात मान्यता पावला आहे. असे जरी असले, तरी ऋग्वेदातील बहुतेक सूक्ते ही देवतांच्या स्तुतिपर रचलेली आहेत. दुसऱ्या शब्दांत, सृष्टीतील निरनिराळ्या देवतांचे स्तवन व प्रार्थना हाच ऋग्वेदाचा प्रमुख विषय आहे, असे म्हटले जाते. मानवाचे लक्ष वेधून घेतले ते प्रथम सृष्टीतील चमत्कारांनी. घनदाट मेघ, नेत्रदीपक विद्युल्लता, मुसळधार पाऊस, वाहत्या सरिता असा हा सृष्टीतील अविरत कार्यक्रम पाहून त्या क्रमांमागे निसर्गात काहीतरी अद्भुत शक्ती असाव्यात, असा मानवाचा ग्रह झाला. नंतर त्यातून सृष्टीची सुसूत्रता मूळ धरू लागली आणि मानवी जीवन सुखदुःखमय करण्यात या निसर्गदेवतांचा फार मोठा वाटा आहे, असे मानवाच्या लक्षात आले. अग्नी, सूर्य, वायू, पर्जन्य या निसर्गशक्तींचे मनुष्यजीवनात फार महत्त्व आणि सहाय्य असल्यामुळे मनुष्याने या निसर्गशक्तींनाच देवता मानले आणि मनुष्याचे जीवन अधिक सुस्थितीत, सुरक्षित आणि सुखमय व्हावे म्हणून या देवतांची प्रार्थना करण्यास सुरुवात केली. मग अग्नीचे अग्निदेवतेत, सूर्याचे सूर्यदेवतेत, वायूचे वायुदेवतेत आणि पावसाचे पर्जन्यदेवतेत रूपांतर झाले. ऋग्वेद हा प्रामुख्याने अशा अनेक देवतांची प्रार्थना व स्तुती करणाऱ्या ऋचांचा संग्रह आहे. थोर तत्त्वज्ञ श्री अरविंद यांनी "The Secret of Veda" नावाचा ग्रंथ लिहिला आहे. त्यात ते लिहितात. 'निसर्गदेवतांच्या अशाच प्रार्थना प्राचीन काळात ग्रीस, रोम इत्यादींसारख्या इतर प्राचीन देशातही त्यावेळी होत होत्या. पण या सर्वच देशांत नंतर सर्वच देवांना हळूहळू मानसशास्त्रीय अर्थ व कार्य मिळत गेले. पल्लास अथेन, जी पूर्वी बहुधा उषेची देवता होती व जी झ्यूस या देवतेच्या डोक्यापासून निघत होती, तिला ग्रीसच्या नंतरच्या वाङ्मयात अधिक वरचे स्थान मिळाले व रो नांचे वेळी तिला मिनर्व्हा म्हणजे ज्ञान व पंडित्य यांची देवता असे रूप मिळाले. त्याचप्रमाणे सरस्वती, एक नदी देवता, भारतात ज्ञानाची, शिक्षणाची, कलांची देवता बनली. या रीतीने सर्वच ग्रीक देवतांत अशाच प्रकारचा बदल झाला. अपोलो म्हणजे सूर्यदेव, हा काव्याचा व भविष्याचा देव बनला. हेफॅस्टस, अग्निदेव हा दैवी लोहार, श्रमाचा देव बनला. भारतात ही प्रक्रिया अर्धवटच थांबली व वेदकालीन देवांना मानसशास्त्रीय कार्य मिळाले; पण त्यांचे बाह्यांग तसेच राहिले व उच्च ध्येयांकरिता त्यांचेपासून सर्व देव मंदिरच तयार झाले. अशा रीतीने वेदातील धर्म म्हणजे निसर्गदेवतांची पूजा होय असे मत तयार झाले.'

---

पान २ वरून

# गन्ने का रस

तिथून थोड्याच अंतरावर उसाचा रस काढत यंत्राजवळ रामशरण उभा होता. सुधीर आणि संजू बाजूबाजूलाच चिकटून बसले होते आणि हळू आवाजात एकमेकांशी बोलत होते.



दोघांनाही 'ऊस प्रकरण' भारी पडलं होतं, बहुधा डबल धमाका आई आणि बाबांकडूनही! रामशरणचे ऊस पिळून रस काढणं सुरू होतं. अचानक संजू उठून रामशरणकडे गेला. त्याला असा जाताना पाहून सगळ्यांना भीती वाटली. संजू त्याच्याशी 'भय्या भय्या' म्हणत हिंदीतून बोलत होता आणि रामशरण शांतपणे हसऱ्या चेहऱ्याने ऊस पिळत रस काढत होता. एका खिशातून पैशाची नोट आणि दुसऱ्या खिशातून साबणाचा तुकडा संजूने राम शरणच्या हातात कोंबल्याचं सगळ्यांना दिसलं. परत आल्यावर आता त्यांच्या गाण्याचा खेळ सुरू झाला.

पुन्हा हसणं-खिदळणं, हमरीतुमरी, रुसणं सुरू झालं. अचानक विन्याचे बाबा तिथे येऊन उभे राहिले, तसे सगळे चूप झाले. हातातील कागदाचा तुकडा नाचवत, ते मोठ्याने विचारत होते. ''ही खेळातील पाच रुपयांची नकली नोट रसवाल्याला कोणी दिली?''

---

पान ३ वरून

# विष्णूचे २४ विग्रह

शंखाच्या नादातून सृष्टीचा प्रारंभ आणि धर्मघोषणेचा उद्घोष होतो. त्याचे चक्र काल, नियम, गती आणि सद्रक्षणाय व खलनिर्दालनासाठी आहे. त्याची कौमुदी नावाची गदा त्याचे बल, दंडनीती, नियंत्रण आणि स्थैर्य व्यक्त करते. हातातील पद्म म्हणजे कमळ निर्मलता, सौंदर्य, कारुण्य आणि सृष्टीचा विकास सुचवते. बोपदेवांचा संदर्भ घेऊन इ. स. १७९० मध्ये 'धर्मसिंधू' याग्रंथाचे रचनाकार काशिनाथशास्त्री गोळवलकर (बाबाजी) यांनी विष्णूची २४ नामे आणि त्यांचा चार हातातील चार आयुधे यांच्यातील संबंध विषद करणारे १३ श्लोक लिहिले.

विष्णू हा स्थितिकर्ता आहे. विश्वाचे संचालन करताना राज्यकर्त्याला साम- दाम-दंड- भेद अशा सर्वांची योजना करावी लागते. भारतीय मूर्तिशास्त्रात वरचा हात म्हणजे सूक्ष्म, उच्च, प्रधान शक्ती सांगतो. खालचा उजवा व्यावहारिक कार्य दर्शवितो. उजवी बाजू अधिक क्रियाशील असते तरडावी बाजू तुलनेने सौम्य, आंतरिक गुण दर्शवते.

गणितः चार हात, चार आयुधे यांचा क्रम सतत बदलत गेले तर परम्युटेशन कॉम्बिनेशनच्या सूत्राप्रमाणे २४ प्रकार होतात. पूर्वीच सांगितले हा योगायोग नसून यातून विशिष्ट उद्देश प्रकट होतो. यानुसार विष्णूच्या केशव, नारायण, माधव अशा २४ नावांप्रमाणे २४ विग्रह किंवा मूर्ती होतात. दक्षिण भारतात अशा २४ विष्णु र्तींची मंदिरे आहेत. १) ज्या रूपात चक्राला महत्त्व तेथे सद्रक्षण, दुष्टनिग्रह आणि काल शक्ती बघावी.२) जेव्हा पद्मप्रधान तर सौम्यता, कृपा, पालन हा अर्थ लावावा. ३) गदाप्रधान असल्यास दंड, नीती, न्याय आणि समाज स्थैर्य हा विचार करावा. आणि ४) शंखप्रधान तर धर्मप्रचार, ज्ञान इत्यादींना महत्त्व द्यावे.

आता या लेखनातील इनपूट बाजू मांडून झाली. या सर्वांचा क्रमशः अर्थ लावून विष्णूची २४ नामे आणि २४ विग्रहांच्या जोड्या लावाव्या आणि सांख्यशास्त्रातील २४ तत्त्वे, गायत्रीतील २४ अक्षरे, दिवसाचे २४ काल, वर्षचक्रातील कालप्रवाहाचे २४ संकेत आणि विष्णूची केशव- नारायण- माधवइत्यादी २४ नामांचे चिंतन करावे. ही २४ रूपे म्हणजे सांख्यतत्त्वांवर आधारलेली ईश्वराची कार्यशक्ती, यावर पांचरात्र आणि वैखानस आगमात अधिक विवेचन दिले आहे. त्यानुसार दिशा, तत्त्व, मंत्र, शक्ती, भाव, उपासना असा संबंध आहे. पद्म हे प्रत्यक्ष आयुध नाही, पण राज्यकर्त्याकडून प्रजेला सुख आणि शांततेची अपेक्षा असते. म्हणून राजाजवळ तेही हवे. विष्णू तर त्रैलोकनाथ- विश्वपती आहे. ज्याच्याजवळ जिज्ञासा आणि चिकाटीसुद्धा असेल अशा अभ्यासूला या विषयावर एका फार मोठ्या प्रबंधाचेलेखन करता येईल.

---

पान ४ वरून

# ... मग मज सर्वस्व दिधलें पुरूपोत्तमीं

एकदा ज्ञानमार्ग सांगून झाल्यावर गीता संपली' असे आचार्य विनोबांनीही म्हटलेले आहे. हा पुरुषोत्तम योग नामक अध्याय किती महत्त्वाचा आहे, हे प्रत्यक्ष माउलीनेच सांगितले आहे. केवळ याच अध्यायात नव्हे, तर प्रथमपासूनच सांगितलेले गूढ तत्त्वज्ञान म्हणजे उपनिषदरूपी कमलांमधील ज्ञानरूपी पराग. भगवान वेदव्यासांच्या परास्पर्शी प्रतिभेचा सर्वोच्च आविष्कार म्हणजेच पुरुषोत्तम योग.

सध्या सगळे विश्व मृत्यूच्या छायेत वावरते आहे. एका अनामिक भीतीने साऱ्या मानव जातीला पछाडले आहे. जीवनाच्या क्षणभंगुरतेचा प्रत्यय येतोय. सर्वत्र एका उदासीनतेची गडद छाया पसरलेली आहे. मनाला कुठे उभारी मिळेल, कुठे शांती मिळेल, कशाने मनाची अस्थिरता नष्ट होईल, याचा शोध आपण घेत आहोत, परंतु मनाची उदासीनता जात नाहीये. आपल्या रोजच्या व्यवहारातही तात्पुरत्या आणि टाकाऊ गोष्टी दूर सरल्याशिवाय कायम टिकून राहणाऱ्या बाबी प्राप्त होत नाहीत. ऐंद्रिय विषय मागे टाकल्याविना 'अतींद्रिय' हाती लागत नसते. प्रपंचात गुरफटलेल्या आपल्यासारख्या सामान्य साधकाला, स्वतःकडे बघण्याचा हाच काळ आहे. आत्मशोध हा फार मोठा शब्द आहे. पण आपली ओळख स्वतःशीच करून घ्यायला काही पार्थिव गोष्टीचा त्याग करावा लागतो. 'आत्मार्थे पृथ्वी त्यजेत' ही खूप वरची पायरी आहे. निदान पाऊल टाकायला काय हरकत आहे? शरीराची अनुभूती असते तशीच, अंतरीच्या चैतन्याची अनुभूती आली पाहिजे. पुरुषोत्तम मासाच्या निमित्ताने आपण भगवान श्रीकृष्णांचे स्मरण करतो, करायला हवे. भगवंताचे व्यक्तित्व अतुलनीय आहे. मानुषतत्त्वापासून देवत्वापर्यंतची त्याची वाटचाल म्हणजे जीवन जगण्याचा आदर्श आहे. गोकुळ- मथुरेपासून ते द्वारका- हस्तिनापुरापर्यंत तो सर्वां ध्ये वावरला, सर्व नाती कसोशीने सांभाळली, वाट्याला आलेले प्रत्येक कर्म त्याने कौशल्याने पार पाडले. परंतु कुठेच गुंतला नाही. अलिप्त होता अवतार संपवताना! हा खरा योग, पुरुषोत्तम योग! हा 'पुरुषोत्तम योग' आपल्यालाही सहजतेने जमायला हवा. या योगाच्या साधनेसाठी पुरुषोत्तम मासासारखा दुसरा मुहूर्त नाही.

---

पान ५ वरून

# विदेशी फुलांवर 'बोली'ची माया...

मूळ खोड पाने फुले यांचे औषधी गुणधर्म लोकप्रतिभेने जाणले, त्वचारोगांवर उपयुक्त म्हणून 'नागीण झुडूप' असे नाव ठेवले. या झाडाला हिंदी- उर्दू बोलींमध्ये 'दादमर्दन' असे म्हणतात. दाद म्हणजे त्वचारोग आणि मर्दन म्हणजे चोळणे. भूतगांजाची फुले... महाराष्ट्रात सर्वत्र दिसणारी 'घाणेरी' भारतीय नाही. अमेरिका आणि पश्चिम आफ्रिकेतून ती भारतात शोभेसाठी आणली गेली असे सांगितले जाते. तिचे शास्त्रीय नाव लँटाना कॅमरा हे आहे. विदर्भातील लोकभाषेत घाणेरीला 'भूतगांजा' म्हणतात. घाणेरीच्या खरपूस नक्षीदार आकाराच्या पानांना उग्र वास असतो. फळे पिकली की काळीनिळी- कत्थी होतात. त्याची गोडसर चव छान असते पण जास्त खाल्ली की हिरड्या, जीभ सोलल्यासारखी होते. घाणेरीच्या फळांना 'कामुन्या' म्हणतात. कामुन्या हे बोलीतील नाव आहे. एक परदेशी वनस्पती भारतीय लोकजीवनात रुजली, वाढली आणि आता तर तिचे निर्मूलन अशक्य आहे. आदित्याचीं झाडें... संत ज्ञानेश्वरांनी सूर्यफुलांचे वैशिष्ट्य नेमके सांगितले आहे आदित्याचीं झाडें। सदा सन्मुख सूर्याकडे सूर्यफूल भारतीयांना आवडते. असे सांगितले जाते की सूर्यफुलांची लागवड भारतात होत नव्हती. सूर्यफूल तेराव्या शतकात अमेरिकेतून युरोपासह जगात पोहोचले. भारतात तर स्वातंत्र्योत्तर काळात सूर्यफुलांची लागवड सुरू झाली. असे असले तरी ज्ञानेश्वरीतील उल्लेखानुसार 'आदित्याचे झाड' भारतीयांना वैशिष्ट्यांसह माहीत होते. काही फुलांचे मूळ देशी की विदेशी असा प्रश्न बोली आणि संस्कृतीला पडत नाही. आराटी एवढी पराटी.. आराटी एवळी पराटी गऽऽ पराटी एवळं फूल गऽऽ दारी पावना कोन गऽऽ? दारी पावना पती पतीनं काय आनलं? पतीनं आनला मंगळसूत्राचा जोड तो मी घेतोऽऽ तु च्यासंग येतोऽऽऽ या लोकगीतात आराटी आणि पऱ्हाटी या दोन झाडांचे उल्लेख आहेत. पऱ्हाटी म्हणजे कापसाचे झाड आणि आराटी म्हणजे गुलाबी फुले येणारी काटेरी बाभूळ होय. आरास म्हणजे देखावा सजावट, आराटीची गुलाबी फुले सजावट केल्यासारखी दिसतात. गुलाबी बाभूळ, आराटी चपटा खैर 'चिलोरी' ही बोलीतील नावे आहेत. आराटीचे मूळ देशी असावे. बोलीतील शब्द अर्थसघन असतात.

---

पान ५ वरून

# सत्तापालटाचा 'सायफर' डाव

पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इमरान खान यांची मॉस्कोभेटही अमेरिकेच्या पचनी पडली नसल्याची चर्चा त्यावेळी झाली होती. एका बाजूला आज अमेरिका लोकशाही, पारदर्शकता आणि लोकशाहीरक्षणाचे धडे जगाला देते. मात्र, दुसऱ्या बाजूला त्याच अमेरिकेवर इतर सार्वभौम राष्ट्रांच्या राजकीय प्रक्रियांमध्ये हस्तक्षेप केल्याचे आरोप वारंवार होत आहेत. त्यामुळे 'लोकशाही' हा अमेरिकेच्या सामरिक हितसंबंधांसाठी वापरला जाणारा राजकीय शब्द आहे का? हा प्रश्न अधिकच तीव्र होतो.

विशेष म्हणजे, अमेरिकेच्या या कारवायांमुळे संबंधित देशांमध्ये राजकीय अस्थिरता, अविश्वास आणि कट्टरताच वाढली आहे. पाकिस्तानातील 'सायफर' प्रकरण हा जागतिक लोकशाही, सार्वभौमत्व आणि महासत्तांच्या वर्चस्वाच्या राजकारणावर नव्याने चर्चा घडवून आणणारा विषय आहे. तसेच हे सर्व आताच कसे उघडकीस आले, हा देखील स्वतंत्र संशोधनाचा विषय. मात्र, लोकशाही राष्ट्राची खरी कसोटी ही निवडणुकांमध्ये नसून, महासत्तांच्या दबावापासून मुक्त निर्णय घेण्याच्या क्षमतेत असते आणि नेमका हाच प्रश्न आज पाकिस्तानच्या निमित्ताने पुन्हा जगासमोर उभा राहिला आहे.

# पाकिस्तानची तिहेरी कोंडी आणि अस्तित्वाचे संकट

परराष्ट्रकारण
हेमंत महाजन

**गेल्या काही वर्षांत पाकिस्तानमधील अंतर्गत सुरक्षा परिस्थिती अत्यंत गंभीर आणि गुंतागुंतीची झालेली दिसते. एकेकाळी स्वतःला इस्लामिक जगातील बलाढ्य सैन्यशक्ती समजणाऱ्या पाकिस्तानसमोर आता अंतर्गत बंडखोरी, सीमावाद, आर्थिक दिवाळखोरी, धार्मिक अतिरेकी हिंसा आणि भारताविरोधातील अपयशी धोरण यांसारखी अनेक संकटे उभी ठाकली आहेत. पाकिस्तानी सैन्य आज प्रत्यक्षात 'थ्री फ्रंट वॉर' म्हणजे तीन वेगवेगळ्या आघाड्यांवर संघर्ष करत आहे. पाकिस्तानवरील या तिहेरी संकटाचा आढावा घेणारा हा लेख...**



पहिली आघाडी म्हणजे भारत-पाकिस्तान सीमा, दुसरी आघाडी म्हणजे अफगाणिस्तान सीमेजवळील खैबर पख्तूनख्वाचा भाग आणि तिसरी आघाडी म्हणजे बलुचिस्तानमधील स्वातंत्र्यवादी व दहशतवादी चळवळी. या तिन्ही आघाड्यांवर एकाच वेळी संघर्ष करणे हे कोणत्याही देशासाठी अत्यंत कठीण असते. त्यातच जनतेचा सैन्यावरचा विश्वाससुद्धा कमी होत चालला आहे.

**सौदी अरबमध्ये पाकिस्तानी सैन्याची तैनाती**

सौदी अरबच्या सुरक्षेसाठी पाकिस्तानी सैन्याची मोठ्या प्रमाणावर तैनाती करण्यात आलेली आहे. विशेषतः इराणकडून होणाऱ्या संभाव्य क्षेपणास्त्र किंवा ड्रोन हल्ल्यांच्या पार्श्वभूमीवर पाकिस्तानने ४० ते ५० हजार पाकिस्तानी सैनिक सौदी अरबमध्ये पाठवले आहेत. पाकिस्तानला स्वतःच्या सीमांवर आणि अंतर्गत भागात मोठ्या प्रमाणावर सैन्याची आवश्यकता असताना त्यांचे अनुभवी सैनिक परदेशात गुंतलेले आहेत. त्यामुळे पाकिस्तानच्या लष्करी क्षमतेचे विभाजन झाले आहे.

**बलुचिस्तानमधील वाढती बंडखोरी**

आज पाकिस्तानसमोरील सर्वात मोठे अंतर्गत आव्हान म्हणजे बलुचिस्तानमधील बंडखोरी. बलुच लोकांचा आरोप आहे की, पाकिस्तान सरकार त्यांच्या नैसर्गिक संपत्तीची लूट करते. पण, विकासमात्र पंजाब प्रांतात होतो. 'चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडोर' (CPEC) प्रकल्पानंतर बलुच असंतोष आणखी तीव्र झाला आहे. 'बलुचिस्तान लिबरेशन आर्मी' (बीएलए) आणि इतर सशस्त्र संघटना आता पूर्वीपेक्षा अधिक संघटित आणि आक्रमक झाल्या आहेत. त्यांनी पाकिस्तानी सैन्य, पोलीस, गुप्तचर यंत्रणा आणि चिनी नागरिकांवर अनेक हल्ले केले आहेत. ग्वादर बंदर, रेल्वेमार्ग, लष्करीतळ आणि सरकारी इमारती सतत लक्ष्य बनत आहेत.

विशेष म्हणजे, पाकिस्तानी सैन्याला जमिनीवर उतरून मोठ्या प्रमाणावर कारवाई करण्यास अनेकदा भीती वाटते. त्यामुळे पाकिस्तान प्रामुख्याने हेलिकॉप्टर, गनशिप, ड्रोन, फायटर जेट्स आणि क्षेपणास्त्रांच्या मदतीने हवाई हल्ले करत आहे. परंतु, अशा कारवायांमध्ये अनेकदा सामान्य नागरिक मारले जातात. परिणामी, बंडखोरी संपण्याऐवजी मजबूत होत आहे.

**खैबर पख्तूनख्वामध्ये 'टीटीपी'चे पुनरुज्जीवन**

पाकिस्तानसमोरील दुसरे मोठे संकट म्हणजे 'तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान' ('टीटीपी') या संघटनेचा वाढता प्रभाव. अमेरिकेने अफगाणिस्तानमधून माघार घेतल्यानंतर आणि अफगाण तालिबानने काबुलवर सत्ता मिळवल्यानंतर 'टीटीपी' अधिक आक्रमक झाली आहे. आज खैबर पख्तूनख्वा आणि आदिवासी भागांमध्ये पाकिस्तानी सैन्यावर जवळजवळ रोज हल्ले होत आहेत.

लष्करीतळ, पोलीस स्टेशन, चेकपोस्ट आणि सैन्याचे ताफे सतत लक्ष्य बनत आहेत. पाकिस्तानला सर्वात मोठा धक्का म्हणजे अफगाण तालिबान आता पाकिस्तानच्या बाजूने पूर्णपणे उभे राहत नाहीत. उलट, 'टीटीपी'ला अफगाण भूमीवर आश्रय मिळत असल्याचा आरोप पाकिस्तान करतो. त्यामुळे पाकिस्तान-अफगाणिस्तान संबंध गंभीर तणावात आले आहेत.

पाकिस्तानी सैन्याची समस्या अशी आहे की, त्यांनीच अनेक दशकांपूर्वी जिहादी धोरण राबवले होते. भारताविरोधात आणि अफगाणिस्तानमध्ये प्रभाव वाढवण्यासाठी ज्या अतिरेकी गटांना वाढवले, तेच आता पाकिस्तानविरोधात शस्त्रे उचलत आहेत. त्यामुळे पाकिस्तान आज स्वतःच्या निर्माण केलेल्या दहशतवादाच्या जाळ्यात अडकला आहे.

**भारताविरोधातील सततची शत्रुत्वाची भूमिका**

पाकिस्तानी सैन्याची पारंपरिक आणि सर्वात महत्त्वाची आघाडी म्हणजे भारत. काश्मीरमध्ये हिंसाचार वाढवण्यासाठी घुसखोरी, दहशतवादी संघटनांना मदत आणि सीमावर्ती भागात संघर्षविराम उल्लंघन ही त्यांची जुनी नीती राहिली आहे. जम्मू- काश्मीरमध्ये भारतीय सुरक्षा दलांनी दहशतवादाचे कंबरडे मोडले आहे. सीमावर्ती भागात अत्याधुनिक तंत्रज्ञान, ड्रोन सर्व्हेलन्स, स्मार्ट फेन्सिंग आणि जलद प्रतिसाद प्रणालीमुळे घुसखोरीचे प्रमाण कमी झाले आहे. सर्जिकल स्ट्राईक, बालाकोट हल्ला आणि त्यानंतरची भारतीय भूमिका पाहता, पाकिस्तानला आता भारताविरोधात मोठा लष्करी संघर्ष उभा करण्याची हिंमत होत नाही.

**आर्थिक संकटामुळे वाढलेले आव्हान**

कोणतेही युद्ध किंवा सुरक्षा मोहीम चालवण्यासाठी मजबूत अर्थव्यवस्था आवश्यक असते. पण, पाकिस्तानची अर्थव्यवस्था आज अत्यंत कमजोर झाली आहे. प्रचंड महागाई, परकीय कर्ज, चलनाचे अवमूल्यन आणि बेरोजगारीमुळे देश संकटात आहे. आर्थिक संकटामुळे सैन्याच्या आधुनिकीकरणावर परिणाम झाला आहे. इंधन, दारुगोळा, सुटे भाग आणि तांत्रिक उपकरणांची कमतरता निर्माण होत आहे. चीनकडून मिळणाऱ्या मदतीवर पाकिस्तान मोठ्या प्रमाणावर अवलंबून झाला आहे. दुसरीकडे बलुचिस्तान, खैबर पख्तूनख्वा आणि भारत सीमा या तिन्ही भागांमध्ये एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर सैन्य तैनात ठेवणे पाकिस्तानसाठी अत्यंत खर्चिक ठरत आहे.

**पाकिस्तानी सैन्याची मानसिक आणि रणनीतिक अवस्था**

आज पाकिस्तानी सैन्याची सर्वात मोठी समस्या म्हणजे 'ओव्हर स्ट्रेच' म्हणजेच क्षमतेपेक्षा जास्त ताण. एकाच वेळी अनेक संघर्षांमध्ये अडकलेल्या सैन्याचे मनोबल खालावू लागते. सततचे दहशतवादी हल्ले, आत्मघाती कारवाया आणि सैनिकांचे वाढते मृत्यू यामुळे मानसिक दबाव वाढत आहे. पाकिस्तानच्या इतिहासात प्रथमच मोठ्या प्रमाणावर सामान्य लोकांनी लष्करावर थेट टीका केली. त्यामुळे सैन्याची अस्पर्शनीय प्रतिमा हादरली आहे.

**पाकिस्तानला यश कितपत मिळत आहे?**

जर तिन्ही आघाड्यांचा विचार केला, तर पाकिस्तानला कुठेही निर्णायक यश मिळताना दिसत नाही. बलुचिस्तानमध्ये बंडखोरी संपलेली नाही. उलट, अधिक संघटित होत आहे. खैबर पख्तूनख्वामध्ये 'टीटीपी' अधिक आक्रमक झाली आहे. भारताविरोधात घुसखोरी आणि दहशतवाद वाढवण्याचे प्रयत्न मोठ्या प्रमाणात अपयशी ठरत आहेत. अफगाणिस्तानसोबतचे संबंध तणावपूर्ण आहेत. आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस खराब होत आहे. म्हणजेच, कोणत्याही समस्येवर कायमस्वरूपी उपाय शोधण्यात त्यांना अपयश येत आहे.

**पाकिस्तानी सैन्यदलाची बदलती प्राथमिकता आणि सुरक्षा आव्हाने**

देशाच्या सीमांवरील वाढते धोके आणि अंतर्गत बंडाळी मोडून काढण्याऐवजी, जनरल असीम मुनीर यांचे लक्ष सध्या मुत्सद्देगिरी आणि आर्थिक फायद्यांवर अधिक केंद्रित असल्याचे चित्र आहे. पाकिस्तानी लष्करप्रमुखांचे मुख्य कार्य देशाचे संरक्षण करणे हे असते. मात्र, जनरल मुनीर सध्या इराण आणि अमेरिका यांच्यातील तणावात मध्यस्थ म्हणून भूमिका बजावण्याचा प्रयत्न करत आहेत. यामागे दोन मुख्य हेतू दिसतात : जागतिक स्तरावर एक 'शांतिदूत' म्हणून प्रतिमा निर्माण झाल्यास पाकिस्तानला पश्चिमी देशांकडून आणि इस्लामिक जगाकडून विशेष महत्त्व मिळेल, असे त्यांना वाटते. त्यातच पाकिस्तानची अर्थव्यवस्था सध्या 'व्हेंटिलेटर'वर आहे. 'आयएमएफ'कडून नवीन कर्ज मिळवण्यासाठी अमेरिकेची मर्जी राखणे मुनीर यांच्यासाठी अनिवार्य झाले आहे. मात्र, या 'डिप्लोमसी'च्या नादात लष्कराचे मुख्य कर्तव्य असलेल्या 'राष्ट्रीय सुरक्षा' या विषयाकडे दुर्लक्ष होत आहे.

पाकिस्तानी सैन्याची पारंपरिक ओळख 'आक्रमकता' ही राहिली आहे. मात्र, सध्याच्या काळात लष्करी नेतृत्वाने 'जगा आणि जगू द्या' (Live and Let Live) असे बचावात्मक धोरण स्वीकारल्याचे दिसते. याचे परिणाम सैनिकांच्या मानसिकतेवर होत आहेत. जेव्हा नेतृत्व सीमेपेक्षा परकीय कर्जावर अधिक चर्चा करते, तेव्हा सामान्य सैनिकाचे लढण्याचे मनोबल खचते. लष्करी अधिकारी जेव्हा व्यावसायिक करारांमध्ये आणि राजकीय तडजोडीत गुंततात, तेव्हा प्रत्यक्ष युद्धभूमीवरील सराव आणि शिस्त यावर त्याचा नकारात्मक परिणाम होतो. दहशतवादी गटांविरुद्ध कठोर कारवाई करण्याऐवजी अनेक ठिकाणी 'तडजोड' करण्याची वृत्ती बळावत आहे, ज्यामुळे शत्रू गटांचे धाडस वाढत आहे. जर पाकिस्तानने आपले धोरण बदलले नाही, तर भविष्यात परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. आज पाकिस्तानी सैन्य अत्यंत कठीण आणि अभूतपूर्व परिस्थितीतून जात आहे. भारत सीमा, अफगाण सीमा आणि अंतर्गत दहशतवाद या तिन्ही आघाड्यांवर ते एकाच वेळी संघर्ष करत आहे. परंतु, या संघर्षांमध्ये त्यांना निर्णायक यश मिळत नाही. यामागील सर्वात मोठे कारण म्हणजे पाकिस्तानने अनेक दशकांपासून चुकीची सुरक्षानीती स्वीकारली.

दहशतवादाला परराष्ट्र धोरणाचे साधन म्हणून वापरण्याचा प्रयत्न अखेरीस पाकिस्तानलाच महागात पडला आहे. आज पाकिस्तानसमोर केवळ लष्करी नव्हे; तर राजकीय, आर्थिक आणि सामाजिक अस्तित्वाचे संकट उभे ठाकले आहे. जर पाकिस्तानने अतिरेकी धोरण सोडून आर्थिक विकास, लोकशाही स्थैर्य आणि शेजाऱ्यांशी शांततापूर्ण संबंध यावर भर दिला नाही; तर भविष्यात त्यांच्यासमोरील सुरक्षा आव्हाने आणखी गंभीर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

---

# 'नीट' घोळावर तोडगा काय?

आकलन
तेजस परब

**"भारतातील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या 'एमबीबीएस', 'बीडीएस', नर्सिंग, 'बीएएमएस', 'बॅचलर ऑफ सर्जरी'सारख्या अभ्यासक्रमांना प्रवेश मिळवण्यासाठी 'नीट' परीक्षा घेतली जाते. सदरची परीक्षा ही राष्ट्रीय पात्रता आणि प्रवेश परीक्षा नावाने म्हणजे सदरची परीक्षा ही देशातील इंग्रजी, हिंदी, बंगाली, उर्दू, आसामी, गुजराती, मराठी, उडिया, कन्नड, तामिळी, मल्याळम्, पंजाबी आणि तेलगू इत्यादी प्रादेशिक भाषांतून घेतली जाते. वैद्यकीय क्षेत्रात ज्या विद्यार्थ्याला करिअर करायचे आहे, त्या विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा अत्यंत महत्त्वाची. मुळात ही राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा केंद्रीय स्तरावरून घेतली जात असली, तरी ही परीक्षा २०१२ साली होणे अपेक्षित होते. तशी मागणी पुढे आली होती."**



मात्र, त्यानंतर चर्वितचर्वण झाल्यानंतर झालेल्या विविध घडामोडी लक्षात घेऊन दि. ५ मे २०१३ रोजी पहिल्या 'नीट' परीक्षेचे आयोजन करण्यात आले. त्यानंतर परीक्षेचा वाद पुन्हा न्यायालयात गेला. त्यासंदर्भात न्यायालयीन प्रक्रिया झाली आणि भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने 'नीट' परीक्षा असंविधानिक असल्याचा निकाल देत, परीक्षा बेकायदेशीर ठरवली. मात्र, त्यानंतर पुन्हा पाच न्यायाधीशांच्या घटनापीठाने पूर्वीचा निकाल मागे घेत, केंद्र सरकार आणि 'भारतीय वैद्यकीय परिषदे'च्या वतीने घेतल्या जाणाऱ्या 'नीट' परीक्षेला परवानगी दिली. त्यानंतर पुन्हा दि. ११ एप्रिल २०१६ पासून परीक्षा घेण्याचे धोरण सरकारने जाहीर केले.

आरंभी ही परीक्षा 'सीबीएसई' मंडळ घेत होते. मात्र, त्यानंतर सरकारी धोरणाचा परिणाम म्हणून, त्यासाठी स्वतंत्र यंत्रणेचा विचार पुढे आला आणि वैद्यकीय प्रवेशासाठीची परीक्षा घेण्याची जबाबदारी ही 'एनटीए'सारख्या संस्थेवर निश्चित करण्यात आली. २०१७ पासून ही परीक्षा 'एनटीए'च घेत आहे. या संस्थेकडे साधारण १६ प्रकारच्या परीक्षा घेण्याची जबाबदारी आहे. जगातील ही परीक्षा घेणारी सर्वात मोठी संस्था असावी, असे मानले जात असले; तरी गेली काही वर्षे या संस्थेच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या या परीक्षांमधील सावळ्यागोंधळाने पुन्हापुन्हा परीक्षेच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. एखाद्या राज्यात अशा परीक्षा घेणे शक्य असले, तरी भारतासारख्या विशाल आणि लोकसंख्येचा विस्फोट झालेल्या देशात अशा स्वरूपात एकाच संस्थेने परीक्षा घेणे, हेच मोठे आव्हान आहे. त्यातून गेली काही वर्षे घोटाळे बाहेर येत आहेत. गेल्या नऊ वर्षांत १६हून अधिक परीक्षा रद्द करण्याची नामुष्की संबंधित संस्थेवर आली आहे. त्यामुळे 'एनटीए'च्या विश्वासार्हतेवर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापूर्वी, नुकताच २०२४ मध्ये 'नीट' परीक्षेच्या वेळीही मोठा गोंधळ निर्माण झाला होता. निकाल जाहीर होताच, अनेक विद्यार्थ्यांना असामान्यरीत्या अधिक गुण मिळाल्याचे समोर आले होते. काही विद्यार्थ्यांना वाढीव गुण देण्यात आल्याचा आरोप झाला होता. त्याचबरोबर एका केंद्रातील अनेक विद्यार्थ्यांना एकसारखे गुण मिळाल्याने संशय गडद झाला होता. त्यावेळीही प्रश्नपत्रिका फुटल्याचे आरोप झाले होते.

सर्वोच्च न्यायालयापर्यंत हे प्रकरण पोहोचले आणि 'राष्ट्रीय परीक्षा संस्थे'च्या कारभारावर त्यावेळी अधिक जोरदार टीका पालक व समाजातून झाली. यावर्षी तर पेपर फुटल्याचेच समोर आले. पेपरफुटीचे सूत्रधार देशातील अनेक राज्यांत आहेत. त्यावेळी दुर्दैवाने महाराष्ट्राचे तरुण हाती लागले आहेत.

देशातील अत्यंत प्रतिष्ठित असलेले जे मोजके अभ्यासक्रम आहेत, त्यात वैद्यकीय आणि काही प्रमाणात अभियांत्रिकीच्या अभ्यासक्रमाचा समावेश आहे. आपल्या पाल्याचे वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पालक मोठ्या प्रमाणावर लाखो रुपये खर्च करत असतात. या परीक्षेचे मोल लक्षात घेता, देशातील काही शहरे फक्त या परीक्षेच्या पूर्वतयारीचे शिकवणी वर्ग चालवणारी शहरे म्हणूनच ओळखली जात आहेत. त्यातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल केली जाते आहे. एकीकडे पालकांना पैशांची करावी लागणारी उधळण आणि त्याच वेळी दुसऱ्या बाजूला विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाला प्रवेश मिळावा म्हणून करावे लागणारे जीवाचे रान, हे सारे पाहिले की, विद्यार्थ्यांसाठी ही परीक्षा किती महत्त्वाची आहे हे लक्षात येईल. अनेक विद्यार्थी अपेक्षित वैद्यकीय अभ्यासक्रमांना प्रवेश मिळावा म्हणून दोन-चार वर्षे तयारी करतात. त्यासाठी खासगी शिकवण्या, निवासी अभ्यासवर्गात प्रवेश घेतला जातो. जितकी वर्षे अभ्यास केला जातो, तितकी वर्षे विद्यार्थी प्रचंड मानसिक तणावाखाली असतात. अशा परिस्थितीत पेपरफुटी किंवा निकालातील संशयास्पद प्रकार पुढे आल्यास विद्यार्थ्यांच्या मानसिकतेवर त्याचा अत्यंत विपरीत परिणाम होतो. यावर्षीच्या घडलेल्या गैरप्रकारामुळे विद्यार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे. मुळातच 'एनटीए'वर गेल्या काही वर्षांत अनेक परीक्षांबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. परीक्षेचे नियोजन, केंद्र व्यवस्था, निकाल प्रक्रिया आणि तांत्रिक त्रुटी यांबाबत वारंवार तक्रारी समोर येत आहेत.

विशेषतः 'नीट' आणि इतर राष्ट्रीय प्रवेश परीक्षांमध्ये वाढत्या गैरप्रकारांमुळे संस्थेची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. मुळातच 'नीट'ची परीक्षा घेत असताना संबंधितांकडून अधिक काळजी घेतली जात असते, असे सांगितले जाते. अत्यंत कडक वातावरणात ही प्रक्रिया केली जात असताना पेपर फुटणे किंवा इतर गैरप्रकार घडणे, हे चिंताजनक मानायला हवे. प्रश्नपत्रिकानिर्मिती ते छपाई आणि वितरण यासंदर्भात असलेली प्रक्रिया अधिक गंभीर आहे. प्रश्नपत्रिका निश्चित करताना देशभरातील वरिष्ठ प्राध्यापक, वैज्ञानिक व विषयतज्ज्ञांची गोपनीय समिती स्थापन केली जाते. निवडल्या गेलेल्या सर्व सदस्यांचे गोपनीयता करारांतर्गत काम सुरू असते. संबंधित संपूर्ण प्रक्रिया ही 'एनसीईआरटी' अभ्यासक्रमावर आधारित असते. प्रारंभी हजारो प्रश्नांची प्रश्नपेढी तयार केली जाते. त्यानंतर संबंधित प्रश्न हे वेगवेगळ्या श्रेणींमध्ये विभागले जातात. सुमारे ३० टक्के प्रश्न मूलभूत सिद्धांत आणि सूत्रांवर आधारित असतात, जेणेकरून सामान्य तयारी असलेले विद्यार्थीही पेपर सोडवू शकतील. प्रश्नपत्रिका निश्चिती झाल्यानंतर छपाईसाठीची प्रक्रियादेखील अधिक सुरक्षित आहे, असे सांगितले जाते. त्यात छपाईसाठीची निविदा प्रक्रिया केली जाते. नंतर लेखापरीक्षण व सुरक्षा तपासणी झालेल्या मोजक्याच मुद्रणालयांना सदरचे काम दिले जाते. टायपिंगपासून छपाई व बांधणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर 'एनटीए'चे अधिकारी उपस्थित असतात. मुद्रणालय परिसरात सर्वत्र 'सीसीटीव्ही' कॅमेरे असतात; 'सीसीटीव्ही'तील चित्रण किमान एक वर्ष सुरक्षित ठेवले जाते. त्याचबरोबर ज्या मुद्रणालयात सदरच्या प्रश्नपत्रिका छापल्या जाणार आहेत, तेथे सुरक्षाव्यवस्था अत्यंत काटेकोर असते. प्रश्नपत्रिका छपाई दरम्यान प्रत्येक प्रवेशद्वारावर 'एनडीए'ने नियुक्त केलेले सुरक्षारक्षक असतात. बाहेरील व्यक्तींना प्रवेश पूर्णपणे बंद केलेला असतो.

मुद्रणालयातील कर्मचाऱ्यांनाही मोबाईल फोन किंवा कॅमेरा नेण्यास मनाई केलेली असते. प्रश्नपत्रिका 'डिजिटल संकेतीकरणा'च्या स्वरूपात मुद्रणालयात पोहोचवली जाते. प्रत्येक पानावर स्वतंत्र 'युनिक कोड' असतो. यामुळे कोणतीही गडबड झाल्यास त्याचा स्रोत शोधणे शक्य. छपाई पूर्ण झाल्यानंतर प्रश्नपत्रिका 'जीपीएस- लॉक' असलेल्या वाहतूक साधनामध्ये सीलबंद करून वितरित केल्या जातात. गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी 'नीट'साठी साधारणतः तीन वेगवेगळे प्रश्नसंच तयार केले जातात. तयार झालेले प्रश्नसंच छपाईनंतर पूर्णपणे 'सीलबंद' करून 'जीपीएस ट्रेकिंग' असलेल्या वाहनांद्वारे 'स्ट्राँगरूम' आणि त्यानंतर परीक्षा केंद्रांपर्यंत पोहोचवल्या जातात. या प्रक्रियेतील प्रत्येक हालचाल नोंदवली जाते. अशी अत्यंत कडक प्रक्रिया असतानादेखील प्रश्नपत्रिका फुटतात, हे अधिक गंभीर आहे. मुळात अशा प्रश्नपत्रिका नेमक्या कशा बाहेर पडतात, याचा शोध आता पोलीस घेतील. यात प्रक्रियेतील कोणी सहभागी आहेत का, याचाही शोध घेतला जाईल. सध्या हा तपास 'सीबीआय'कडे देण्यात आल्याने प्रश्नपत्रिका फुटीत सहभागी असलेल्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचण्याची आशा निर्माण झाली आहे. मुळात सदरच्या परीक्षांचे केंद्रीकरण केल्यामुळे प्रचंड ताण संबंधित संस्थेवर येणार, यात शंका नाही. देशात यावर्षी सुमारे २३ लाख विद्यार्थी 'नीट'साठी प्रविष्ट झाले होते. देशातील अनेक जिल्ह्यांत परीक्षा केंद्र, तेथील नियोजन, व्यवस्था या सर्व गोष्टींचे व्यवस्थापन करणे अत्यंत जिकरीचे आहे. पालक लाखो रुपये खर्च करून शिकवणी वर्गाला प्रवेश मिळवत आहेत. त्या शिकवणी वर्गाला भविष्यात आपल्याकडे अधिकाधिक विद्यार्थी आकर्षित करण्याचा विचार शिकवणी वर्गाचे चालक करत आहेत. त्यामुळे गैरप्रकारात अनेकदा शिकवणी वर्गातील लोक सहभागी असतात. त्यामुळे शिकवणी वर्ग कायमचे प्रतिबंधित करण्याचे आव्हान आहे. हे आव्हान वर्तमानात पेलणे काहीसे कठीण आहे. अशाप्रकारे वर्ग चालवल्याने शिक्षणाच्या मूळ हेतूलाच बाधा आली आहे. विशिष्ट अभ्यासक्रमाला प्रवेश मिळावा म्हणून केवळ विशिष्ट विषयाचे शिकवणी वर्ग यातून समग्र विकासाची अपेक्षा हरवत चालली आहे. त्यावर मात कशी करणार, हा प्रश्न आहे. त्याचबरोबर जागतिकीकरण, मुक्त अर्थव्यवस्था, खासगीकरणाच्या नंतर मूल्यांचा ऱ्हास होतो आहे आणि त्याच वेळी 'पैसा सबकुछ' बनत चालला आहे. विद्यार्थ्यांमध्ये दिवसेंदिवस चैन करण्याची व भौतिक सुखासाठी सारेकाही करण्याची वृत्ती वाढत असल्याने पैसा मिळवण्याच्या हेतूने तरुणाई या वाममार्गात सहभागी होत आहे. त्यामुळे शिक्षणाचा मूलभूत हेतू लक्षात घेऊन भारतीय मूल्यांची पेरणी करण्याचे आणि संवर्धन करण्याचे आव्हान पेलावे लागणार आहे.

केवळ कायदे कडक करून परिवर्तनाची शक्यता नाही. कारण, आपल्याकडे अनेक कायदे आहेत, म्हणून गुन्हेगारीला आळा बसला आहे, असे घडले नाही. यासाठी मानसिक परिवर्तन आणि शिक्षणाचे पावित्र्य टिकवण्यासाठीचे प्रयत्न व्हायला हवे आहेत.

# पश्चिम आशियातील युद्धसंघर्ष आणि भारतीय अर्थव्यवस्था




**आखाती युद्धाला दोन महिने लोटले, तरी यादरम्यान अन्य देशांच्या तुलनेत भारतातील इंधन पुरवठा आणि महागाई नियंत्रणात राखण्यात सरकारला यश आले. अजूनही या युद्धावर अंतिम तोडगा न निघाल्याने, युद्धाचे सावट कायम आहेच. तसेच जागतिक पुरवठा साखळी विस्कळीत झाल्यामुळे जगभरात इंधन दरातही वाढ झालेली दिसते. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचतीसह सार्वजनिक वाहनांचा वापर, सोनेखरेदी टाळण्याचेही आवाहन केले. त्यानिमित्ताने पश्चिम आशियातील युद्धसंघर्षातही तग धरुन उभे राहिलेल्या भारतीय अर्थव्यवस्थेमागील व्यवस्थापननीतीचा आढावा घेणारा हा लेख...**

वेधक दत्तात्रय आंबुलकर

सुरुवातीला इराण-इस्रायल व त्यानंतर लगेच अमेरिकेसह सर्वच आखाती देशांना या भीषण युद्धाची झळ बसली. आता दोन महिने उलटून गेले तरी, या युद्धाची व्यापकता वाढतीच आहे. उभयपक्षी घेण्यात आलेल्या आक्रस्ताळ्या महत्त्वाकांक्षेपोटी कालावधीत नागरी परिसर-शहरांपासून शस्त्रास्त्रसाठे-अण्वस्त्र केंद्रांना लक्ष्य करण्यात आले. त्याचे स्वाभाविक परिणाम मानवीहानीपासून विध्वंसापर्यंत झाले. यातून व्यापारी- व्यावसायिक व आयात- निर्यात क्षेत्रदेखील जागतिक पातळीवर प्रभावित झाले.

युद्धाशी संबंधितच नव्हे, तर त्याच्याशी दुरान्वयानेसुद्धा संबंध नसलेल्या देशांच्या आर्थिक व्यापार-व्यवहारांवर यामुळे स्वाभाविकपणे विपरीत परिणाम झाले. या मोठ्या विपरीत आर्थिक उलाढालींना भारत आणि भारतीय अर्थव्यवस्था अपवाद ठरली, ही बाब आज जगातील मुत्सद्यांपासून अर्थतज्ज्ञांपर्यंत मान्य करण्यात येत असून, त्याची कारणमीमांसा करतानाच, या पार्श्वभूमीचा धांडोळा घेणे म्हणूनच महत्त्वाचे ठरते.

सुमारे दोन महिन्यांहून अधिक काळ सुरु असलेल्या या युद्धानंतर सुमारे १५ दिवसांच्या सशर्त युद्धबंदीनंतरच्या काळात, या युद्धाचे भारत आणि भारतीय अर्थव्यवस्थेवर झालेले अथवा होऊ घातलेले परिणाम, हा विविध संदर्भात चर्चिला गेलेला विषय ठरला. युद्धग्रस्त आखाती देशांतील तेलसाठे व अण्वस्त्र केंद्रांच्या पार्श्वभूमीवर आर्थिकसंदर्भात सांगायचे म्हणजे, पाकिस्तानसारख्या शेजारी व कर्जबाजारी देशांसह आंतरराष्ट्रीय पातळीवर अनेकार्थांनी आर्थिक अस्थिरतेवरील भारताची भूमिका व कारवाई उजवी ठरली. त्यातही महत्त्वाचे म्हणजे, भारत सरकारने तातडीचे व धोरणात्मक निर्णय घेत, तेलसाठे व त्याचा संग्रह करण्यावर सातत्याने भर देतानाच, चलनवाढीवर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वपूर्ण व उल्लेखनीय काम केलेले आहे.

भारताचे मुख्य आर्थिक सल्लागार अनंत नागेश्वरन यांच्या मते, प. आशियातील युद्ध, त्यानंतरची स्थिती व सध्याची परिस्थिती या सार्याचा एकत्रित परिणाम प्रचलित आर्थिक वर्षात होणार असून, पूर्वी अनुमानित वार्षिक ६.६ टक्के विकासदराचे त्यानुसार फेरअवलोकन करणे अपरिहार्य ठरणार आहे. त्यांच्या मते, सध्याची जागतिक स्तरावरील आर्थिक अस्थिरता पाहता, सध्याच याविषयी टिप्पणी करणे घाईचे व धाडसाचे ठरेल. दरम्यान, 'गोल्डमन अॅण्ड मूडीज'च्या नव्या आर्थिक अभ्यासानुसार, या युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतात नवा आर्थिक विकासदर ५.९६ टक्के ठरण्याचा अंदाज वर्तविला आहे. हे अंदाज भारताच्या अर्थव्यवस्थेवर युद्धामुळे होणारे संभाव्य आर्थिक परिणाम दर्शवितात.

तुलनात्मकदृष्ट्या गेल्यावर्षी अनंत नागेश्वरन यांच्या आर्थिक अंदाजानुसार, डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या ५० टक्के अतिरिक्त अधिभारामुळे भारताच्या गेल्यावर्षीच्या आर्थिक विकासदरात ०.०५ ते ०.०६ टक्के घसरण होईल, असे स्पष्ट केले होते. 'गोल्डमन अॅण्ड मुडीज'ने गेल्यावर्षीच्या त्यांच्या अभ्यासानुसार, भारताच्या आर्थिक विकासदरात सुमारे एक टक्क्यांची घट नमूद केली होती.

दोन्ही परिस्थितींमध्ये भारताच्या आर्थिक विकासदरावर विपरीत परिणाम व्यक्त केला होता आर्थिक जाणकारांच्या मते, इराण-इस्रायल युद्धाचे भारतावर चार प्रकारे परिणाम होऊ शकतील. यामध्ये भारताला होणाऱ्या तेल- वायूच्या पुरवठ्यामध्ये मोठ्या प्रमाणावर अवलंब वा व्यत्यय येणे, खत- निर्यातीला होणाऱ्या विलंबित आयातीमुळे भारतीय शेती आणि शेतकऱ्यांवर परिणाम होणे, एकूणच आयात खर्चामध्ये अस्थिरता, विलंब व वाढ होणे व वाहतूक खर्चात प्रचंड वाढ होणे यांचा प्रामुख्याने उल्लेख करण्यात येतो.

या साऱ्यांचा एकत्रित व अपरिहार्य परिणाम म्हणून एकूणच आर्थिक व्यवहार विलंबाने होऊ शकतात व त्याचा अपरिहार्य फटका भारताच्या अर्थव्यवस्थेला बसणार आहे. रुपयाचे अवमूल्यन व भारतीय शेअर बाजारात अस्थिरतेसह घसरण इ. सुद्धा होऊ शकते. या प्रमुख आव्हानात्मक परिस्थितीतसुद्धा अनंत नागेश्वरन यांच्यानुसार, भारताची अर्थव्यवस्था ही आजही सक्षम समजली जाते. त्यामुळे भारत आणि भारताच्या अर्थव्यवस्थेला युद्ध व त्यानंतर निर्माण झालेली अथवा निर्माण होऊ शकणारी आव्हाने कठीण असली, तरी अशक्य ठरणारी नाहीत.



यासंदर्भातील लक्षणीय बाब म्हणजे, युद्धपूर्व काळात व ट्रम्पच्या आर्थिक मनमानीला तोंड द्यावे लागले असतानासुद्धा भारताची अर्थव्यवस्था भक्कम होती. तशातच भारताला अमेरिकेशिवाय युरोपीय देशांचे पाठबळ मिळाल्याने देशांतर्गत मुद्रास्फीती सुमारे १.३ टक्क्यांवर येण्याचे आर्थिक आक्रित घडले होते.

तुलनेने दीर्घकाळ चाललेले युद्ध, त्यावर पाकिस्तानने केलेली अपूर्ण व अपरिपक्व मध्यस्थी व अखेरीस युद्धबंदी दृष्टिक्षेपात न येण्याच्या पार्श्वभूमीवर, जगातील अन्य देशांप्रमाणेच भारताच्या परराष्ट्रीय धोरणासोबतच आर्थिक ऊर्जाविषयक संकटे कायमच आहेत. जनसामान्यांपासून व्यापार- उद्योगापर्यंत युद्धाची झळ लागण्याच्या पार्श्वभूमीवर भारताची भूमिका आणि बाजू अनेकार्थांनी वरचढ ठरली आहे.

यासंदर्भात जागतिक पातळीवर तुलना करता, भारताने आपला ऊर्जा क्षेत्रासाठी आवश्यक असणाऱ्या तेल व वायूचा साठा- पुरवठा कायम राखण्याचे आव्हान यशस्वीपणे पेलले आहे. इतर अनेक मोठ्या देशांसाठी युद्धकाळात अशक्यप्राय ठरलेली अशी देशपातळीवर सुमारे दोन महिन्यांसाठी आवश्यक असा इंधनसाठा भारताने कायम तर राखलाच व तेही तेल- इंधनदरात नियंत्रण राखून. भारतीय अर्थव्यवस्थेची सद्यस्थितीतील ही मोठी जमेची बाजू व ऐतिहासिक कामगिरी ठरली. यालाच जोड मिळाली ती इराणच्या प्रभावाखाली असणार्या क्षेत्रातून भारतीय जहाजांच्या सफल व सुरक्षित वाहतुकीची. भारताचे हे मोठे आंतरराष्ट्रीय धोरणात्मक यश अर्थव्यवस्थेसाठीसुद्धा मोठे पाठबळ ठरले आहे.


हीच बाब घरगुती गॅसच्या संदर्भातपण सांगता येईल. गॅस सिलिंडरच्या पुरवठ्यात संथगती निर्माण झाल्याने गॅसधारकांच्या रांगा अपरिहार्यपणे लागल्या. त्यात भर पडली ती, यानिमित्त झालेल्या अफवांच्या बाजाराची. गॅस सिलिंडर्सची टंचाई वा विलंब या कारणांनी खाद्यान्न पदार्थांची व्यापाऱ्यांनी दरवाढ करून घेतली व त्याचा हकनाक फटका ग्राहक म्हणून जनसामान्यांना बसला.

ऊर्जा क्षेत्रातील या जागतिक संकटावर आर्थिक उपाययोजना म्हणून जगातील अधिकांश मोठ्या देशांनी दरवाढ- करवाढ अशा तातडीच्या आर्थिक उपाययोजनांचा पिढीजात आधार घेऊन उद्योग- अर्थव्यवस्थेला सावरण्याचा प्रयत्न केला असला, तरी भारताने युद्धपूर्व काळापासूनच तेल-आयातीच्या विविध पर्यायांचा परिणामकारक वापर करून केलेल्या उपाययोजनेला युद्धकाळात मुत्सद्देगिरीसह घेतलेल्या निर्णयांमुळे आपल्या अर्थव्यवस्थेला त्याचा नेमक्या व निर्णायकक्षणी फायदा झाला, हे विशेष! (लेखक एचआर व्यवस्थापक व सल्लागार आहेत.)

# शोषणाचे सावट, संरक्षणाचे पाऊल

समाजभान डॉ. राजेंद्र बर्वे

**अलिकडील काळात पुण्यात तसेच अन्यत्र प्रकाशात आलेल्या बाल लैंगिक शोषणाच्या घटना विदारक वास्तव मांडत त्यामागील गुंतागुंतीची मानसिकता आणि सामाजिक उदासीनतेवर प्रकाश टाकणाऱ्या ठरल्या. पीडित मुलामुलींच्या मानसिक आघातांचे विश्लेषण करून 'गुड टच-बॅड टच'चे शिक्षण, पालकांशी मोकळा संवाद आणि कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करून 'भयमुक्त समाज' घडवण्याचे आव्हान या निमित्ताने अधोरेखित झाले.**

लैंगिक शोषण ही केवळ एखाद्या व्यक्तीवर ओढवलेली आपत्ती नसून संपूर्ण समाजाच्या नैतिकतेला लागलेली भीषण कीड आहे. आजच्या आधुनिक काळात आपण प्रगतीच्या गप्पा मारत असतानाच होणारे कोवळ्या मुलांचे शोषण हे एक कटू वास्तव म्हणून आपल्यासमोर उभे आहे. या विषयावर प्रकाश टाकताना केवळ गुन्ह्याची दाहकता मांडून चालणार नाही, तर त्यामागील गुंतागुंतीची मानसिकता आणि सामाजिक परिस्थितीचे पदर उलगडणे आवश्यक आहे. या संदर्भात रोज कानावर येणाऱ्या बातम्या पाहिल्या तर एक धक्कादायक पण डोळे उघडणारे चित्र समोर येते. आजच्या परिस्थितीमध्ये बाल लैंगिक शोषणाच्या घटनांमध्ये झालेली वाढ ही विश्वासाच्या आधारावर मिळून मिसळून असलेला समाज आणि तंत्रज्ञानाचा अनियंत्रित वापर यांचा परिणाम असल्याचे दिसून येते. सर्वात विदारक वास्तव हे आहे की, शोषक हा अनेकदा मुलांच्या ओळखीचा किंवा नातेसंबंधातील असतो.

एखाद्या मुलाचा किंवा मुलीचा विश्वास अशा व्यक्तीकडून तोडला जातो, तेव्हा त्यांच्या मनावर होणारा आघात हा शारीरिक जखमांपेक्षा कितीतरी पटीने खोल असतो. मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून पाहिले असता अशा गुन्हेगारांची मानसिकता ही केवळ क्षणिक विकृती नसते, तर अनेकदा बालपणी दडपलेल्या भावना किंवा अश्लील साहित्याच्या माध्यमां धून मिळालेली कामुक प्रेरणा याला कारणीभूत असते. इंटरनेटच्या युगात मुले अशा विकृतीचे सहज लक्ष बनत आहेत. कारण हिंसक आणि लैंगिक विचार त्यांच्यापर्यंत सहज पोहोचत आहेत. यामुळे समाजातील काही घटकांच्या मानसिकतेत विकृती निर्माण होत आहे. अशा प्रकारच्या आघाताचा मुलांच्या मनावर दीर्घकालीन परिणाम होतो. शोषणाचे बळी ठरलेल्या मुलांचा जगावरचा विश्वास उडतो. त्याचा परिणाम त्यांच्या भविष्यातील नातेसंबंधांवर आणि आत्मविश्वासावर होतो.

मुलींपेक्षा विशेषतः मुलांच्या शोषणाकडे आपला समाज मोठ्या प्रमाणावर दुर्लक्ष करतो. मुलांसोबत असे काही घडू शकत नाही किंवा त्यांनी प्रतिकार करायला हवा होता ही सामाजिक धारणा पीडित मुलाला अधिक एकाकी करते. यामुळे अशा घटना दबून राहतात आणि गुन्हेगारांचे धाडस वाढते. ही मानसिकता बदलणे ही काळाची गरज आहे. प्रतिबंधात्मक उपाययोजनांध्ये पालकांची आणि शाळांची भूमिका सर्वात कळीची ठरते. 'चांगला स्पर्श' आणि 'वाईट स्पर्श' या संकल्पना केवळ पुस्तकी न राहता, पालकांनी आपल्या पाल्याशी वयाच्या तिसऱ्या- चौथ्या वर्षापासूनच अतिशय नैसर्गिक आणि सोप्या भाषेत यावर संवाद साधला पाहिजे. प्रत्यक्ष बोली भाषेत शक्य नसेल तर चित्रांच्या, प्रसंगांच्या साहाय्याने हा संवाद होऊ शकतो. घरातील वातावरण इतके मोकळे हवे की, मुलाने कोणतीही भीती न बाळगता आपल्यासोबत घडलेला कोणताही अयोग्य प्रकार पालकांना सांगितला पाहिजे. पालकांनीही मुला- मुलींच्या बाबतीत सावधगिरी बाळगणे गरजेचे आहे. कैक घटनां ध्ये शाळेच्या प्रसाधनगृहामध्ये विद्यार्थिनींवर अत्याचाराच्या घटना घडल्या आहेत.

शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे सगळीकडेच बसवणे शक्य नसल्याने मुलामुलींच्या सुरक्षिततेची जबाबदारी वाढते, कोवळ्या वयातील विद्यार्थ्यांच्या बाबतीत संवेदनशील असलेल्या या विषयावर प्रत्येक कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना याची जाणीव करून देणे आवश्यक आहे. अनेकदा पीडितेलाच दोष देण्याच्या समाजाच्या वृत्तीमुळे अनेक प्रकरणे उघडकीस येत नाहीत. ही सामाजिक वृत्ती गुन्हेगारांसाठी संरक्षण कवच ठरते, जे आपल्याला मोडून काढावे लागेल. अलिकडेच अमेरिकेतील 'एपस्टीन फाईल्स'चे प्रकरण जगभर चर्चेत आले. यामध्ये संबंधित एपस्टीन या व्यक्तीने अनेक प्रतिष्ठित व्यक्तींच्या मदतीने अल्पवयीन मुलींचे लैंगिक शोषण आणि तस्करी केल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या कोर्टातील कागदपत्रांमुळे अनेक मोठे नेते आणि सेलिब्रिटींची नावे या काळ्या कृत्याशी जोडली गेल्याने खळबळ उडाली. अशाच प्रकारे बिहारमधील मुझफ्फरपूर येथील निवारागृहात ३४ हून अधिक अल्पवयीन मुलींचे पद्धतशीरपणे लैंगिक शोषण करण्यात आले. राजकीय संबंध असलेल्या ब्रजेश ठाकूर याला या प्रकरणी जन्मठेपेची शिक्षा झाली. नोएडा येथे घडलेल्या निठारी हत्याकांडात अनेक मुलांचे अपहरण, लैंगिक शोषण आणि हत्या केल्याचे भीषण प्रकरण घडले होते. अशा गुन्ह्यातून पुराव्याअभावी सुटलेल्या नराधमांची क्रूरता ही माणुसकीला काळिमा फासणारी असते. निष्पाप बालकांचे रक्षण करण्याऐवजी, हे नराधम स्वतःच्या पाशवी वासनांसाठी त्यांचा बळी घेतात. कृत्यानंतर त्यांच्या चेहऱ्यावर दिसणारी निर्विकार वृत्ती आणि पश्चात्तापाचा अभाव हे त्यांच्यातील मेलेल्या संवेदनांचे लक्षण आहे. अशा राक्षसी प्रवृत्तीच्या लोकांमुळे समाज भयभीत होतो आणि मानवी मूल्ये पायदळी तुडवली जातात.

गावपातळीवर तर जवळच्याच नातलगांकडून झालेल्या शोषणाच्या कैक घटना मुलामुलींच्या आईबापांच्या समाजातील प्रतिष्ठेपायी दडपून टाकल्या जातात. कायदेशीर आघाडीवर आपल्याकडे 'पोक्सो' सारखा अत्यंत कठोर कायदा उपलब्ध आहे. मात्र, गुन्हेगारांना कायद्याची भीती वाटत नाही, कारण शिक्षेचे प्रमाण कमी आहे आणि न्याय मिळण्यास होणारा विलंब पीडित कुटुंबाचे मनोधैर्य खचवून टाकतो. पोलिस यंत्रणा आणि न्यायालयीन प्रक्रिया लहान मुलांच्या बाबतीत अधिक संवेदनशील होण्याची आवश्यकता आहे. केवळ कायदा करून चालणार नाही, तर त्याची प्रभावी अंमलबजावणी आणि पीडित कुटुंबाला मिळणारा सामाजिक पाठिंबा यावरच या लढ्याचे यश अवलंबून आहे. या भीषण संकटाचा सामना करण्यासाठी आता वैयक्तिक प्रयत्नांपेक्षा सामूहिक जबाबदारीची अधिक गरज आहे. गृहनिर्माण संस्था, सामाजिक संस्था आणि प्रत्येक सुजाण नागरिकाने आपल्या सभोवतालच्या मुलांच्या सुरक्षेसाठी सतर्क राहणे गरजेचे आहे. पीडित मुलांसाठी केवळ औषधोपचार पुरेसे नसून मनावर झालेल्या खोलवर आघातातून बाहेर काढून त्यांचे मानसिक पुनर्वसन करण्यासाठी तज्ज्ञ समुपदेशकांची दीर्घकालीन मदत घेणे अनिवार्य आहे. लैंगिक शिक्षणाचा संकोच न बाळगता वैज्ञानिक आणि शैक्षणिक स्वरूप दिले तरच पुढची पिढी अधिक जागृत होईल. शेवटी, हे युद्ध केवळ कायद्याचे नाही, तर मानसिकतेचे आहे. लहान मुलांवरील लैंगिक अत्याचार रोखण्यासाठी सामाजिक संस्थांनी समाजाचा 'रक्षक' म्हणून उभे राहणे गरजेचे आहे. त्यांनी पालक आणि शिक्षकांना बालसुरक्षेचे प्रशिक्षण देऊन सजग करायला हवे. पीडितांना तत्पर मानसिक आधार, कायदेशीर साहाय्य आणि पुनर्वसन करून मुख्य प्रवाहात आणणे महत्त्वाचे आहे.

'पोक्सो' कायद्याची माहिती तळागाळापर्यंत पोहोचवून, नराधमांविरुद्ध वातावरण निर्माण करण्यात या संस्थांचा वाटा अत्यंत मोलाचा ठरतो. समाजानेही मुलांच्या सुरक्षेसाठी 'मौन' तोडून उघडपणे बोलणे आवश्यक आहे. प्रत्येक पालकाने आपल्या पाल्याशी मैत्रीचे नाते जपून त्यांना धोक्याची पूर्वकल्पना द्यावी. संशयास्पद हालचाली दिसताच गुन्हेगाराला पाठीशी न घालता पोलिसांकडे तक्रार करण्याचे धाडस दाखवावे. पीडित कुटुंबाला वाळीत न टाकता सामाजिक पाठबळ देऊन सुरक्षित आणि निर्भय वातावरण निर्माण करणे, हेच खऱ्या प्रबोधनाचे कार्य आहे. आपण आपल्या मुलांचे, विद्यार्थ्यांचे ऐकून घेण्याची आणि त्यांच्या सुरक्षिततेसाठी समाजातील प्रत्येक घटकाला उत्तरदायी ठरवण्याची वृत्ती जोपासत नाही, तोपर्यंत ही कीड मुळासकट उपटून टाकणे कठीण आहे. यासोबतच, मुलांच्या मनात वावरताना कोणतीही धास्ती नसावी. त्यांना स्वतःच्या घरात, शाळेत आणि रस्त्यावर वावरताना पूर्णतः सुरक्षित वाटले पाहिजे. मुले कोणत्याही संकोचाशिवाय व्यक्त होतील आणि संकटाच्या वेळी मदतीसाठी निर्भयपणे पुढे येतील, तेव्हाच खऱ्या अर्थाने भयमुक्त मुलामुलींची पिढी आकाराला येईल. अशा सुरक्षित वातावरणातच त्यांचे बालपण खऱ्या अर्थाने फुलेल. बालसुरक्षेचा हा लढा केवळ कायद्याचा नसून आपल्या सामूहिक संवेदनशीलतेचा आहे. आपण मुलांच्या मौनाला वाचा फोडू आणि गुन्हेगारांपेक्षा त्यांच्या सुरक्षिततेला अधिक महत्त्व देऊ, तेव्हाच खऱ्या अर्थाने क्रांती घडेल. प्रत्येक मुलाचे हसरे बालपण जपण्यासाठी सजग पालकत्व आणि जबाबदार समाज हीच काळाची गरज आहे. सम ाजातील प्रत्येक नागरिकाने 'मी माझ्या परिसरातील प्रत्येक मुलाचा रक्षक आहे' ही भावना जपली, तरच आपण एक भयमुक्त समाज घडवू शकू. (लेखक ज्येष्ठ समुपदेशक आहेत.)